अष्टदशकपर्व

# साहित्य

साहित्य संघ विशेषांक
२०१५

मूल्य १०० रुपये



*Prayer for happiness, peace & eternity*

# Suman Ramesh Tulsiani Charitable Trust

**PROMOTING**

- Education
- Healthcare
- Welfare
- Culture

1103 / 1104, Tulsiani Chambers,
212, Nariman Point, Mumbai 400 021.
T: (O) 2285 1505 Fax: 2285 5856
(R) 2288 3288 / 2285 0646

साहित्य
**साहित्य संघ विशेषांक २०१५**
ऑगस्ट-ऑक्टोबर २०१५ आणि
नोव्हेंबर-जानेवारी २०१६ जोड अंक

संपादक : अशोक बेंडखळे
संपादक मंडळ : उज्ज्वला मेहेंदळे
प्रतिभा विस्वास
पद्माकर शिरवाडकर
सावित्री हेगडे

मुखपृष्ठ : पुंडलीक वझे
निर्मिती : मुंबई मराठी साहित्य संघ
प्रकाशक : उज्ज्वला मेहेंदळे
छपाई : एपीज् डिझाइन ॲण्ड प्रिन्टस्
**या अंकाचे मूल्य रुपये १००**

# संपादकीय

मुंबई मराठी साहित्य संघ ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य सांस्कृतिक संस्था. यंदा संस्थेचे अष्टदशकपर्व साजरे झाले. अष्टदशकपर्वाचा सांगता समारंभ करताना 'साहित्य'चा 'साहित्य संघ विशेषांक' काढावा अशी कल्पना पुढे आली. डॉ. बाळ भालेरावांनी केलेल्या सूचनांनुसार विशेषांकाची आखणी करण्यात आली. त्यानुसार साहित्य संघाच्या ८० वर्षांच्या दीर्घ कामगिरीवर प्रकाश टाकणारे पाच प्रमुख लेख, संघाशी संबंधित काही मान्यवरांच्या मुलाखती, लेख आणि मनोगते असे स्वरुप ठरले. त्याप्रमाणे 'साहित्य'चा विशेषांक सादर करताना संपादक मंडळाला अतिशय आनंद होत आहे.

संघाचा ८० वर्षांचा इतिहास मोठा दैदीप्यमान असा आहे आणि या कालखंडात संस्था अनेक स्थित्यंतरातून गेली. संस्थेच्या इतिहासातील काही महत्त्वाचे टप्पे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

कुठल्याही संस्थेचा प्रारंभीचा कालखंड जडणघडणीचा असतो. प्रारंभीच्या १५ वर्षांच्या घटनांचा आढावा प्रा. उषा तांबे यांनी घेतला आहे, तर अशोक बेंडखळे यांनी पुढला ३५ वर्षांचा (१९५० ते १९८५) म्हणजे सुवर्णमहोत्सवापर्यंतचा भरभराटीचा कालखंड घेतला आहे. याच काळात संस्थेला जागा मिळून त्यावर इमारत उभारण्यात आली. संस्थेची वास्तू झाल्यानंतर अनेक व्याख्यानमाला, जन्मशताब्दी महोत्सव, साहित्य चर्चा व नाट्योत्सव झाले. प्रा. सुहासिनी किर्तिकरांनी सुवर्णमहोत्सवानंतरच्या ३० वर्षांमध्ये (१९८५-२०१५) संघ धडाडीने कसा पुढे गेला ते सांगितले आहे. डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी साहित्य शाखेच्या ८० वर्षांच्या कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा घेतला असून कार्यक्रमांतील सहकाऱ्यांच्या सहकार्याविषयी ऋण व्यक्त केले आहे. ८० वर्षांच्या प्रदीर्घ काळात नाट्यशाखेने १७५ पेक्षा अधिक नाटकांचे हजारो प्रयोग केले. आज प्रख्यात झालेल्या अनेक रंगकर्मींना साहित्य संघाने प्रथम व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. हे ऋण अनेक कलाकार आज मान्य करतात. तर अशा नाट्यशाखेची ८० वर्षांची वाटचाल सुभाष भागवत यांनी सांगितली आहे.

याशिवाय नामवंत दिग्दर्शिका विजया मेहता व ज्येष्ठ अभिनेत्री ललिता केंकरे यांचे लेख, डॉ. बाळ भालेराव व पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या मुलाखती, शि. मो. घैसास यांचा परिचय तसेच, अरविंद पिळगावकर, रजनी जोशी, उपेंद्र दाते, आशा मुळगावकर, रोहिदास पांगे आदि कार्यकर्त्यांची मनोगते यांनी हा अंक वाचनीय झाला आहे.

अंकाच्या निर्मिती रचनेत नेहमीप्रमाणे डॉ. बाळ भालेराव, प्रा. उषा तांबे आणि डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच संपादक मंडळातील सर्व सहकाऱ्यांचे उत्तम सहकार्य साथीला होते. चित्रकार पुंडलीक वझे यांचे विषयानुसार देखणे मुखपृष्ठ अंकाची आकर्षकता वाढवणारे आहे आणि अंकाच्या उत्तम छपाईमध्ये एपीज डिझाईन्सच्या प्रज्ञा हरणखेडकर व त्यांचे सहकारी यांचा वाटा महत्त्वाचा. त्या सर्वांचे आभार.

जाहिरातदार, सर्व वाचक, लेखक यांना दीपावलीच्या व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-अशोक बेंडखळे**

वर्धापन दिन २८ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो. परंतु पहिला संघ दिन दि. १७ एप्रिल १९३७ रोजी 'जयलक्ष्मी' ह्या नौकेवर साजरा करण्यात आला होता. त्या समारंभाचे महनीय प्रवक्ते होते रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई. ह्याच वर्षी साहित्य संघाचे मुखपत्र 'वीणा' हे मासिक सुरु झाले. प्रथम संपादक होते श्री. म. वर्दे आणि मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सहकार्याने 'हेमंत व्याख्यानमाला' ही ह्याच वर्षी सुरु करण्यात आली.

१९३८ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे बाविसावे अधिवेशन मुंबईमध्ये भरवण्यात आले. आयोजनात मुंबई मराठी साहित्य संघाचा पुढाकार होता. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ह्या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'साहित्यिकांनो, लेखण्या मोडा आणि बंदुका हाती घ्या' असा क्रांतिकारी संदेश त्यांनी ह्याच संमेलनात दिला. साहित्य आणि राजकारण यामध्ये काही संघर्ष नसून ते एकरुप होऊ शकतात हे त्यांनी दाखवून दिले. १९३८ ते ४१ ह्या काळात मुंबई मराठी साहित्य संघाने मराठी



मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४ - पहिल्या अधिवेशन प्रसंगीचे छायाचित्र

वाङ्मयाचे अभ्यासवर्ग सुरु केले व संस्था त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षाही घेऊ लागली. श्री. बा. रा. ढवळे हे ह्या उपक्रमाचे प्रमुख होते.

मुंबई मराठी साहित्य संघाचे अस्तित्व अधोरेखित करणारी संघमुद्रा १९४० साली निर्माण करण्यात आली. संस्थेच्या विविध कार्यक्रमांमध्ये आणि सर्व पत्रव्यवहारामध्ये तिचा वापर करावा असे ठरवण्यात आले.

मुंबईतील इतर ४१ संस्थांच्या सहकार्याने १९४४ साली साहित्य संघाने मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव अतिशय भव्य स्वरुपात साजरा केला. १४ एप्रिल ते २७ एप्रिल १९४४ ह्या काळात झालेल्या ह्या नाट्योत्सवाचे अध्यक्ष होते बालगंधर्व आणि स्वागताध्यक्ष होते आचार्य अत्रे. मरीन लाईन्सवरील ग्रँट मेडिकल कॉलेजच्या जिमखान्यावर ह्या नाट्योत्सवाचा प्रचंड मंडप उभारण्यात आला आणि मराठीतील नाट्यप्रयोग पाहण्याची, तसेच नाट्यप्रयोग करण्याचीही दृष्टीच बदलून गेली. काहीतरी भव्य, प्रचंड, थक्क करणारे व थरारक अनुभवाला येत होते. लोक रोमांचित होऊन तो सोहळा पाहत होते. ह्या प्रेक्षागृहात ८००० प्रेक्षक बसण्याची सोय होती. एवढ्या भव्य प्रमाणात उभारलेले देशातले हे पहिलेच खुले नाट्यगृह होते.

महोत्सवाचा प्रारंभ १४ एप्रिल १९४४ रोजी व्हायचा होता. परंतु त्याच दिवशी दुपारी ४.३५ वाजता मुंबईच्या गोदीत भयंकर स्फोट झाले. ह्या दुर्घटनेमुळे महोत्सवाचे उद्‌घाटन दुसऱ्या दिवशी, म्हणजे १५ एप्रिल रोजी झाले आणि मुंबईतील रसिकांना एक अविस्मरणीय असा नाट्यानुभव मिळाला. ह्या नाट्योत्सवाला श्री. मोरारजी देसाई ह्यांनी भक्कम पाठिंबा दिला. मुंबईतील अनेक सधन कुटुंबांनी सढळ हस्ते मदत केली. यापुढे १९५९ पर्यंत साहित्य संघाने सातत्याने वार्षिक नाट्योत्सव घडवून आणले. २७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी १९४६ ह्या काळात साजऱ्या झालेल्या नाट्योत्सवाचे अध्यक्ष वीर वामनराव जोशी, तर स्वागताध्यक्ष प्रा. अनंत हरी गद्रे

# मुंबई मराठी साहित्य संघ
## संस्थापक डॉ. अ. ना. भालेराव



होते. २२ एप्रिल ते २ मे १९४७ ह्या काळातील नाट्योत्सवाचे अध्यक्ष श्री. गोविंद गणेश बोडस, तर स्वागताध्यक्ष प्रा. अनंत काणेकर होते. साहित्य संघाच्या ह्या नाट्योत्सवांनी, मराठी रंगभूमीवर होत असलेले चित्रपटांचे आक्रमण काही प्रमाणात तरी रोखून धरले आणि रंगभूमीला एक नवी उमेद दिली.

१९४४ साली नाट्योत्सवाबरोबरच एक महत्वाची गोष्ट करण्यात आली ती म्हणजे, संस्था सरकारमध्ये रजिस्टर करण्यात आली व संघाच्या मालमत्तेसाठी विश्वस्त नेमावेत असा ठराव करण्यात आला. त्याच वर्षी 'साहित्य' नावाचे द्वैमासिक श्री. वा. रा. ढवळे ह्यांच्या संपादनाखाली सुरु करण्यात आले.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले, परंतु हा आनंद साजरा करीत असतांनाच साहित्य संघावर एक मोठी आपत्ती कोसळली. ती म्हणजे सतत तेरा वर्षे सातत्याने संस्थेचे अध्यक्ष राहिलेल्या प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर ह्यांचे हृदयक्रिया बंद पडून झालेले आकस्मिक निधन. साहित्य संघाचा एक मोठा आधार नाहीसा झाला. त्यांचे स्मारक म्हणून अ. बा. गजेंद्रगडकर संदर्भ ग्रंथालयाची स्थावना करण्यात आली. दुसऱ्याच वर्षी, म्हणजे १९४८ साली, संस्थेचे पहिले अध्यक्ष श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर ह्यांचे निधन झाले.

१९४८ साली मुंबईमध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन बॅ. रामराव देशमुख ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यामध्ये साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता. त्यापूर्वीच संस्थेने आपल्या एका उपनगर साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा ठराव केलेला होता. १९४९ साली, संस्थेच्या नाट्यविषयक कार्यामध्ये सातत्य आणण्यासाठी नाट्यशाखेची स्थापना करण्यात आली.

१९५० साली महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ३३ वे अधिवेशन मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. त्याचे अध्यक्ष होते कवी यशवंत (य. दि. पेंढारकर) आणि स्वागताध्यक्ष होते श्री. भा. ग. वाड.

दि. १३ ऑक्टोबर १९५० रोजीच्या सर्वसाधारण सभेत पुढील महत्वाचा ठराव करण्यात आला. 'संघमंदिरासाठी भूमिसमितीने ठरवलेले केळेवाडीतील सेंट टेरेसा हायस्कूल शेजारील सुमारे १३०० चौरस वाराचे दोन जमिनीचे तुकडे १४० रु. चौरस वार व निम्मा खर्च याप्रमाणे खरेदी करण्यात ही सभा संमती देत आहे.' त्यानुसार संघाच्या वास्तूची जागा सुमारे २५००० रुपयांना खरेदी करण्यात आली. जागेचे भूमिपूजन दि. २२ ऑक्टोबर रोजी श्री. न. वि. गाडगीळ ह्यांच्या हस्ते झाले व या समारंभाचे पौरोहित्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. म्हणजे स्थापनेनंतर १५ वर्षांच्या कालावधीतच साहित्य संघाने स्वत:ची वास्तू उभारण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले.

इमारतीची कोनशिला बसवण्यासाठी मात्र १९६० साल उजाडले आणि अत्यंत दुर्दैवाची गोष्ट अशी की त्यापूर्वीच, २५ ऑगस्ट १९५५ रोजी, साहित्य संघाचे चैतन्यमूर्ती डॉ. अ. ना. भालेराव यांचे निधन झाले. संस्थेच्या नाट्यगृहाला 'डॉ. अ. ना. भालेराव सभागृह' असे नाव देऊन पुढील कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याचा उचित गौरव केला खरा, परंतु ह्या वास्तूत ते कधीही आले नाहीत, ही रुखरुख कायमची राहिली.

लंडनमधील नाट्यगृहांचा अभ्यास करुन ह्या नाट्यगृहासाठी आराखडे पाठवण्याची विनंती डॉ. अ. ना. भालेरावांनी श्री. बापूराव नाईक ह्यांना केली होती. त्यानुसार श्री. नाईक ह्यांनी ब्रिटिश ड्रामा लीगची या विषयावरची अनेक पुस्तके वाचली. या जमवलेल्या माहितीवरुन त्यांनी साहित्य संघाच्या नाट्यगृहाचा आराखडा तयार केला. नाट्यगृह बांधणीच्या तज्ज्ञांकडून तो तपासून घेतला आणि नंतर डॉ. भालेरावांकडे पाठवला. त्या आराखड्यानुसार नाट्यगृहाची उभारणी करावयाची होती. आर्किटेक्ट मराठे-कुळकर्णी यांच्याकडे हे काम सोपवण्यात आले. व्यवसायाने आर्किटेक्ट असलेले हे दोघेही मराठी नाटकांचे प्रेमी होते. मराठी रंगभूमीच्या गरजा

ओळखणारे होते. अपार मेहनत घेऊन त्यांनी हे उत्तम नाट्यगृह उभे केले. या नाट्यगृहाचे श्रुतिगुण (अकाउस्टिक्स) व प्रकाश योजना उत्कृष्ट आहेत. रंगमंच ५१' x ५०' असा अर्धवर्तुळाकार असून शेक्सपिरिअन थिएटरच्या धर्तीवर मंचाचे अर्धवर्तुळाकार एप्रन ६' पुढे घुसलेले आहे व त्यावरील फळ्या काढून तेथे साथीची योजना करण्याची व्यवस्था आहे. रंगमंचाच्या एका बाजूला खोल्या असून त्यामध्ये रंगपट, कपडेपट, विश्रामिका इ. आहेत. नाटकातील कलाकार व ते बघणारे प्रेक्षक या दोघांनाही जास्तीत जास्त सोयी देण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. परंतु ज्यांच्या प्रेरणेने हा प्रकल्प हाती घेण्यात आला ते डॉ. अ. ना. भालेराव मात्र बांधकाम सुरू होण्यापूर्वीच निधन पावले होते.

साहित्य संघाच्या नाट्यशाखेने नाटकांची निवड एका विशेष धोरणाने केली. जुन्या काळी गाजलेली परंतु नंतर विस्मरणात जात चाललेली नाटके निवडून त्यांचे सुविहित प्रयोग प्रेक्षकांसमोर आणले. त्यामुळे नवीन प्रेक्षकांना जुन्या नाटककारांची व आपल्या रंगभूमीच्या परंपरांची ओळख झाली, तसेच ह्या नाटकांना होणारी गर्दी पाहून नव्या नाटककारांना स्फूर्ती मिळाली व नवी-नवी नाटके रंगभूमीवर येऊ लागली. १९५० साली साहित्य संघाने दिल्ली आणि ग्वाल्हेर येथे जाऊन भाऊबंदकी आणि संशयकल्लोळ ह्या नाटकांचे प्रयोग करुन मराठी नाटक महाराष्ट्राबाहेर नेले. 'भाऊबंदकी' च्या दिल्लीच्या प्रयोगाला पारंपारिक विभागातले प्रथम पारितोषिक मिळाले. ध्वनिक्षेपकाशिवाय प्रयोग करणारी त्यावेळी साहित्य संघ ही एकमेव संस्था होती. या नाटकासाठी घेतलेल्या अविश्रांत श्रमापुढे मात्र डॉ. भालेरावांची तब्येत अतिशय ढासळली.

साधारण १९५० पर्यंत साहित्य संघाने केलेल्या महत्वाच्या नाटकांची व त्यांच्या नाटककारांची नावे वाचल्यास संस्थेच्या कार्याचे महत्व कुणाच्याही लक्षात येईल.

| नाटक | वर्ष | नाटककार |
|---|---|---|
| उद्याचा संसार | १९४४ | आचार्य अत्रे |
| साष्टांग नमस्कार | १९४७ | आचार्य अत्रे |
| वंदे मातरम् | १९५० | आचार्य अत्रे |
| विकार विलसित (हैम्लेट) | १९४५ | गो. ग. आगरकर |
| बेबंदशाही | १९५१ | विष्णुपंत औंधकर |
| घरकुल | १९४१ | अनंत काणेकर |
| पतंगाची दोरी | १९५१ | अनंत काणेकर |
| सौभद्र | १९४४,५०,५१,५४,५५ | अण्णा किर्लोस्कर |
| शाकुंतल | १९४८, ४९ | अण्णा किर्लोस्कर |
| शोभेचा पंखा | १९५० | वि. ह. कुळकर्णी |
| मायाविवाह | १९३८ | श्री.कृ.कोल्हटकर |
| वधूपरीक्षा | १९४७ | श्री.कृ.कोल्हटकर |
| मूकनायक | १९५० | श्री.कृ.कोल्हटकर |
| प्रेमशोधन | १९५१ | श्री.कृ.कोल्हटकर |
| म्युनिसिपालिटी | १९४७, ५२ | माधवराव जोशी |
| अरे बाबा जाहिरात | १९४२, ५५ | चिं. वि. जोगळेकर |
| शारदा | १९४४, ४७ | गो. ब. देवल |
| संशयकल्लोळ | १९४६, ४९, ५९ | गो. ब. देवल |
| मृच्छकटिक | १९४७, ४९, ५५ | गो. ब. देवल |
| शिवसंभव | १९४७ | वासुदेवशास्त्री खरे |
| भाऊबंदकी | १९४४, ४९ | कृ. प्र. खाडिलकर |
| स्वयंवर | १९४४, ५१ | कृ. प्र. खाडिलकर |
| विद्याहरण | १९४६, ५०, ५१ | कृ. प्र. खाडिलकर |
| कांचनगडची मोहना | १९४६ | कृ. प्र. खाडिलकर |
| मानापमान | १९४६, ४९ | कृ. प्र. खाडिलकर |
| सवाई माधवरावांचा मृत्यू | १९४६ | कृ. प्र. खाडिलकर |
| कीचकवध | १९४९ | कृ. प्र. खाडिलकर |
| वेड्यांचा बाजार | १९४४ | रा. ग. गडकरी |
| एकच प्याला | १९४६, ४८, ४९, ५७ | रा. ग. गडकरी |
| प्रेमसंन्यास | १९४७ | रा. ग. गडकरी |
| गोड अपघात | १९४४ | वि.मा.दि.पटवर्धन |

| | | |
|---|---|---|
| पारध | १९४७ | मालती बेडेकर |
| सशाची शिंगे | १९४८, ४९ | माधव मनोहर |
| आजोबाच्या मुली | १९४३ | माधव मनोहर |
| आंधळ्याची शाळा | १९५१ | श्री. वि. वर्तक |
| उडती पाखरे | १९४१ | भा. वि. वरेरकर |
| सारस्वत | १९४४ | भा. वि. वरेरकर |
| सत्तेचे गुलाम | १९४४ | भा. वि. वरेरकर |
| धरणीधर | १९४६ | भा. वि. वरेरकर |
| कुंजविहारी | १९५३ | भा. वि. वरेरकर |
| दूरचे दिवे | १९४६, ५१ | वि. वा. शिरवाडकर |
| दुसरा पेशवा | १९४७, ५९ | वि. वा. शिरवाडकर |
| वैजयंती | १९५०, ५८ | वि. वा. शिरवाडकर |

या नंतरच्या काळात संघाच्या महत्वाच्या नाटककारांमध्ये अग्रक्रमाने पु. ल. देशपांडे आहेत. त्यांची बहुतेक गाजलेली नाटके साहित्य संघाने प्रथम रंगभूमीवर आणलेली आहेत. रत्नाकर मतकरी, चिं. य. मराठे, मो. ग. रांगणेकर, कुमुदिनी रांगणेकर यांचीही नाटके साहित्य संघाच्या रंगभूमीवर आलेली आहेत. साहित्य संघाच्या दिग्दर्शकांची नावेही अत्यंत आदराने घेतली जाणारी आहेत. श्री. गणपतराव बोडस, श्री. केशवराव दाते, श्री. चिंतामणराव कोल्हटकर, श्रीमती. दुर्गाबाई खोटे, श्री. के. नारायण काळे, श्री. पार्श्वनाथ आळतेकर, श्री. नानासाहेब फाटक, श्री. आचार्य अत्रे ही त्यातली काही सुरुवातीची नावे. ही गौरवशाली परंपरा पुढेही सुरु राहिली. त्याच तोलामोलाचे संगीत दिग्दर्शक, नेपथ्यकार, साथीदार, रंगमंच सहाय्यक आदीही साहित्य संघाला लाभले. नानासाहेब फाटक, मा. दत्ताराम, मामा पेंडसे, दत्तोपंत आंग्रे, अनंत वर्तक, दाजी भाटवडेकर, दुर्गाबाई खोटे, सुधा आमोणकर (करमरकर) ज्योत्स्ना भोळे असा जबरदस्त नटसंच साहित्य संघाकडे होता. रंगभूमीवर स्त्रियांची कामे स्त्रियांनी करावयाचा तो प्रारंभ होता. मराठी रंगभूमीवर स्त्रिया स्थिरावल्या याचे मोठे श्रेय साहित्य संघाला जाते. मुलींनी नाटकात काम करण्यासाठी यावे म्हणून संघाच्या नाटकांमध्ये डॉ. भालेरावांनी घरच्या मुलींना छोटी छोटी कामे करायला लावली. दिल्लीला सादर झालेल्या 'भाऊबंदकी' मध्ये त्यांची कन्या मालती हिने दासीची भूमिका केली होती.

इतक्या विविध अंगांनी विस्तारलेल्या या संस्थेच्या यशाचे श्रेय संस्थेला सुरुवातीपासून लाभलेल्या निरलस कार्यकर्त्यांना जाते. ही कार्यकर्त्यांची संस्था आहे. डॉ. अ. ना. भालेराव, प्रा. न. र. फाटक, श्री. चं. वि. बावडेकर, श्री. द. ग. गोडसे, श्री. शं. ना. अंधृटकर, श्री. दि. वि. आमोणकर, श्री. वा. रा. ढवळे, श्री. प्रभाकर पाध्ये, श्री. लालजी पेंडसे, श्री. श्रीपाद शंकर नवरे, श्री. बापूराव नाईक, श्री. पुरुषोत्तम का. दिवेकर, श्री .कृ. मो. भाटवडेकर, श्री. भार्गवराव पांगे, डॉ. गं. मा. फडके, डॉ. भा. नी. पुरंदरे ह्यांच्यासारख्या असंख्य मान्यवरांनी साहित्य संघाला सुरुवातीपासूनच समाजात महत्वाच्या स्थानावर नेऊन ठेवले. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांची जोपासना करणारी ती महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था बनली.

या सर्वांचे अध्वर्यू होते डॉ. अमृत नारायण भालेराव. १९६४ साली संघमंदिराचे उद्घाटन करताना तत्कालिन केंद्रीय संरक्षण मंत्री मा. श्री .यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, ''डॉ. भालेराव म्हणजे मूर्तिमंत चैतन्य....साहित्य संघाची स्थापना करतांना त्यांना त्याचे जे भावी दर्शन झाले ते इतके व्यापक असून त्याची झेप इतकी दूरवरची होती की त्यावेळी त्यांनी ते बोलून दाखवले असते तर त्यांची गणना भ्रमिष्टांतच झाली असती पण उण्यापुऱ्या वीस वर्षांत त्यांनी अविश्रांत मेहेनत करुन त्यांनी ती कल्पना साकार केली. समग्र मराठी साहित्याचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे अंतिम ध्येय हेते. ध्येयवाद योजनापूर्वक मूर्त स्वरुपात कसा आणावा, हे जाणणारे ते व्यावहारिक कार्यकर्तेही होते.'' ध्येयाची स्वप्ने बघावी लागतात, त्याशिवाय नवीन काही घडवून आणता येत नाही. परंतु हे घडवून आणणे मात्र व्यवहाराच्या पातळीवर असते. त्यासाठी पाय भक्कमपणे जमिनीवर असावे

लागतात. हे दोनही गुण सहसा एका व्यक्तीमध्ये आढळत नाहीत, परंतु डॉ. अ. ना. भालेरावांमध्ये ते होते. एवढ्या प्रचंड कार्याला अनेक हातांची मदत लागते. त्यासाठी आवश्यक असणारा लोकसंग्रह त्यांचा होता. साहित्यिक, नाटककार, कलाकार, संगीतकार ह्यांच्या बरोबरच पडद्यामागे राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक मोठी फौज त्यांनी तयार केली होती. अगदी सामान्य लोकांनीही डॉक्टरांच्या शब्दाखातर साहित्य संघाची कामे केली.

त्यांच्या कुटुंबीयांनीही या कार्यात त्यांना मनापासून व मोलाची साथ दिली. म. म. द. वा. पोतदार ह्यांनी लिहिले आहे की, ''डॉ. भालेरावांचे घर अनेक कार्यकर्त्यांचे निजण्या-उठण्याचे, जेवण्या-खाण्याचे कार्यालयच होते........भालेराव आहेत ना, मग सारे ठीक होईल, यशस्वीच होईल, असा त्यांचा दांडगा आधार सर्वांना वाटत असे'' आपल्या कार्यामध्ये केवळ सहभागी होणे, एवढेच आपल्या सहकाऱ्यांचे काम आहे. असे ते मानत नसत. त्यांच्या कामगिरीची कदर करून त्यांना योग्य ते श्रेयही ते त्यांना देत. त्यांचे संघटना कौशल्य अप्रतिम म्हणावे, असे होते. त्यासाठी प्रस्थापितांचा कधी अनुनय तर कधी माफी, अकारण विरोध करणाऱ्यांकडे दुर्लक्ष असे धोरण ते अवलंबित असत. प्रसंगी अनुयायांना दमदाटी करणे, सहकाऱ्यांपुढे त्रागा करणे, असेही घडत असे. परंतु सर्वांनी त्यांना संपूर्ण सहकार्य दिले. एवढेच नाही तर त्यांच्या पश्चात त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ह्या कार्यकर्त्यांनी जिवाचे रान केले.

संघमंदिराच्या उद्घाटन प्रसंगी थोर साहित्यिक वि. स. खांडेकर ह्यांनी पाठवलेल्या संदेशामध्ये जी प्रार्थना केली होती, तीच आज सर्व मराठी जनांच्या मनात आहे. ते लिहितात,

''मराठी साहित्य, मराठी नाट्यकला आणि मराठी संस्कृती ह्यांच्या विकासाला संघमंदिराचा जास्तीत जास्त उपयोग होवो आणि डॉ. भालेरावांसारखे कर्तृत्ववान आणि निष्ठावंत सेवक संघाच्या कार्याला सतत लाभोत अशी या शुभप्रसंगी प्रार्थना करतो.''

**- उषा तांबे**
९८२०३२५४७३

## *श्रद्धांजली*

- यशवंत कानिटकर
- बशर नवाज
- रा.सू.गवई
- डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
- वसुंधरा कोमकली
- लक्ष्मण लोंढे
- भालचंद्र (अण्णा) पेंढारकर
- विश्वनाथ लाड
- पं.पंढरीनाथ कोल्हापुरे
- प्र.ल.मयेकर
- तन्मय कर्णिक
- मनोहर रणपिसे
- आदेश श्रीवास्तव
- सुरेश चिखले
- वीणा चिटको
- बाळ ज.पंडित
- जगमोहन दालमिया
- डॉ.सुनिती देशपांडे
- मोहन भंडारी
- हेमंत भोसले
- अनंत सदाशिव मराठे
- कृष्णकांत दळवी
- ग.रा.कामत
- रवींद्र जैन
- मनोरमा

# साहित्य संघाची लखलखती वाटचाल
(१९५०-१९८५)

**- अशोक बेंडखळे**

मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थेने आपल्या अभूतपूर्व कार्याची ८० वर्षे पूर्ण केली. या संस्थेच्या वाटचालीचे दुसरे पर्व म्हणजे १९५० ते १९८५ (सुवर्ण महोत्सव) पर्यंतचा काळ. हा कालखंड देदिप्यमान घटनांनी भरलेला आहे. त्याचाच हा आढावा.

मुंबई (शहर व उपनगर) येथील साहित्य संस्था व साहित्यिक यांची मध्यवर्ती संस्था स्थापन करावी असा ठराव १९३४ च्या ऑक्टोबर मध्ये झालेल्या मुंबई मराठी साहित्य संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनात संमत झाला होता. त्याप्रमाणे २१ जुलै १९३५ रोजी 'मुंबई मराठी साहित्य संघ' ही संस्था स्थापन झाली. १९५० म्हणजे पहिली पंधरा वर्षे साहित्य संघासाठी भरारीची म्हणता येईल अशी होती. या काळात नाट्यमहोत्सव भरपूर झाले, मात्र संस्थेची वास्तू नसल्यामुळे कामाला अनेक मर्यादा येत होत्या. अशात १३ ऑक्टोबर १९५० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जागेसंबंधी ठराव करण्यात आला. त्यानंतर भूमिसमितीने जागेचा शोध घेऊन जागेची निश्चिती केली. ही जागा होती सेंट पीटर्स आर्येनियम चर्चच्या केळेवाडीतील सेंट टेरेसा हायस्कूल शेजारील सुमारे २३०० चौ. वाराचे जमिनीचे दोन तुकडे. या जागेचा तपास लागल्यानंतर डॉ. अ. ना. भालेरावांनी आपल्या सहकाऱ्यांना ही जागा अत्यंत गुप्तता राखून दाखवली. फक्त रात्रीच ते सहकाऱ्यांना जागेवर नेऊन आळीपाळीने दाखवीत. कारण गिरगावात मोकळ्या जागाच शिल्लक नव्हत्या आणि अनेक धनिक अशा जागांच्या शोधात होते. त्यानंतर या जागेची खबर न लागता ही जागा साहित्य संघास मिळावी म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. जागेसाठी बॉम्बे लॉजचे मालक श्री. ढवळे आणि श्री. सावे यांनी खूप मेहनत घेतली. १० ऑक्टोबर १९५० रोजी ३० हजार देऊन साठेखत करण्यात आले, तर २२ ऑक्टोबर १९५२ या दिवशी रु.१ लाख १० हजार देऊन संस्थेने खरेदीखत केले.



कोनशीला समारंभ - हस्तेः चिंतामणराव देशमुख



भूमिपूजन समारंभः कोनकर शास्त्री, काकासाहेब गाडगीळ

अशाप्रकारे जागेचे सोपस्कर पार पाडल्यानंतर भूमिप्रवेश समारंभ करण्याचे ठरले. हा दिवस संस्थेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असा होता. भूमिप्रवेश समारंभ मंगळवार दि.२७ ऑक्टोबर १९५२ रोजी सायं.६.३० ला संपन्न झाला. भारत सरकारचे मंत्री काकासाहेब गाडगीळ समारंभाचे अध्यक्ष होते आणि समारंभाचे पौराहित्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

यांनी केले. काकासाहेबांच्या हस्ते भूमीचे पूजन करून संघाची जमीन ताब्यात घेण्यात आली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री भूमीपूजनाच्या महत्त्वासंबंधी बोलले तर काकासाहेबांनी या दिवसाच्या महत्त्वाबद्दल विवेचन केले. समारंभास मुंबईचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई व महसूलमंत्री भाऊसाहेब हिरे जातीने हजर होते. संघाचे कार्याध्यक्ष नवरे यांनी संघाचा इतिहास व संघाचे ध्येय सांगून ज्यांच्या मदतीमुळे हा दिवस उगवला त्या सर्वांचे आभार मानले. रात्री सौभद्र, खडाष्टक, लग्नाची बेडी इ. नाटकातील नाट्यप्रवेश केशवराव दाते, नानासाहेब फाटक, दुर्गाबाई खोटे, राम मराठे, भालचंद्र पेंढारकर आदि कलावंतानी सादर केले. केशवराव दाते यांनी भाषण करून नटांना स्वत:चे घर प्राप्त करून दिल्याबद्दल साहित्य संघाचे आभार मानले. एकूण संस्थेच्या वाटचालीतला हा महत्वपूर्ण दिवस होता.

संस्थेला जागा मिळाली पण वास्तूचे काय? या पूर्ततेचे एक पाऊल म्हणून जमिनीवर दक्षिणेस एक ७० बाय ४० फूट लांबी रुंदीची कच्ची इमारत सुमारे २६ हजार रु. खर्चून बांधण्यात आली. यात संघाचे कार्यालय, गजेंद्रगडकर स्मारक संदर्भ ग्रंथालय, प्राज्ञ विशारद वर्ग इ. राहून रात्री नाट्यप्रयोग करता यावेत अशी सोय करण्यात आली. संस्थेचा १९५२-५३ चा नाट्योत्सव या उघड्या नाट्यमंदिरात भरविला गेला. नाट्यगृहात खुर्च्या नव्हत्या. त्या विकत घेता याव्यात म्हणून पु.ल.देशपांडे यांचे 'अंमलदार' नाटक नाट्यशाखेने बसवले. या नाटकाचे दिग्दर्शक होते डॉ.भालेराव आणि त्यात दाजी भाटवडेकर, अनंत वर्तक, दि.वि.आमोणकर, अंधृटकर, राजा पटवर्धन, चारुशीला पटवर्धन, ललिता केंकरे आदि संघाच्या कार्यकर्त्यांनी भूमिका केल्या. या नाट्यप्रयोगातून जे उत्पन्न मिळाले त्यातून सुमारे ३०० खुर्च्या विकत घेण्यात आल्या. हा नाट्यप्रयोग म्हणजे संस्थेच्या कार्यकर्त्यांचा अभिनय कौशल्य व श्रम यांचे प्रतिक ठरला. १९५२ साली ३,४ व ५ मे रोजी मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन (११ वे) प्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत यांच्या अध्यक्षतेखाली झाले. विशेष म्हणजे



पहिले खुले नाट्यगृह

संमेलनाचे सर्व प्रतिनिधी 'जलतरंगिणी' बोटीवर जमले आणि बोटीवरच अध्यक्षीय भाषण झाले. समुद्रात भरलेले हे एकमेव साहित्य संमेलन असावे.

१९५३ साली रेल्वेच्या जन्मशताब्दीनिमित्त नवी दिल्ली येथे खास प्रदर्शन भरले होते. त्यावेळी नाट्यप्रयोग करण्यासाठी रेल्वे बोर्डाने संघास आमंत्रण दिले. संस्थेने दिल्ली येथे खडाष्टक आणि भाऊबंदकी या नाटकांचे दोन नाट्यप्रयोग केले. रेल्वे बोर्डातर्फे उपराष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते नाट्य कलाकारांचे सत्कार करण्यात आले.

१९५३ पासून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सहकार्याने शारदोत्सव अश्विन शु.१ ते अश्विन शु.१० पर्यंत साजरा करण्यास प्रारंभ झाला.

१९५४ साल साहित्य संघाच्या इतिहासात खूप महत्वाचे व आनंददायी ठरले. कारण घडले संघाच्या भाऊबंदकी नाटकाचा दिल्लीत झालेला प्रयोग आणि त्याला मिळालेले राष्ट्रीय पारितोषिक. त्याचे असे झाले...त्या साली भारत सरकारने दिल्लीत एक राष्ट्रीय नाट्य महोत्सव ठरवून १४ भाषांतील नाटकांचे आयोजन केले. डॉ. भालेरावांनी भाऊबंदकी नाटकाचा प्रयोग सर्वांगसुंदर होण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. एकूण प्रयोग दृष्ट लागण्यासारखा झाला. परिक्षकांनी संघाच्या या नाट्यप्रयोगाला पारंपरिक विभागामध्ये प्रथम पारितोषिक दिले. थिएटर सेंटरचे हे

पारितोषिक भारताचे त्यावेळचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते संस्थेच्या वतीने श्रीमती दुर्गाबाई खोटे यांनी स्वीकारले. भाऊबंदकी नंतर दिल्लीत प्रेक्षकांसाठी संघाने 'होनाजी बाळा' नाटकाचा प्रयोग केला.


यशवंतरावांचे भाषण

ख्यातनाम नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांची जन्मशताब्दी संघाने साजरी केली (१९५५). त्यावेळी कै. देवलांच्या नाट्यकृतींवर सर्वश्री व. शां. देसाई के. नारायण काळे आणि वि. ह. कुलकर्णी यांची तीन व्याख्याने झाली, तसेच कै. देवलांची सात नाटके सादर केली गेली. याचवर्षी मुंबई सरकारने हौशी नाट्य संस्थांच्या नाट्यस्पर्धा सुरू केल्या. प्राथमिक व अंतिम स्पर्धा संघमंदिरात झाल्या आणि या स्पर्धांची सर्व व्यवस्थाही संघाकडे देण्यात आली होती. या वर्षातील क्लेशदायक घटना म्हणजे संघाचे संस्थापक व संघकार्याची चैतन्यमूर्ती डॉ. अमृत नारायण भालेराव यांचे झालेले अकाली निधन (२५ ऑगस्ट).

१९५६ साल लक्षात राहिलं ते संस्थेने जागा खरेदीच्या कर्जातून मिळवलेली मुक्ती या बाबीसाठी. या काळात संघाचे हितचिंतक, आश्रयदाते व तहहयात सभासद संख्या मोठ्या प्रमाणात वाढली तसेच नाट्योत्सव व नाट्यशाखेची नाटके यामुळे मोठी रक्कम जमा झाली आणि संस्थेने रु. ९१२७९ इतक्या रकमेच्या कर्जाची परतफेड केली. अशाप्रकारे संस्था कर्जातून मुक्त झाली. कर्जमुक्तीदिन राज्यपाल हरेकृष्ण मेहताब यांच्या अध्यक्षतेखाली १९ एप्रिल १९५६ ला समारंभपूर्वक साजरा झाला.

१९५७ साली प्रथमच साहित्य संघाचे मुखपत्र 'साहित्य' या वार्षिकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याच सुमारास भारत सरकारच्या नव्या कॉपीराईट विधेयकात लेखकांवर अन्याय करणाऱ्या काही बाबी होत्या. त्यावर विचार करण्यासाठी संघाने मुंबईतील लेखकांची एक सभा ५ जानेवारी १९५७ रोजी बोलावली. यावेळी नेमलेल्या उपसमितीने तयार केलेले निवेदन लेखकांच्या वतीने सरकारकडे पाठविण्यात आले. २६ जानेवारी १९५७ या दिवशी संघाच्या नाट्यशाखेने पु.ल.देशपांडे लिखित व दिग्दर्शित 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचा प्रयोग सादर केला. या नाटकाने पुढे एका वर्षात २६ प्रयोग करून अभूतपूर्व असे यश मिळविले. ह्या नाटकाने साहित्य संघाला फार मोठे आर्थिक साहाय्य झाले तसेच पु.ल.देशपांडे प्रथम श्रेणीचे नाटककार म्हणून नावाजले गेले.

१९५७ पासून साहित्य संघाचे संस्थापक डॉ.भालेरावांच्या स्मृतिनिमित्त डॉ.अ.ना.भालेराव स्मारक व्याख्यानमाला सुरू झाली. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ नाटककार चिंतामणराव कोल्हटकर यांनी गुंफिले. वर्षभरात महर्षी अप्पासाहेब कर्वे, सर्वोदय नेते जयप्रकाश नारायण तसेच केंद्रीय माहिती व नभोवाणी मंत्री बाळकृष्ण केसकर यांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हंगेरिअन लेखक ऑर्थर कोस्लर यांनी संघाच्या कार्यालयास १ जानेवारी १९५९ रोजी भेट दिली. त्यावेळी मुंबईतील मराठी गुजराती व हिंदी भाषेतील मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. निरनिराळ्या साहित्य विषयक प्रश्नांवर चर्चा झाली. १९५७ च्या अखेरीस संघाने बालनाट्य शाखा सुरू करण्याचे निश्चित केले होते. ही शाखा नाट्यकलावंत सुधा करमरकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होऊन नाटककार रत्नाकर मतकरी लिखित 'मधुमंजिरी' या बालनाट्याचा प्रयोग २ जानेवारी १९५९ रोजी संघमंदिरात झाला. नंतर जादुचा वेल हे बालनाट्य सादर झाले. एकूण बालनाटकाचा प्रारंभ संघाच्या पुढाकाराने मुंबईत सुरू झाला.

७ जानेवारी १९६० हा दिवस संघाच्या इतिहासात महत्वाचा ठरला. कारण या दिवशी संकल्पित संघमंदिराचा कोनशिला समारंभ साजरा करण्यात आला. कोनशिला भारतीय रिझर्व बँकेचे पहिले गव्हर्नर व महाराष्ट्राचे सुपुत्र चिंतामणराव देशमुख यांच्या शुभहस्ते बसविण्यात आली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री व लोकप्रिय नेते यशवंतराव चव्हाण होते.

१९६० साल 'महाराष्ट्र राज्य स्थापना साल' म्हणून सर्वांनाच परिचित आहे. महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या मागणीची सुरुवात मराठी साहित्य संमेलनातून झाली. साहित्य संघातर्फे भरणाऱ्या मुंबई व उपनगर साहित्य संमेलनात १९४५ साली भरलेल्या ९ व्या अधिवेशनापासून ही मागणी सातत्याने होत होती आणि वेळोवेळी भारत सरकार व पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना निवेदने सादर केली जात. नेटाने चालवलेले हे प्रयत्न यशस्वी होऊन महाराष्ट्र राज्य मुंबईसह स्थापन झाले. या आनंदासाठी स्थापना दिवस उत्साहाने साजरा करण्याचे संघाने ठरविले. शिवजयंती उत्सव आणि महाराष्ट्र राज्य स्थापना दिन एकाच दिवशी म्हणजे १ मे रोजी आल्याने या आनंदाला उत्साहाचे स्वरुप प्राप्त झाले. २९ एप्रिलपासून उत्सवाला प्रारंभ झाला. संघमंदिराला ऐतिहासिक किल्ल्याचा साज चढविण्यात येऊन मधल्या दरवाज्यापाशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या तैलचित्राची स्थापना करण्यात आली. संघाचे पूर्ण आवार फुलमाळा व विद्युत रोषणाईने सजविण्यात आले होते. श्रोत्यांना वैचारिक खाद्याची पर्वणी दिली गेली. १ व २ मे यादिवशी साहित्य संघाच्या वतीने तीन विषयांवर परिसंवाद आयोजित केले होते. विषय होते १. नव्या महाराष्ट्र राज्यामध्ये साहित्य संस्थांच्या भावी कार्याचे स्वरूप कसे असावे? २. साहित्याचा सरकारी पुरस्कार आणि त्याबाबत विचार, साहित्य संस्थाच्या विद्यमाने प्रसिद्ध होत असलेली व इतर साहित्य विषयक नियतकालिके, त्यांचे स्वरूप व अपेक्षा. या परिसंवादात मुंबईबाहेरील म.म.द.वा. पोतदार, के. नारायण काळे, डॉ.ना.ग. जोशी, मालतीबाई बेडेकर, चिं.वि.जोशी, प्रा.दि.के. बेडेकर, श्री.ना.बनहट्टी आदि नामवंतांनी तर मुंबईतील प्रा.अनंत काणेकर, श्री.शं.नवरे, दुर्गाबाई भागवत, वा.रा.ढवळे, प्रा.गंगाधर गाडगीळ, प्रा.श्री.पु.भागवत, धों. वि. देशपांडे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, प्रा.माधव मनोहर, प्रा.विद्याधर पुंडलिक, प्रा.गं.बा.ग्रामोपाध्ये या विचारवंतानी भाग घेतला होता. या ज्येष्ठ साहित्यिकांच्या नावांवरून या चर्चा विचार मंथनाने किती परिपूर्ण झाल्या असतील याची कल्पना करता येते.

१९६० मधील आणखी एक ठळक घटना म्हणजे 'तुझे आहे तुजपाशी' या साहित्य संघाच्या नाटकाने साजरे केलेले १०० प्रयोग. हौशी कलावंतानी केलेल्या नाटकाचे १०० यशस्वी प्रयोग होणे ही मराठी रंगभूमीवर त्यावेळपर्यंतची एक अभूतपूर्व घटना होती. एकाच नाटकाचे १०० प्रयोग संघाच्या वतीने करणारे पहिले नाटक. या यशामध्ये नाटकाचे लेखक दिग्दर्शक पु. ल. देशपांडे, नेपथ्यकार चित्रकार द.ग.गोडसे, कलाकार दाजी भाटवडेकर व अरविंद देशपांडे यांचा महत्वाचा वाटा होता.

महाराष्ट्रातील साहित्य संस्थांच्या एकीकरणाचा विचार कारवारच्या साहित्य संमेलनात (१९५१) प्रथमत :



डॉ. भालेराव मार्गाचे उद्घाटन

मांडला गेला. दहा वर्षांच्या दीर्घ परिश्रमानंतर १९६० साली मराठी साहित्य महामंडळाची स्थापना झाली. या महामंडळात म.सा.सं.पुणे, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबादसह मुंबई साहित्य संघ प्रमुख घटक संस्था म्हणून समाविष्ट झाल्या. महामंडळ कार्यकारिणीची पहिली सभा २.१०.१९६१ रोजी संघ कार्यालयात म.प.द.वा.पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रथमपासून अनेक वर्षे महामंडळाचे कार्यालय साहित्य संघात होते. विख्यात साहित्यिक वि.स.खांडेकर यांच्या 'ययाती' कादंबरीला साहित्य अकादमीने १९६० सालचे पारितोषिक जाहीर केले. इतर संस्थांच्या सहकार्याने त्यांचा सत्कार साहित्य संघान केला.

साहित्य संघासाठी १९६१ साल महत्वाचे ठरले. १७ एप्रिल १९६१ रोजी अक्षयतृतियेच्या मुहूर्तावर संघाध्यक्ष प्रा.न.र.फाटक यांनी कुदळ मारून संस्थेच्या इमारतीच्या बांधकामाचा प्रारंभ झाला.

साहित्य संघाचे संस्थापक डॉ.भालेराव यांचे संस्थेतर्फे नाट्यशिक्षण दिले जावे असे एक स्वप्न होते. नाट्य शिक्षणाचे हे स्वप्न साकार करण्याच्या हेतूने संघाने १९६२ साली 'अमृत नाट्य भारती' या नावाने एक योजना सुरू करून त्या अंतर्गत नाट्यशिक्षण देण्याचा संकल्प केला. यावर्षी भारत सरकारच्या वैज्ञानिक अनुसंधान व सांस्कृतिक मंत्रालयाने संघाला ७५०० रु.चे अनुदान दिले.त्यातून संघाने नाटककार वि. वा. शिरवाडकर लिखित 'ऑथेल्लो' नाटकाची निर्मिती केली.

१९६३ वर्षातील आनंदाची घटना म्हणजे संघाचे हितचिंतक डॉ.पां.वा.काणे यांना 'भारतरत्न' ही अत्युच्च पदवी दिली ही होय. या निमित्ताने धर्मशास्त्र पंडित म.म.काणे यांचा भव्य सत्कार संघाने केला. संघाची वास्तू होती त्या केळेवाडीतील रस्त्याचे नाव बदलण्यासाठी संघाचे कार्यकारी मंडळ सदस्य डॉ.बाबा कलगुटकर आणि आप्पा पेंडसे मुंबई महानगरपालिकेत प्रयत्न करीत होते. हे दोघे त्यावेळी नगरसेवक होते त्यामुळे त्या दोघांच्या प्रयत्नांना लवकरच यश आले आणि रस्त्याचे नामकरण 'डॉ.भालेराव मार्ग' करण्याचा प्रस्ताव संमत झाला. २६ मार्च १९६३ रोजी मुंबईचे त्यावेळचे महापौर डॉ. शहा यांच्या हस्ते डॉ.भालेराव मार्ग ह्या फलकाचे उद्घाटन झाले. त्याच वर्षात शास्त्रीय साहित्य समितीची स्थापना करण्यात आली. शास्त्रीय साहित्य आणि परिभाषा यांचा सर्वांगीण विचार करण्यासाठी ही समिती होती. प्रारंभी प्रा.रँगलर, का.रा.गुंजीकर हे समितीचे अध्यक्ष तर म.ना.गोगटे कार्यवाह म्हणून काम पाहत होते. समितीच्या वतीने शास्त्रीय साहित्य विषयक अनेक व्याख्याने आयोजित करण्यात आली आणि या कार्यातूनच कालांतराने मराठी विज्ञान परिषदेची निर्मिती झाली. संघाने

भाऊबंदकी नाटकाचा खास प्रयोग करून त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून रु.१०,१०१ राष्ट्रीय संरक्षण निधीस देणगी म्हणून दिले. फिलिपाईन्स आणि रशिया या देशातील कवी, नाटककार, कादंबरीकार, समीक्षक, पत्रकार यांच्या शिष्टमंडळाने साहित्य संघास भेट देऊन वाङ्मयीन चर्चा केली.

ज्येष्ठ कादंबरीकार (कै.) हरिभाऊ आपटे जन्मशताब्दी महोत्सव संघाने ७ मार्च ते १५ मार्च १९६४ या कालावधीत मु.म.ग्रंथ संग्रहालय आणि आलोचना नियतकालिक यांच्या सहकार्याने साजरा केला. महोत्सवात हरिभाऊंच्या वाङ्मय सेवेवर आठ व्याख्याने झाली तसेच हरिभाऊंच्या 'संत सखू' या नाटकाचा प्रयोग मुद्दाम बसवून सादर केला गेला. हरिभाऊंच्या वाङ्मयीन परिक्षांचे वर्ग संघ घेत होता. या वर्षापासून संघाने स्वत:च्या वाङ्मयीन परीक्षा सुरू केल्या.

संघमंदिराच्या नाट्यगृहाला 'डॉ.अ.ना.भालेराव नाट्यगृह' असे नाव देण्याचे संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेने निश्चित केले होते. त्याप्रमाणे ६ एप्रिल १९६४ रोजी नाट्यगृहाचा उद्घाटन सोहळा करण्याचे ठरले. उद्घाटन भारताचे त्यावेळचे संरक्षणमंत्री मा.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री मा.बाळासाहेब देसाई समारंभाला पाहुणे म्हणून उपस्थित होते. या समारंभाचा एक भाग म्हणून ४५ दिवसांचा नाट्योत्सव आयोजित करण्यात आला. या नाट्योत्सवात मुंबईतील व बाहेरील नाट्यसंस्थांनी (हौशी तसेच व्यावसायिक) भाग घेतला. ८ एप्रिलला या नाट्योत्सवाचे उद्घाटन ना.बाळासाहेब देसाई यांनी केले. या उत्सवासाठी संघाने 'राजयाचा पुत्र अपराधी देखा' (लेखक द.ग.गोडसे), यशवंतराव होळकर (वि.द.घाटे) आणि सरी ग सरी (विजय तेंडुलकर) या नवीन नाटकांचे प्रयोग बसविले होते. या नाट्योत्सवाला सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक कुमार गंधर्व, भीमसेन जोशी यांचे गायन आणि पं.श्री.रवीशंकर यांच्या सतार वादनाची जोड लाभली होती. नाट्योत्सवाच्या साथीने साहित्य विषयक कार्यक्रम आयोजित केले गेले. मराठी साहित्यासंबंधी अनेक विषयांवर व्याख्याने, परिसंवाद, वादविवाद आणि जुन्या व नव्या कवींचे काव्यगायन असा भरगच्च विषयांचा समावेश होता. या संस्मरणीय कार्यक्रमाच्या निमित्ताने एका स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करण्याचे ठरले आणि त्यात साहित्य संघाच्या कार्याचा धावता आढावा, साहित्य विषयक व नाट्यविषयक कार्याचे छायाचित्रांच्या साहाय्याने दर्शन, कार्यकर्त्यांचा परिचय, (कै.) डॉ.अ.ना.भालेरावांचे चित्रमय व शब्दमय जीवनदर्शन आणि महाराष्ट्रातील कलांविषयी मान्यवर अभ्यासकांचे खास लेख यांचा समावेश करण्यात आला. हा स्मृतिग्रंथ २५ ऑगस्ट १९६४ रोजी म्हणजे डॉ.भालेरावांच्या पुण्यतिथीस महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. सुमारे ७०० छायाचित्रांचा समावेश असलेला या सचित्र स्मृतिग्रंथामुळे मराठी साहित्य व रंगभूमी यांचे समृद्ध दर्शन रसिकांना घडले.

१९६५ या वर्षात संघाने दोन ज्येष्ठ साहित्य सेवकांचे सत्कार केले. संघाध्यक्ष प्रा.न.र.फाटक यांच्या वयाला ७० वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यांचा सत्कार म.म.द.वा.पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली झाला आणि पुढे मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व मराठी वाङ्मयाचे भीष्माचार्य द.वा.पोतदार यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांचा सत्कार प्रा.न.र.फाटक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याच वर्षी मुंबईचे शिल्पकार (कै.) नाना शंकरशेठ यांच्या मृत्यूला १०० वर्षे झाली म्हणून प्रा.न.र.फाटक यांची तीन व्याख्याने झाली. व्याख्यानांचा विषय होता, 'नाना शंकरशेठ कालीन मुंबई व नाना शंकर शेठ यांची कामगिरी'.

कवा केशवसुत यांचे जन्मशताब्दी वर्ष (१९६६) महाराष्ट्र शासनाची समिती आणि संघ यांनी संयुक्तपणे साजरे केले. यानिमित्त संघाने वर्षभर व्याख्याने आयोजित केली होती. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात गोखले यांच्या कार्यावर प्रा.न.र.फाटक यांची नऊ व्याख्याने झाली.

कवीवर्य केशवसुत जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ महाराष्ट्र शासन व साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ऑक्टोबर १९६७ ला साजरा करण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ट साहित्यिक वि.स.खांडेकर होते. या वर्षी नटसम्राट गणपतराव जोशी यांची जन्मशताब्दी समारंभ ज्येष्ट अभिनेते पृथ्वीराज कपूर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला आणि त्यावेळी गणपतराव जोशी यांच्या रंगभूमीवरील कारकीर्दीविषयक लेखांचा संग्रह प्रसिद्ध करण्यात आला. कलाविषयक आदानप्रदान करण्याच्या हेतूने तामीळ अकादमीच्या ४० सदस्यांनी संघाला भेट दिली. त्यांना मराठीतील नामवंत साहित्यिक, नाटककार, कलावंत, पत्रकार व संघाचे कार्यकर्ते भेटले. तसेच सुप्रसिद्ध जपानी कादंबरीकार मिशिमा, युगोस्लाव्हियाचे सुप्रसिद्ध साहित्यिक आरमोस्ट लुस्टीव्ह, हंगेरीयन वाङ्मयाचे प्राध्यापक डॉ. पीटर नाज, रशियाचे नाटककार, पटकथा लेखक ब्रागिन्स्की, झेकोस्लोव्हियाचे कथालेखक अर्न्मान हिकीचे यांनी साहित्य संघास भेटी देऊन वाङ्मयीन चर्चा केली.

१९६८ हे वर्ष 'स्मृतिचित्रे' लिहून मराठी साहित्य प्रांतात नाव अजरामर झालेल्या लक्ष्मीबाई टिळक यांचे जन्मशताब्दी वर्ष. त्यानिमित्त संघाने व्याख्याने आयोजित केली, तसेच विचारवंत लेखिका इरावती कर्वे यांच्या 'युगान्त' या बहुचर्चित ग्रंथावर परिसंवाद घडवून आणला. या वर्षापासून साहित्य संघाने एक अनोखा उपक्रम सुरू केला आणि तो होता अनौपचारिक साहित्यिक गप्पांचा. ७ डिसेंबर १९६८ पासून प्रारंभ झालेल्या या गप्पांचा हेतू प्रथितयश व उदयोन्मुख साहित्यिकांनी एकत्र जमावे, केवळ एकत्र येण्यासाठीच जमावे पर्यायाने नव्या ओळखी व्हाव्या, जुन्यांना उजाळा मिळावा आणि त्यांच्यात काव्यशास्त्र विनोद चालावा हा हेतू होता. या कार्यक्रमाला साहित्यिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत गेला.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील थोर स्वातंत्र्यसेनानी महात्मा गांधी यांचे १९६९ हे जन्मशताब्दी वर्ष होते. त्या निमित्ताने नामवंत इतिहास संशोधक व संघाध्यक्ष प्रा.न.र.फाटक यांनी 'महात्माजींच्या जीवनाचे विविध पैलू' या विषयावर ४० व्याख्याने दिली. ही व्याख्याने दर रविवारी होत होती.

१९७० साल भाषा शिक्षणासाठी महत्वाचे ठरले. या वर्षापासून साहित्य संघाने अमराठी भाषिकांसाठी मराठी भाषेचे वर्ग सुरू केले. या उपक्रमाला तमीळ संघ व साहित्यिक या संस्थांचा सहभाग लाभला. चेंबूर, पवई, बांद्रा इ. ठिकाणी हे वर्ग चालविले जात होते. प्रौढांसाठी असलेल्या या वर्गाचा लाभ प्राध्यापक, इंजिनिअर्स, डॉक्टर्स व विविध कचेऱ्यातील अधिकारी व नोकरवर्ग यांनी घेण्यास सुरवात केली. याचवर्षी रशियन भाषा शिक्षणाचे वर्ग तसेच बंगाली भाषा शिकण्यासाठी वंग भाषा प्रचार समितीच्या सहकार्याने वर्ग सुरू झाले. सौंदर्यशास्त्र परिचय वर्गही एस्थेटिक सोसायटी मुंबई या संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आले.

प्रा.न.र.फाटक लिखित 'आदर्श समाजसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले' या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. या आनंदाप्रित्यर्थ प्रा.फाटक यांचा सत्कार १८ मे १९७१ रोजी करण्यात आला. याच वर्षी मुंबई महानगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सव होता. त्या निमित्ताने संघाध्यक्ष प्रा.फाटक यांनी 'मुंबई शहराची बनावट (जडणघडण)' या विषयावर २२ व्याख्याने दिली. संघामध्ये मराठी नाट्यसंगीत या विषयावर पाच दिवसांचा परिसंवाद झाला. त्यात मराठी नाट्यसंगीत-इतिहास, रंगभूमी आणि संगीत आदि विषयांवर प्रा.अशोक रानडे, प्रा.अरविंद मंगसळकर आदि अभ्यासकांची व्याख्याने झाली. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने एक योजना आखली. त्यानुसार नाट्यपथक चालविण्यासाठी साहित्य संघ या संस्थेची निवड सरकारने केली आणि वर्षात तीन नवीन नाटकांच्या निर्मितीसाठी भरीव अनुदान तसेच खर्चासाठी अनुदान केंद्र सरकारकडून संघास मिळाले.

डॉ.भालेराव यांच्या १८ व्या पुण्यतिथीला (२५ ऑगस्ट १९७३) डॉ.भालेरावांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण मुंबईचे महापौर सुधीर जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी हा अर्धपुतळा तयार करणारे शिल्पकार शशिकांत वडके यांचा सत्कार करण्यात आला. यावर्षी नेहमीच्या स्मृतिव्याख्यानमाला, जन्मशताब्दी व्याख्यानमाला याबरोबर समाजशास्त्र, विद्यापीठाचे भवितव्य अशा साहित्येतर विषयांवर व्याख्यानमाला तसेच विद्यापीठीय अभ्यासक्रम व्याख्यानमाला आयोजित केल्या गेल्या. श्रीलंकेचे संस्कृत भाषेचे प्राध्यापक जे.तिलकगिरी, हंगेरीचे लिटरेचर अधिकारी एम. फंक आणि रशियाचे थिएटर विभाग प्रमुख जॉर्जी अलेक्झान्ड्रोविच आयव्हॅनॉव्ह यांनी संघ कार्यालयास भेट दिली.

१९७४ मधली संघाच्या नाट्यशाखेच्या दृष्टीने अभिमानाची घटना म्हणजे 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकाचा युरोपचा दौरा होय. सुप्रसिद्ध जर्मन नाटककार बर्टोल बेख्तच्या 'धी कॉकेशियन चॉक सर्कल' या नाटकाच्या आधारे नाटककार चि.त्र्यं.खानोलकर यांनी 'अजब न्याय वर्तुळाचा' हे नाटक लिहिले. संघाची निर्मिती असलेल्या या नाटकाला जर्मनीत नाट्यप्रयोग करण्याचे आमंत्रण मिळाले आणि नाटककार खानोलकर, दिग्दर्शिका विजया मेहता, संगीत दिग्दर्शक भास्कर चंदावरकर, नाट्यशाखा कार्यवाह डॉ.बाळ भालेराव, प्रमुख कार्यवाह दि.वि.आमोणकर आणि ३५ कलावंत अशा ४० जणांनी जर्मनीचा दौरा केला. 'मराठी नियतकालिके व त्यांचे वाङ्मयीन कार्य' या विषयावर चौदा व्याख्यानांची व्याख्यानमाला ११ ते १४ फेब्रुवारी १९७४ दरम्यान संघात झाली आणि त्यात वा.ल.कुळकर्णी, डॉ.स.गं.मालशे, प्रा. म.ना.अदवंत, प्रा.ल.ग.जोग, प्रा.सरोजिनी वैद्य, प्रा.रा.भि.जोशी, प्रा.भ.श्री.पंडित, वा.रा.ढवळे, डॉ.गं.ब.ग्रामोपाध्ये, प्रा.स.शि.भावे, प्रा.विजया राजाध्यक्ष अशा नामवंत समीक्षकांची व्याख्याने झाली, तसेच कै. नाथमाधव स्मृति व्याख्यानमाला आणि कै.लालजी पेंडसे स्मारक व्याख्यानमाला सुरु करण्यात आली.

१९७५ साली अमराठी भाषा वर्ग, रशियन भाषा वर्ग याबरोबर उर्दू भाषा वर्ग सुरू करण्यात आले. मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे २१ वे अधिवेशन साहित्य संघात सुप्रसिद्ध विचारवंत प्रा.गं.बा.सरदार यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते (२५ व २६ ऑक्टोबर) या संमेलनास यापुढे 'मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन' असे संबोधन करावे असा ठराव करण्यात आला.

विख्यात साहित्यिक वि.स.खांडेकर यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले. त्या निमित्ताने २५ मार्च १९७६ रोजी त्यांचा सत्कार मुंबई विद्यापीठात झाला. साहित्य संघाने त्यात भाग घेतला. 'मुद्राराक्षस' या नाटकाचा भरत नाट्यशास्त्रानुसार प्रथमतः मराठी भाषेत प्रयोग करण्याची विनंती संघाने मान्य केली व त्यानुसार आयोजन केले. मराठीतील प्रयोगानंतर जर्मन भाषेतील प्रयोगासाठी दिग्दर्शक (विजय मेहता), नेपथ्यकार (द.ग.गोडसे) व संगीतकार (भास्कर चंदावरकर) यांनी जर्मनीत जाऊन सर्व सिद्धता करून दिली. २ फेब्रुवारी १९७६ रोजी 'एका पिढीचे आत्मकथन' (वा.रा.ढवळे गौरव ग्रंथ) या साहित्य संघ प्रकाशित ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ट साहित्यिक प्रा.अनंत काणेकर यांनी केले. या वर्षात जॉर्डनच्या क्राफ्ट्सच्या अध्यक्षा मिसेस जेन्सेट शॅमी, नेपाळचे रंगभूमी कार्यकर्ते, कवी-नाटककार विजय माल्ल यांनी संघ कार्यालयास भेट दिली.

सुप्रसिद्ध विचारवंत साहित्यिक प्रभाकर पाध्ये यांनी 'वामन मल्हार आणि विचार सौंदर्य' या विषयावर तीन व्याख्याने दिली होती. त्या व्याख्यानाचे पुस्तक त्याच शीर्षकाने साहित्य संघाने प्रकाशित केले (१९७७). जर्मनीचे नाट्यनिर्माते कोनराड शिड्रीच आणि सोवियत संघाच्या प्रकाशिका मासालकीना नाटालिया यांनी संघास भेट देऊन अनु. नाटक व साहित्य विषयक चर्चा केली.

संस्थेचा ४२ वा वर्धापनदिन २७,२८ व २९ ऑक्टोबर १९७८ या तीन दिवसात साजरा झाला. समारंभाचे महनीय प्रवक्ते होते न्या. चंद्रशेखर

धर्माधिकारी. यावेळी संघाच्या ४३ वर्षातील विविध कार्याचा परिचय करून देणारी स्मरणिका प्रसिद्ध करण्यात आली. वर्षभरात ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त तमीळ कथाकार आखिलन तसेच सुप्रसिद्ध कन्नड लेखक प्रा.वि.के.गोकाक यांनी भेट देऊन सत्कार स्वीकारला. हौशी व प्रायोगिक रंगभूमीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने संघाने मे १९७८ पासून बुधवार योजना (सवलतीच्या दराने नाट्यगृह) चालू केली. योजनेला चांगला प्रतिसाद मिळत गेला.

साहित्य संघाचे १९५० पासून १९७९ पर्यंत सतत अध्यक्ष असलेले प्रा.न.र.फाटक यांचे निधन झाले (२१ डिसेंबर १९७९). अध्यक्षीय कारकीर्दीत त्यांनी अनेक व्याख्यानमाला गुंफून ३०० च्या वर व्याख्याने संघासाठी दिली. त्यांच्या शोकसभेस संस्थेने प्रा.न.र.फाटक स्मारक संशोधन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हे संशोधन केंद्र पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली १९८० साली नोंदविण्यात आले तसेच मुंबई महानगरपालिकेने ५० हजार रु.चे अनुदान जाहीर केले.

१९८१ साली संघदिनाला जोडून एक नाट्योत्सव मुंबई व ठाणे येथे आयोजित करण्यात आला होता. समारोपासाठी महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री बॅ.अंतुले आले होते. संस्थेची आर्थिक परिस्थिती समजल्यावर त्यांनी मुख्यमंत्री निधीतून रु.पाच लाखाचा धनादेश समारंभात प्रमुख कार्यवाह दाजी भाटवडेकर यांच्या हात दिला. या मदतीमुळे संघ इमारत बांधकामासाठी झालेल्या कर्जातून मुक्त झाला.

साहित्य संघाच्या पुढाकाराने नाट्य व चित्रपट क्षेत्राशी संबंधित असे कन्नड, बंगाली व मल्याळी भाषांमधील लेखक ३० एप्रिल १९८२ ला एकत्र आले. यावेळी सुप्रसिद्ध व्यावसायिक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी 'मॉडर्न मराठी थिएटर' या विषयावर निबंध वाचला. विविध भाषांमधील रंगभूमीवर कोण-कोणत्या चळवळी चालू आहेत यावर लेखकांमध्ये चर्चा झाली. साहित्य संघाने 'सौंदर्य विचार' हे पुस्तक प्रकाशित केले. (कै.) प्रा.न.र.फाटक संशोधन केंद्राचे उद्‌घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले (१५ ऑगस्ट १९८२). याचवेळी संशोधन केंद्राची एकवीस जणांची कार्यकारी समिती नेमण्यात आली.

संघाने नामवंत विचारवंत कार्ल मार्क्स जन्मशताब्दी निमित्त ज्येष्ठ पत्रकार पा.वा.गाडगीळ यांचे 'कार्ल मार्क्स आणि वर्ग युद्ध' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते (२३ एप्रिल १९८३) तसेच 'ग्रंथ प्रकाशन आणि प्रसार' या विषयावर उद्‌बोधक परिसंवाद आयोजित केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात प्रसिद्ध पत्रकार व प्रकाशक यांनी भाग घेतला. या वर्षी संघाने 'साहित्य' मुखपत्राचा दिवाळी अंक प्रकाशित केला. त्याचे संपादन उमाकांत ठोमरे यांचे होते.

संघाचे रौप्यमहोत्सवी वर्ष महानगर सा. संमेलन बोरीवली येथे झाले (२५ व २६ फेब्रुवारी १९८४). संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध इतिहास संशोधक सेतु माधवराव पगडी होते. अमृतनाट्य भारती शाखेतर्फे राज्यसंगीतनाट्यस्पर्धेत तरूण कलावंतांनी 'मानापमान' नाटक सादर केले. पुण्यात थोरले बाजीराव पेशवे स्मारक समितीने बाजीरावाचा पूर्णाकृती पुतळा बसविला. त्या प्रसंगी साहित्य संघाने 'रविराज तो मी रोहिणी' (बाजीराव मस्तानी) हे नवीन नाटक सादर केले.

संघाचा सुवर्णमहोत्सवी संघदिन २० ऑक्टोबर १९८५ रोजी झाला. समारंभात समीक्षक डॉ. विजय कोलते प्रवक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी भाषणात मराठी भाषेच्या सद्यस्थितीबद्दल विवेचन केले. यावेळी साहित्य संघातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचा गौरवपदके देऊन सत्कार करण्यात आला. तसेच 'साहित्य संघाची ५० वर्षे' हा शं.ना.अंधृटकर संकलित इतिहास खंडाचे प्रकाशन झाले.

संघाची ही लखलखती वाटचाल भावी काळासाठी पथदर्शक ठरली.

**- अशोक बेंडखळे**
९८६९२५८५८५

# जगन्नाथाचा रथ

## (१९८५-२०१५)

- सुहासिनी कीर्तिकर

मुंबई मराठी साहित्य संघ ही साहित्य समाज संस्कृतीची संस्कारी प्रतिमा आहे. ही प्रतिमा या संस्थेने आपल्या उज्ज्वल कार्याने उभी केली आहे. संस्थेच्या अष्टदशकपूर्ती वर्षानिमित्त या कार्याचा आढावा घेणे उचित ठरावे. १९८५ ते २०१५ या उत्तरकाळातील महत्त्वाच्या घटनां-उपक्रमांचा म्हणूनच हा आढावा -

संस्था स्थापन झाली तेव्हा मुंबई महानगरातील ती एक प्रमुख चळवळ ठरली. म्हणूनच साहित्य संघाचा वर्धापनदिन २८ ऑक्टोबरला प्रतिवर्षी उत्साहात साजरा होतो. प्रमुख पाहुणे म्हणून आजवर महापौर, मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, कुलगुरु, सांस्कृतिक मंत्री, साहित्यिक, विचारवंत यांनी या वर्धापनादिनाला शोभा आणली आहे. २००१ या वर्षी डॉ. अ. ना. भालेराव यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. त्यावर्षी माननीय शरदचंद्रजी पवार खास आले होते. डॉ. अ. ना. भालेराव यांचा २५ ऑगस्ट रोजी येणारा स्मृतिदिनही साहित्य संघ कृतज्ञेने साजरा करतो. त्यालाही अनेक मान्यवर आवर्जून येतात.

साहित्य, संस्कृती, नाट्यक्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींबद्दलही साहित्य संघ कृतज्ञ आहे. म्हणूनच त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त साहित्य संघाने अनेक व्याख्यानमाला आयोजित केल्या. त्यापैकी काहींचा येथे उल्लेख होणे आवश्यक आहे. कै. श्री. अ. बा. गजेंद्रगडकर हे साहित्य संघाचे पहिले अध्यक्ष. गजेंद्रगडकर कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून साहित्य संघाचे संदर्भग्रंथालय उभे राहिले. या ग्रंथालयात अ. बा. गजेंद्रगडकरांचा अर्धपुतळा विराजमान आहे. २००८ पर्यंत त्यांच्या स्मृतिदिनी म्हणजे ८ नोव्हेंबरला या ग्रंथालयात स्मृतिदिन साजरा होई. या ग्रंथालयात आजघडीला १४ हजार पुस्तके आहेत. शिवाय अभ्यासिकाही. २००८ नंतर ८ नोव्हेंबर 'प्रकाशक दिन' म्हणून साजरा होत आहे. त्यात व्याख्याने आयोजित केली जातात. लालजी पेंडसे स्मृतीव्याख्यानमाला १९८६ ते १९९५ पर्यंत साजरी झाली. कै. अण्णा मार्तंड जोशी व्याख्यानमालाही १९९५ पर्यंत दरवर्षी होई. कै. नाथमाधव स्मारक व्याख्यानमाला १९९९ पर्यंत साजरी झाली. कै. ल. ग. जोग स्मारक व्याख्यानमाला १९९६ पर्यंत साजरी झाली. कविवर्य अनिल स्मारक व्याख्यानमाला १९८६-८७ या दोन वर्षी झाली. का. रा. मित्र स्मृती व्याख्यानमाला (१९९६ पर्यंत), वामन मल्हार जोशी स्मारक व्याख्यानमाला (१९८७), न्यायमूर्ती भा.ना. गोखले स्मृती व्याख्यानमाला (१९९५ पर्यंत). अशा व्याख्यानमाला अतिशय दर्जेदार असत. मात्र पुढे पुढे निधीच्या अभावी या 'माला' बंद करून महानगर वा महाविद्यालयीन साहित्य संमेलनातील विविध चर्चासत्रे यांच्या स्मृतिनिमित्त आता आयोजित केली जातात.

व्याख्यानमाला, चर्चासत्रे, परिसंवाद आयोजित करून साहित्य संघ साहित्यिक, वैचारिक मेजवानीच देत असतो. या मेजवातीत भर पडते ती साहित्य संघाने साजरा केलेल्या मान्यवरांच्या जन्मशताब्दी सोहळयामुळे. १९८८ मध्ये नटवर्य केशवराव दाते जन्मशताब्दी, १९९० मध्ये नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर जन्मशताब्दी, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार जन्मशताब्दी (१९९०), संगीतसूर्य केशवराव भोसले जन्मशताब्दी (१९९०), तसेच चिं. वि. जोशी (१९९२), ना. सी. फडके, बालगंधर्व (१९८८), त्र्यं.शे. शेजवलकर (१९९५), वि.स.खांडेकर (१९९७) प्र.के. अत्रे (१९८८), ग.त्र्यं. माडखोलकर (१९९९), कवी यशवंत (१९९९) बापूराव पेंढारकर (२००५) चं.वि.बावडेकर (२००६), सोपानदेव चौधरी (२००७), बा.सी.मर्ढेकर (२००९) वि.वा. शिरवाडकर (२०१०) आदींबद्दल कृतज्ञता बाळगून साहित्य संघाने त्यांच्या जन्मशताब्दीचे निमित्त साधून

त्यांच्या कार्यकर्तृत्वाशी संबंधित कार्यक्रम सादर केले. साहित्य संघाचे संस्थापक डॉ. अ. ना. भालेराव यांची जन्मशताब्दी (२००१) याच कालखंडात होती. साहजिकच साहित्य संघाने ती पूर्ण वर्षभर विविध उपक्रम राबवून थाटात साजरी केली. 'अमृत गौरव स्मरणिका'- (संपादक - शि. मो. घैसास ) आणि 'आमचे बापू विशेषांक' (संपादक- कुंदा पडळकर, मोनिका गजेंद्रगडकर ) हे दोन विशेष ग्रंथ यानिमित्त शरदराव पवार यांच्या हस्ते प्रकाशित झाले. विविध नाट्यप्रयोग, परिसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने याबरोबरच या वर्षी भाषाभगिनी कवी संमेलन (संयोजन - निरंजन उजगरे) आणि प्रायोगिक नाटकांचा 'रंगोत्सव' (संयोजन - रेखा सबनीस) साजरा झाला. अमृत रसरंगयात्रा (संयोजन-माधव खाडिलकर), 'अमृतकुंभ' त्रिस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन हे या जन्मशताब्दी वर्षाचे खास विशेष म्हणावे लागतील. वर्षभर चाललेली ही जन्मशताब्दी म्हणजे खऱ्या अर्थाने 'अमृत सोहळाच' होता.



मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन (१९९८)

याच काळखंडात १९९४ मध्ये मराठी रंगभूमीला १५० वर्षे पूर्ण झाली. त्याची आठवण ठेवून साहित्य संघाने कार्यक्रम केला. १९९५ या पाठोपाठाच्या वर्षात फ्लोरा सॅम्युएल भारतात आल्या होत्या. इस्त्राइल येथे स्थलांतरित झालेल्या, 'मायबोली' या मराठी त्रैमासिकाच्या संपादिका आणि जागतिक मराठी परिषदेच्या कार्यकर्त्या सॅम्युअलबाईंचा साहित्य संघाने आवर्जून सत्कार केला. (मुंबई ग्रंथ प्रकाशन संघटना आणि जा.म.परिषदेचे सहकार्य लाभले होते.) अशी मान्यवरांची दखल सा. संघ नेहमीच घेत आला आहे.

१९९८ पासून साहित्य संघाचे तत्कालिन अध्यक्ष श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या प्रेरणेने साहित्य संघाने 'साहित्याच्या प्रांगणात'हा उपक्रम सुरु केला. फार पूर्वी साहित्य संघ हा साहित्यिकांच्या गप्पांचा अड्डा होता. अनेक शनिवार या गप्पांनी रंगून जात. 'साहित्याच्या प्रांगणात'मुळे त्याला एक वेगळेच पुनरुज्जीवित रुप प्राप्त झाले. प्रसिध्द झालेले एखादे पुस्तक घेऊन त्यावर मान्यवरांच्या चर्चा, त्या पुस्तकाच्या लेखकाचाही समावेश त्यात- असे या कार्यक्रमाचे स्वरूप असे. रामदास भटकळ यांचे 'जिगसॉ' सुमा करंदीकर यांचे 'रास', मेघना पेठे यांचे 'हंस अकेला'अशी पुस्तके यामुळे साहित्यिक वर्तुळात विशेष चर्चेत आले. याच धर्तीवर 'चिं. त्र्य. खानोलकर दर्शन' चाही एक कार्यक्रम साजरा झाला.

या कार्यक्रमांमुळे सामान्य वाचकांना एक दिशा मिळाली. ही दिशा अधिक मार्गदर्शक असावी या प्रेरणेतून साहित्य संघाने 'साहित्याचा आस्वाद' नावाचा उपक्रमही दोन वर्षे हाती घेतला. नाममात्र शुल्क भरून चौदा आस्वादक या वर्गात दाखल झाले. प्रा. सुहासिनी कीर्तिकर, डॉ. सुधा जोशी, डॉ. हरिश्चंद्र थोरात, डॉ. मंगला आठल्येकर यांनी या वर्गात मार्गदर्शन केले.

'साहित्याच्या प्रांगणात', 'साहित्याचा आस्वाद'सारखे उपक्रम साहित्याशी निगडीत होते. सामान्य माणसाच्या रोजच्या जीवनाशी निगडित प्रश्नांवर / घटकांवर 'विचार संवाद' हा उपक्रम राबविला गेला. संघाध्यक्ष गंगाधर गाडगीळांच्या, कल्पकतेतून हा उपक्रम सुरु झाला. 'आजची बदलती कुटुंब व्यवस्था ', 'तरूणांचा वाढता धर्मभोळेपणा' असे विषय पाहिले की या

उपक्रमाची व्याप्ती लक्षात येते. श्रोत्यांचा याला लक्षणीय प्रतिसाद होता.

संघाचे तत्कालिन अध्यक्ष ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकर यांनी मराठी भाषेच्या कालक्रमणानुसारे विविध वक्त्यांची भाषणे आयोजित केली. या उपक्रमाला 'अमृत व्याख्यानमाला' असे सार्थ नाव दिले गेले. या मालेअंतर्गत शिवशाहीर बाबासाहेब पुंरदरे, डॉ सिसिलीया कार्व्हालो, डॉ. मो.दि. पराडकर, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. अरूण टिकेकर, डॉ. सुधाकर देशपांडे, डॉ.निशिकांत मिरजकर, डॉ.कुमुद गोसावी, प्रा.म.रा.जोशी, डॉ.द.ता. भोसले, आदी विचारवंतांची भाषणे झाले. ही व्याख्याने हा मराठी साहित्याचा एक दस्तावेज असल्यामुळे त्याचे संकलन करणारे 'मराठी बोलू कौतुके' हे पुस्तकही साहित्य संघाने प्रकाशित केले. (संपा.-अशोक बेंडखळे, प्रा. उषा तांबे). याच मालिकेतील दुसरे पुस्तक 'इये मराठीचिये नगरी' (संपादक-अशोक बेंडखळे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे) नुकतेच प्रकाशित झाले.

मुंबई मराठी साहित्य संघ फार पूर्वी उपनगर मराठी साहित्य संमेलन भरवीत असे. मात्र मध्ये त्यात काही कारणाने खंड पडला होता. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालिन अध्यक्ष डॉ. य.दि.फडके यांच्या प्रेरणेने ही संमेलने परत सुरु करण्यात आली. 'उपनगर' ऐवजी ती 'महानगर मराठी साहित्य संमेलने' म्हणून साजरी झाली. १९९५ पासून सुरु झालेली ही संमेलने साहित्य संघाबरोबरच इतर ठिकाणीही घेण्यात आली. एक कौतुकास्पद नोंद म्हणजे या महानगर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचेही अध्यक्ष झाले! विविध चर्चासत्रे, परिसंवाद, मुलाखत, कविसंमेलन, नाट्यप्रवेश, अभिरुप न्यायालय, कथानुभव, कथाकथन, प्रकाशकांचे अनुभव अशा विविध कार्यक्रमांनी ही संमेलने रसिकांच्या आठवणीत राहिली आहेत.

महानगर साहित्य संमेलन सर्वसाधारणपणे अनेक साहित्य संस्था भरवीत असतात. मात्र तरूणाईला साहित्याशी, साहित्य संस्थेशी जोडून घेण्यासाठी साहित्य संघाने एक वेगळाच उपक्रम हाती घेतला आहे. महाविद्यालयीन मराठी साहित्य संमेलन दर वर्षी घेण्यात येते. विद्यार्थ्यांचे, विद्यार्थ्यांकरिता, विद्यार्थ्यांनी साजरे केलेले साहित्य संमेलन खासच आहे. कोणत्याही राजकारणी पक्षाचा झेंडा न मिरवता संमेलनाचा बाज सर्व साहित्यसंस्थामध्ये प्रथम मुं. म. साहित्य संघाने आणला. असे संमेलन घेण्याची संकल्पना कविवर्य निरंजन उजगरे यांची . या उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक केले. २००३ साली हे पहिले संमेलन (अध्यक्ष-वीणा गवाणकर, उद्घाटक-शफाअत खान, प्रमुख पाहुण्या निशिगंधा वाड ) झाले आणि आतापर्यंत ही परंपरा कायम राहिले आहे. यातील सहभागी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी आधी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा घेतली जाते. तसेच कवींची निवड करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कविता मागवण्यात येतात. अत्यंत यशस्वी अशा या उपक्रमात मुंबईतील महाविद्यालये सामील असतात. विशेष म्हणजे या निवडल्या गेलेल्या विद्यार्थीवक्त्याला साहित्य संघाच्या इतर उपक्रमातही सहभागी करून घेतले जाते आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातही सहभागी होण्याची त्याला / तिला संधी दिली जाते.




महाविद्यालयीन मराठी साहित्य संमेलन (२००४)




साहित्य महोत्सव २०११ - उद्घाटन सोहळा

१९९५ मध्ये साहित्य संघाने सुवर्णमहोत्सवी संघदिन साजरा केला. 'साहित्य संघाची पन्नास वर्षे'- (संकलन शं.ना.अंधृटकर) ही सुवर्णमहोत्सवी स्मरणिका यानिमित्त प्रकाशित झाले. 'मराठी शाहीर' हे स.ग.मालशे संपादित पुस्तकही यावर्षी संघाने प्रकाशित केले.

'ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी कार्यक्रम' (१९८०), समर्थ रामदास व्यक्तीदर्शन (१९९३) हे आणि असे साहित्यिक उपक्रम संघात होतातच. पण त्याच जोडीने अनेक वर्षे 'केंद्रीय अर्थसंकल्पा'वर परिसंवाद आयोजित केले गेले. १९९२ ते १९९५ असे सलग चार वर्षे हे परिसंवाद श्रोत्यांना अर्थभान देऊन गेले.

काही खास उल्लेखनीय उपक्रम आता पाहूया. १९९५ साली 'गोमंतक मराठी अकादमी'च्या सहकार्याने पणजी येथे गंगाधर गाडगीळ यांच्या साहित्यावर चर्चासत्रे दोन दिवस रंगले. 'उगवतीचे रंग' नावाने नवोदितांचे कविसंमेलन १९९८ मध्ये घेण्यात आले. २००४ साली उत्तरपूर्व आणि पश्चिम विभागीय काव्योत्सव साजरा झाला. त्यात आसामी, सिंधी, उर्दू, मणिपुरी, नेपाळी, गुजराती, बंगाली मराठी कवितांचे वाचन झाले. २००७ मध्ये 'कविता सादरीकरण शिबीर ' घेण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते झाले. तर शंकर वैद्य यांनी समारोप केला. यात ३० कवी सहभागी झाले होते. २००८ पासून ८ नोव्हेंबरला 'प्रकाशन दिन' साजरा होऊ लागला. याच समारंभात 'वि.पु.भागवत' पुरस्काराचे वितरण करण्यात येते.

१९९५ साली सा. संघाने आपला हीरकमहोत्सव साजरा केला; तर २००९ मध्ये आपले अमृतमहोत्सवी वर्षे साजरे केले. संस्था ही नेहमीच बर्धिष्णु असते; याचे हे प्रत्यंतर.

२०११ या साली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळांस पन्नास वर्षे पूर्ण झाली. साहित्य आणि संस्कृती मंडळाने मुंबईतील महोत्सवाचे यजमानपद अपार विश्वासाने साहित्य संघास दिले. साहित्य संघाने हा विश्वास सार्थ ठरवून 'तीन दिवसीय साहित्य महोत्सव' दणक्यात साजरा केला. उद्घाटनास मुंबईचे तत्कालीन पालकमंत्री श्री. जयंतराव पाटील उपस्थित होते. या महोत्सवास अतिशय चांगला प्रतिसाद लाभला. २०११हे वर्ष खास गाजले ते या महोत्सवाने; तसेच इंडियन एज्यु.

सोसायटीच्या सहकार्याने झालेल्या अपूर्व सांस्कृतिक सोहळ्याने. याच वर्षी डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या नावे पुरस्कार सुरु होऊन प्रथम पुरस्कार डॉ. सु.रा.पुनेकरांना प्रदान करण्यात आला. याचवर्षी रुईया महाविद्यालयाच्या सहकार्याने वा.ल.कुळकर्णी आणि गंगाधर गाडगीळ यांच्या समीक्षेवर पूर्ण दिवसभर दोन चर्चासत्रे आयोजित केली गेली. एकूणच २०११ साल साहित्य संघाने विविध उपक्रमांनी गाजवले.

साहित्य संघाचे आणखी एक वेगळेपण इथे अधोरेखित करावयास हवे. वा.रा.ढवळे यांच्या प्रेरणेने प्रौढ अमराठी भाषकांना मराठी शिकविण्याचे वर्ग चालू झाले. अनेक वर्षे बोरीवली, वांद्रे, माटुंगा, सायन, चेंबूर, अंबरनाथ, गिरगाव येथे हे वर्ग चालत. सध्या मात्र सायन, चेंबूर  आणि गिरगाव या तीन केंद्रात हे वर्ग चालू असून संचालक म्हणून सुहासिनी कीर्तिकर काम पहातात. श्री. एकनाथ आव्हाड, सौ. मिनाक्षी जयकर, श्री. सुहास लिमये आणि सुहासिनी कीर्तिकर या वर्गात शिकविण्याचे कार्य करतात. महानगर पालिका शिक्षण विभागातर्फे अमराठी भाषक असलेल्या मराठी शिक्षकांसाठी दोनदा कार्यशाळा घेण्यात आली. त्या कार्यशाळेत या उपक्रमाचा भाग म्हणून सुहासिनी कीर्तिकरांनी शिकविले. तसेच महाराष्ट्र मंडळ, वांद्रे येथे दोनदा तीन तीन महिन्यांचे वर्ग घेण्यात आले. तेथे अध्यापनाचे काम मिनाक्षी जयकर यांनी केले. महाराष्ट्र राज्य आयकर विभागातील अमराठी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांकरिता एक महिन्याचे असे दोनदा मराठीचे प्रशिक्षणवर्ग घेण्यात आले. या वर्गांसाठी सुहासिनी कीर्तिकर, निलिमा साधले, जयवंत चुनेकर, सुहास लिमये यांचे योगदान लाभले. अभिनेत्री जेनेलिया, अभिनेता आमिर खान, डॉ. विभा सुराणा (मुंबई विद्यापीठ जर्मन विभाग प्रमुख) यांना मिनाक्षी जयकर आणि सुहास लिमये यांनी या वर्गांचे प्रतिनिधी म्हणून खाजगीत शिकवले. यातूनच मुंबई विद्यापीठात मराठी आणि जर्मन विभागातर्फे दोन चर्चासत्रे आयोजित केली गेली. त्यात या शिक्षकांचा सहभाग होता. त्याचे फलित म्हणून जर्मन विभागातर्फे मराठीच्या अभ्यासक्रमाचे पुस्तक प्रकाशित झाले. त्यात संपादक म्हणून (कै.)जयवंत चुनेकर आणि श्री. सुहास लिमये यांचा सहभाग आहे. सुहासिनी कीर्तिकरांनी यांचे पुस्तक प्रकाशनासाठी सहाय्य झाले.

साहित्य संघाचे 'साहित्य' नावाचे त्रैमासिक मुखपत्र नियमाने प्रकाशित होते. दिवाळी अंक विशेषांक म्हणून निघतो. सद्य संपादक श्री. अशोक वेंडखळे आहेत. विविध पुरस्कारांनी 'साहित्य' गौरविले गेले आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची साहित्य संघ ही घटक संस्था आहे. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनात दिली जाणारी काही पारितोषिके संघातर्फे कार्यवाही होऊन दिले जातात. संमेलनातील एक कार्यक्रम साहित्य संघ प्रायोजित करते. संमेलनात सा. संघाची पुस्तके, नियतकालिके, ऐतिहासिक क्षण टिपणारी छायाचित्रे आदींसाठी एक गाळा असतो. सा. संघाकडे या कार्यकाळात दोनदा कार्यालय तीन वर्षांसाठी होते. पहिल्यावेळी अध्यक्ष - वसुंधरा पेंडसे नाईक, कोषाध्यक्ष - डॉ. बाबा कलगुटकर आणि नंतर निरंजन उजगरे, कार्यवाह - पद्मा घारपुरे व नंतर सुहासिनी किर्तिकर होते. दुसऱ्या वेळी अध्यक्ष - उषा तांबे कोषाध्यक्ष - गुरुनाथ दळवी व कार्यवाह - उज्ज्वला मेहेंदळे होत्या. वसुंधरा पेंडसेनाईक यांची 'महाकोषा' ची घोषणा, सीमावासियांच्या प्रश्नांसाठी धरणे, धरणे, संघाने ६० वे हीरकमहोत्सवी संमेलन दादर येथे यशस्वी रित्या घेणे, चर्चासत्रे, 'अक्षरयात्रा' या वार्षिकाचे संपादन, 'विश्व मराठी साहित्य संमेलना' त सहभाग, महामंडळाचा वर्धापनदिन इ. बाबी साहित्य संघाने जबाबदारीने पेलल्या.

साहित्य संघाचे दोन आधारस्थाने किंवा कार्यपंख आहेत. एक - साहित्य शाखा. दोन - नाट्यशाखा. नाट्यशाखेतर्फे राज्यस्तरीय अनेक नाट्यस्पर्धात सहभाग असतो आणि अनेक बक्षिसेही पटकाविली जातात.

१९९४ मध्ये १९३४ साली केलेल्या नाट्योत्सवास ५० वर्षे झाल्या निमित्ताने आणि रंगभूमीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्ताने नाट्योत्सव साजरा झाला. नवीन नाटकांची निर्मिती, जुन्या नाटकांचे पुनज्जीवन हे साहित्य संघाने आपले उद्दिष्ट मानले आहे.

'अमृत नाट्य भारती' हा नाट्यशाखेचा चांगला उपक्रम आहे. प्रायोगिक नाटके, नवोदितांना प्रोत्साहन, नाट्यशिक्षण आदींसाठी हा उपक्रम आधार देतो. आणखी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे साभिनय नाट्यसंगीत प्रशिक्षणवर्ग घेणे. चंद्रचूड वासुदेव, विलास हर्वे, जयदेव हट्टंगडी, अरविंद पिळगावकर, रजनी जोशी यांनी हे प्रशिक्षण वर्ग घेतले. साहित्य संघाचा आणखी एक उपक्रम म्हणजे 'रंगोत्सव २००२' मध्ये याचे उद्‌घाटक दामू केंकरे यांच्या हस्ते झाले. रंगकर्मींना साहित्य संघाचा रंगमंच इतर सुविधांसह उपलब्ध करून दिल्याने अनेक संस्थानी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवला. साहित्य रंगाचे रंगभूमीवरील पडदे खास रंगविलेले आहेत. 'बालगंधर्वांचा हार्मोनियम' ही ऐतिहासिक ठेव संघाकडे आहे. याला प्रसिध्दी माध्यमांनी यथोचित प्रसिध्दीही दिली.

'रंगोत्सवा'प्रमाणेच 'रंगसंग' (२००४) हा उपक्रमही राबविला गेला. 'रंगसंग'मध्ये प्रायोगिक नाटके सादर झाली. २००२ पासून साहित्य संघाची नाट्यशाखा 'अमृतकुंभ' ही त्रिस्तरीय एकांकिका स्पर्धा आयोजित करते. हौशी कलाकारांसाठी, कार्यालयीन स्तरावर आणि आंतर महाविद्यालयीन असे याचे तिहेरी स्वरूप आहे.त्याला अर्थातच चांगला प्रतिसाद मिळतो. २००३ साली. सा. संघाने 'संगीत नाटयोत्सव' ठाणे, पुणे, रत्नागिरी अशा विविध ठिकाणी साजरा केला. प्रौढांसाठी सभिनय संगीत प्रशिक्षणाप्रमाणेच २००४ पासून लागोपाठ तीन वर्षे लहान मुलांसाठी अभिनय शिक्षण शिवीराचे आयोजन करण्यात आले होते. याचे संचालक होते शिवराज घोडके. 'दाजी भाटवडेकर स्मृतिदिन' नाट्यशाखा साजरा करते. त्यात नाटयप्रवेश, नाटयसंगीत आदींचा समावेश असतो.

याशिवाय 'रंगगंध अमृताचा' हा साहित्य संघाचा नाट्यप्रवास उलगडून दाखविणारा कार्यक्रम २००९ मध्ये करण्यात आला. दामू केंकरे यांच्या निधनानंतर केंकरे कुटुंबीयांच्या देणगीतून 'दामू केंकरे स्मृति नाटयमहोत्सव' सुरु करण्यात आला. (२०१३)

नाट्यशाखेचा वाखाणण्याजोगा म्हणावा असा उपक्रम म्हणजे बहुभाषिक नाटयप्रशिक्षण. ड्रामा स्कूलच्या सहकार्याने एक वर्षभराचा नाटयकलाविषयक अभ्यासक्रम या उपक्रमाअंतर्गत घेतला जातो. गीताजंली कुलकर्णी आणि अनिरुध्द खुटवड यांचे मार्गदर्शन याकरिता लाभते. यातील विद्यार्थ्यांनीही 'दामू केंकरे' 'स्मृति महोत्सवा' त काही नाटके (हिंदी, इंग्लिश) सादर केली.

नाटयशाखेने आजवर अनेक स्पर्धांत सहभाग नोंदवून विविध स्तरांवरील अनेक पारितोषिके संघाला मिळवून दिली आहेत. रंगभूमीचा इतिहास आणि नाट्यसंमेलनातील अध्यक्षांची माहिती अशा स्वरुपाची पुस्तके प्रकाशित केली आहेत.

१९९५ ते २०१५ या कालखंडातील संघाची प्रकाशनानेही महत्त्वाची आहेत. त्यांची यादी नजरेखालून घालू.

- **साहित्य संघाची पन्नास वर्षे -**
  लेखन, संकलन - शं. ना. अंधृटकर
- **सुवर्णमहोत्सवी स्मरणिका**
- **मराठी शाहीर**-लेखक-श्री.म.वर्दे,
  संपादक-डॉ. स.गं.मालशे
- **आमचे बापू विशेषांक आणि अमृतगौरव स्मरणिका**
- **अमृत नाट्यगाथा** - माधव खाडिलकर
- **अमृतस्मृती** (२००९)
- **एका मुंबईकराची कहाणी**
  काशिनाथ त्र्यंबक तेलंग अल्पचरित्र /

दीर्घकथा - गंगाधर गाडगीळ

- **एका पिढीचे आत्मकथन**
  -दुसरी आवृत्ती (२०००)
  संपादक - पु.शि. रेगे, वा.ल.कुलकर्णी,
  रा.भि.जोशी, गं.बा. ग्रामोपाध्ये
- **दुसऱ्या पिढीचे आत्मकथन** (२००८)
  संपादक - डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
- **मराठी बोलू कौतुके**
  संपादक - प्रा. उषा तांबे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
- **महामंडळ शुध्दलेखन** (२००९)
- **ज्ञानतपस्वी रुद्र** (न.र.फाटक यांचे चरित्र) -
  लेखक - अचला जोशी
- मराठी नाटयसंमेलनातील अध्यक्ष
  **'नाटयसूर्यमाला' भाग २-**
  संकल्पना - शं.ना.अंधृटकर,
  संपादन-सुभाष भागवत
- मराठी साहित्यसंमेलनाध्यक्षांची सचित्र ओळख -
  **'मराठी साहित्य सूर्यमाला'**
  संकल्पना - शं.ना. अंधृटकर,
  संपादन-प्रा.सुहासिनी कीर्तिकर, प्रतिभा विश्वास,
  चंद्रशेखर गोखले, सावित्री हेगडे
- **महानगर साहित्य संमेलने अध्यक्षीय विचार** -
  संकल्पना - ज.बा.कुलकर्णी
  संपादन - उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे,
  अशोक बेंडखळे, पद्माकर शिरवाडकर
- **इये मराठीचिये नगरी** -
  संपादक -अशोक बेंडखळे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे

साहित्य संघाच्या अलिकडच्या तीस वर्षांची ही धावती चित्ररेषा पहाता सा.संघ धडाडीने पुढे जाताना दिसत आहे. याबाबतची काही निरीक्षण इथे नोंदविली तर ते अप्रस्तुत ठरू नये.

- साहित्य संघाच्या हीरक महोत्सवानंतरची या संस्थेची वाटचाल साहित्यसंस्कृतीला बाळसे देणारी अशीच आहे.
- साहित्य संघाच्या साहित्यशाखा आणि नाटयशाखा परस्पर सहकार्याने कार्यरत आहेत.'अवघे धरू सुपंथ' अशी त्यामागे धारणा आहे.
- नवनवीन उपक्रमांमुळे साहित्य-संस्कृती क्षेत्रात साहित्य संघ आधुनिक काळ घडवीत आहे, जाणत्यांना दिशा दाखवीत आहे.
- इतर भाषकांसाठी आपले योगदान देण्यास, इतर भाषकांना आणि भाषांना आपल्यात सामावून घेण्यास तत्पर असतो. म्हणून साहित्य संघ सांस्कृतिक केंद्र बनला आहे.

मात्र असे असूनही काही उपक्रम साहित्य संघाला यश देऊ शकले नाहीत. उदा: न.र.फाटक संशोधन केंद्र संघाने उभारले. ते एक मोठे आव्हान होते. पण या केंद्रास उभारी आली नाही. डॉ. अ.ना. भालेराव नाट्यगृह काही दर्जेदार चित्रपटांसाठी चित्रपटगृहात परावर्तित करण्याचा एक प्रयोग झाला. पण त्याला यश आले नाही. मात्र न.र.फाटकांवर 'ज्ञान तपस्वी रुद्र' हे पुस्तक प्रकाशित करून सा.संघाने थोडी फार उणीव भरून काढली आहे.

तरीही एक निश्चित की कार्यकारिणी सदस्य, पदाधिकारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्यात साहित्य संघाच्या कार्याबाबत विलक्षण सामंजस्य आहे. जगन्नाथाच्या रथाला जसे अनेकांचे हात लागतात, तेव्हा तो रथ पुढे सरकतो तसे साहित्य संघात एकजुटीने काम करण्याची कार्यकर्त्यांची वृत्ती असल्यामुळे साहित्य संघाने सातत्याने आपला विशेष दर्जा राखला आहे.

त्याचे भविष्य म्हणूनच उज्ज्वल आहे !

**- सुहासिनी कीर्तिकर**
९८२०२५६९७६

# साहित्य संघाची साहित्य शाखा
(१९३५ ते २०१५)

**- डॉ.उज्ज्वला मेहेंदळे**

आज गिरगावात रस्त्याने आपण जायला लागलो की ठाकुरद्वारच्या थोडे अलिकडे उजव्या हाताला एक छोटीशी गल्ली आपल्याला दिसते. गल्ली लहानशी असली तरी माणसांची वर्दळ मात्र या गल्लीतून खूप मोठ्या प्रमाणावर असते. थेट चर्नीरोड स्टेशनवर जाणारा हा रस्ता माणसांनी तुडुंब भरलेला असतो. हाच 'डॉ.भालेराव मार्ग'. या मार्गाने जाणारी येणारी माणसे चालता चालता रस्त्याच्या मध्यावर मधेच थबकतात आणि उजवीकडच्या भक्कम इमारतीकडे अनिमिष नेत्रांनी बघत रहातात. ही इमारत म्हणजे गिरगावातला मानबिंदू आहे असा विचार करत हे पांथस्थ पुढच्या पाच-सहा दिवसात एखादे चांगले नाटक, वैशिष्ट्यपूर्ण परिसंवाद किंवा एखाद्या विचारवंताचे व्याख्यान आहे कां? याचा शोध घेत असतात. ही इमारत म्हणजेच 'मुंबई मराठी साहित्य संघ'.

मुंबईतल्या आजी-माजी गिरगावकरांना आपुलकी वाटणारी ही संस्था आज ऐंशी वर्षे पुरी करते आहे, आणि म्हणूनच-

तेया परी श्रोतां ।
अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपणा चित्ता । आणुनिया ।।

अशी विनंती करुन मुंबई मराठी साहित्य संघाच्या ऐंशी वर्षाच्या साहित्यिक वाटचालीची ही कथा मी आज आपल्याला सांगणार आहे.

१९१२ ते १९३२ या काळामधे 'मराठी साहित्य परिषद' या मध्यवर्ती साहित्य संस्थेचे कार्यालय मुंबई येथे होते. त्यामुळे मुंबईतील मराठी भाषकांना मराठी साहित्य विषयक कार्यक्रम ऐकता येत होते. पण १९३२ नंतर महाराष्ट्र साहित्य परिषद 'पुणे' येथे हलवली. यामुळे मुंबईत एकही साहित्य संस्था नाही अशी परिस्थिती झाली. मुंबईतील साहित्यप्रेमी लोकांना ही पोकळी फार जाणवायला लागली. त्यामुळे २९ एप्रिल १९३४ आणि १३ मे १९३४ या दोन दिवशी दोन सभा भरवल्या गेल्या आणि त्यात 'मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४' या नावाने संमेलन भरविण्याचे ठरविले. पण हे संमेलन होण्यापूर्वीच त्याच्या कार्यकारी मंडळात मतभेद झाले आणि मामा वरेरकर, पु.रा.लेले आणि त्यांचे पाच सहकारी यांनी राजिनामे दिले.

प्रारंभीच माशी शिंकली तरी इतर साहित्य प्रेमींनी हार मानली नाही आणि हे संमेलन भरवले गेले. कै.कृ.अ.केळुस्कर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते आणि कै.अ.बा.गजेंद्रगडकर हे स्वागताध्यक्ष होते. या संमेलनात जे एकूण तीस ठराव मांडले गेले, त्यातील एक ठराव असा होता की, 'मुंबई व उपनगरे येथील सर्व साहित्य संस्था व साहित्यिक यांची एक मध्यवर्ती संस्था स्थापन करावी.'

या ठरावानुसार २१ जुलै १९३५ रोजी 'मुंबई मराठी साहित्य संघ' या संस्थेची स्थापना झाली आणि खऱ्या अर्थाने मुंबई मराठी साहित्य संघाची साहित्यिक वाटचाल सुरू झाली. संस्था स्थापन झाली खरी पण संस्थेला स्वत:ची जागा नव्हती. मात्र त्यासाठी संस्थेचे लोक थांबले नाही. संस्थेचे कार्यालय संस्थेचे एक चिटणीस डॉ.अमृत नारायण भालेराव यांच्या विठ्ठलभाई पटेल रस्त्यावरील 'नारायण मेन्शन' या निवासस्थानी सुरू झाले.

१९३४ ते १९६४ या सुरुवतीच्या तीस वर्षात स्वत:ची जागा - इमारत नसतानाही 'मुंबई मराठी साहित्य संघाने' विविध प्रकाराने साहित्याची आणि पर्यायाने मुंबईतील साहित्य प्रेमींची मनोभावे सेवा केली. उपनगर संमेलने, वेगवेगळ्या व्याख्यानमाला, विविध

विषयांवरचे परिसंवाद या संस्थेतर्फे आयोजित केले जाऊ लागले.

१९३४ पासून १९६४ पर्यंत मुंबई मराठी साहित्य संघाने एकूण सतरा उपनगर साहित्य संमेलने घेतली. कृ.अ.केळुस्कर, वि.स.खांडेकर, वरेरकर, आचार्य अत्रे, माडखोलकर, शं.दा.जावडेकर, य.गो.जोशी, पु.य.देशपांडे, इंदिरा संत, ना.सी.फडके, शिरवाडकर, मालतीबाई बेडेकर असे नामवंत साहित्यिक या संमेलनांचे अध्यक्ष होते.

या काळात दोन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनेही मुंबईत भरवली गेली. १९३८ साली झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष होते स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर आणि १९५० च्या संमेलनाचे अध्यक्ष होते राजकवी य.दि.पेंढारकर.

साहित्य संघ केवळ संमेलनांवर थांबला नव्हता तर,'शहाणे करुनि सोडावे सकल जन' या ब्रीदाप्रमाणे विविध व्याख्यानमालांच्या द्वारे साहित्य सेवा करत होता. वामन मल्हार जोशी व्याख्यानमाला, डॉ.अ.ना.भालेराव व्याख्यानमाला संघाने सुरू ठेवल्या होत्या. प्रा.वा.ल. कुळकर्णी, रा.श्री.जोग, कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, के.ना.काळे, मे.पु.रेगे अशा सुप्रसिद्ध साहित्यिकांची अर्वाचिन मराठी वाङ्मय, मराठी काव्य, मराठी कादंबरी, शाहीरीवाङ्मय अशा महत्त्वाच्या विषयांवरची व्याख्याने यातून ऐकायला मिळत होती. साहित्य संघ हा 'नाटक' या प्रकाराशी फार जवळून संबंधित होता. यासाठी अ.ना.भालेराव व्याख्यानमालेत चिंतामणराव कोल्हटकर, अल्काजी, कन्नड रंगभूमीवर बोलणारे आद्य रंगाचार्य यांच्या व्याख्यानांचा समावेश होता. साहित्याच्या कुठल्याही क्षेत्राला स्पर्श करण्याचे साहित्य संघाने बाकी ठेवले नाही त्यामुळे 'वीणा' हे मुखपत्र जे पुढे १९५७ पासून 'साहित्य' नावाने प्रसिद्ध झाले, या मासिकाची निर्मिती साहित्य संघाने सुरू केली. याच काळात वा.ल.कुळकर्णींचा 'वामन मल्हार', रा.श्री.जोगांचा 'अर्वाचीन मराठी काव्य', कुसुमावती देशपांडे यांचे 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', माधव आचवल यांचे 'रसास्वाद', अचला जोशींचे 'ह.ना.आपटे यांच्या कादंबऱ्या' हे समीक्षात्मक ग्रंथही संघाने प्रकाशित केले.

१९३४ ते १९६४ या काळात साहित्याशी संबंधित अनेक उपक्रम मुंबई मराठी साहित्य संघाने हाती घेतले होते. परिभाषा मंडळ, नवे शुद्धलेखन प्रसार मंडळ,



मान्यवरांची मांदियाळी-रमेश तेंडुलकर, दुर्गाबाई भागवत, गंगाधर गाडगीळ, बाबा कलगुटकर, शांता शेळके, सुधीर फडके आणि यशवंत देव

कॉपीराईट कायद्यातील सुधारणा, कोकणी भाषकांना मराठी भाषिक म्हणून मान्यता मिळवून देणे, साहित्य परिषदेच्या मराठी भाषेच्या परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे अशा विविध साहित्यिक चळवळी साहित्य संघ करत होता.

मराठी भाषा साहित्य, नाट्य विषयक कार्याचा हा भला मोठा गोवर्धन पर्वत उचलण्याचे धाडस डॉ.अ.ना.भालेरावांनी दाखवले व त्या कार्याला अनेक सहकाऱ्यांचा हातभार लागला. संघाच्या कार्यकारी मंडळातून अ.बा.गजेंद्रगडकर, अनंत हरि गद्रे, तुळजापूरकर, आळतेकर, र.धो.कर्वे, न.र.फाटक, अप्पा पेंडसे, लालजी पेंडसे, वा.वि.भट, वा.रा.ढवळे, आमोणकर, अंधृटकर यांचा फार मोठा सहभाग संघाच्या जडणघडणीत होता. श्री.म.वर्दे, प्रा.वा.दा.गोखले, चं.वि.बावडेकर यांनी मुखपत्राच्या संपादनाची जबाबदारी हाती घेतली होती आणि उत्तम तऱ्हेने पारही पाडत होते. डॉ.अ.ना.भालेराव यांचे सगळे कुटुंब प्रामुख्याने डॉक्टरांच्या पत्नी या संघासाठी तन मन धन अर्पण करत होत्या. त्याच बरोबर शांताबाई कशाळकर, पिरोज आनंदकर, दुर्गाबाई खोटे याही आपले संपूर्ण सहकार्य देत होत्या. याच काळात मुंबई मराठी साहित्य संघाचा मोनोग्राम म्हणजे संघमुद्रा तयार झाली. त्यामुळे संघाला एक प्रकारची प्रतिष्ठा मिळाली. ही संघमुद्रा सुप्रसिद्ध चित्रकार दीनानाथ दलाल यांनी केली.

मुंबई मराठी साहित्य संघाचा रात्रंदिन विचार करणाऱ्या डॉ.अ.ना.भालेराव यांच्या मनात १९४४ सालापासूनच संघाची स्वतंत्र वास्तू असावी असा विचार होता. त्यासाठी १९५० साली साठेखत करून साहित्य संघाची सध्याची जागा निश्चित केली गेली. १९५२ साली खरेदी खत होऊन ही जाग साहित्य संघाच्या मालकीची झाली.

२७ ऑक्टोबर १९५२ रोजी मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांचे हस्ते काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली आणि भाऊसाहेब हिरे यांच्या उपस्थितीत संघाच्या जागेचा भूमीपूजन समारंभ झाला. या समारंभाचे पौरोहित्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले.

जागा ताब्यात आली असली तरी पैशाच्या कमतरतेमुळे प्रत्यक्ष बांधकामाची सुरुवात १९५२ मधे झाली. इमारत बांधण्यास सुरवात करण्यापूर्वी या जागेवर ओपन एअर थिएटर होते की ज्या ठिकाणी गिरगावातल्या लोकांनी नाट्योत्सवात झालेली उत्तमोत्तम नाटके पाहिली. प्रत्यक्ष वास्तू बांधण्यास सुरुवात झाली १९६० साली. पण त्यापूर्वी या वास्तूसाठी जीवाचे रान करणारे, अथक प्रयत्न करणारे डॉ.अमृत नारायण भालेराव हे मात्र अकाली निधन पावले. २५ ऑगस्ट १९५५ ला डॉ.अ.ना.भालेराव यांचे देहावसान झाले आणि गेले वीस वर्षे अखंडपणे साहित्य व नाट्य यांच्या जोपासनेसाठी प्रयत्न करणाऱ्या डॉक्टरानंतर हे कार्य पुढे कसे चालू रहाणार असा बिकट प्रश्न उभा राहिला. पण मराठी साहित्य व नाट्य याबरोबरच डॉ.भालेरावांवर लोभ असलेले अनेक हात पुढे आले आणि अधिक जोमाने मुंबई मराठी साहित्य संघाची उभारणी सुरू झाली.

१९ एप्रिल १९५६ रोजी साहित्य संघ कर्जमुक्त झाला. ७ जानेवारी १९६० या दिवशी चिंतामणराव देशमुखांच्या हस्ते कोनशीला बसवली गेली, बांधकामाला प्रारंभ झाला. ६ एप्रिल १९६४ या दिवशी संघाची इमारत पूर्ण होऊन मा.यशवंतरावजी चव्हाण यांचे हस्ते, मा. बाळासाहेब देसाई, यांच्या उपस्थितीत संघमंदिराच्या इमारतीचे उद्घाटन झाले. नाट्यगृहाला 'डॉ.अ.ना.भालेराव' असे नाव देण्यात आले आणि मध्यंतरीच्या काळात म्हणजे १९६२ मधे या रस्त्याचेही 'डॉ.भालेराव मार्ग' असे मुंबईच्या महापौरांच्या हस्ते नामकरण झाले.

मुंबई मराठी साहित्य संघाचे कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि संघाशी संबंधित इतरही मान्यवर खूप जोरदार कामाला लागले. सुप्रसिद्ध विचारवंत, लेखक प्रा.न.र.फाटक आणि महामहोपाध्याय द.वा.पोतदार

यांचे सत्कार केले गेले. १८ वे उपनगर मराठी साहित्य संमेलन झाले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या संमेलनाचे अध्यक्ष प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ.ग.शां.कसबेकर होते. याच काळात प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ रँगलर जयंत नारळीकर यांनी आपले वडील व मातोश्री यांचेसह साहित्य संघाला भेट दिली.

१९६४-६५ पासून साहित्य संघाच्या साहित्य शाखेने विविध प्रकारचे साहित्यिक कार्यक्रम घडवून आणण्याचा विडाच उचलला. कै.केशवसुत आणि कै.गोपाळ कृष्ण गोखले यांची जन्मशताब्दी झाली. नाना शंकरशेट यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्त प्रा.न.र.फाटक यांची भाषणे झाली. समाजसुधारक अण्णा मार्तंड जोशी व्याख्यानमाला सुरू झाली. त्यासाठी डॉ.भा.नी.पुरंदरे यांनी पाच हजाराची देणगी दिली. १९६८ मधे लक्ष्मीबाई टिळकांची जन्मशताब्दी साजरी झाली. त्या निमित्त 'युगान्त' या इरावती कर्वे यांच्या पुस्तकावर परिसंवाद झाला. 'अनौपचारिक साहित्यिक गप्पा' हा एक आगळा-वेगळा कार्यक्रम संघाने सुरू केला. विशेष म्हणजे लेखक आणि प्रकाशक यांच्या सत्कार करण्याची प्रथा चालू केली. १९८० पर्यंत साहित्य संघाने वेगवेगळ्या व्याख्यानमाला सादर केल्या. नाथ माधव स्मृति व्याख्यानमाला, लालजी पेंडसे व्याख्यानमाला, अशा व्याख्यानमालांमधून होणारी विद्वत्तापूर्ण, माहितीपूर्ण व्याख्याने ऐकण्यासाठी केवळ गिरगावातूनच नव्हे तर मुंबईच्या विविध उपनगरातून श्रोते साहित्य संघात येत.

१९७० मधे साहित्य संघाने एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम हाती घेतला. महाराष्ट्रात रहाणाऱ्या अमराठी लोकांना मराठी भाषा शिकवण्यासाठी मराठी भाषा वर्ग सुरु केले आणि केवळ गिरगावातच नव्हे तर चेंबूर, पवई, बांद्रे येथेही हे वर्ग चालू करण्याची व्यवस्था केली. मराठी भाषेचा प्रचार आणि महत्त्व महाराष्ट्रात असायलाच पाहिजे या आज मांडल्या जाणाऱ्या विचारांचा श्रीगणेशा खऱ्या अर्थाने साहित्य संघाने १९२० सालीच केला. रशियन व बंगाली भाषा शिक्षण देण्याचा प्रयत्नही या काळात साहित्य संघातर्फे केला गेला. वाङ्मयीन जाण आणि आवड असणाऱ्यांसाठी सौंदर्यशास्त्र उलगडून सांगण्याची व्यवस्था करण्यात आली.

घरातील एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीचे निधन झाले की, जसा घराचा कणाच मोडल्यासारखा होतो, साहित्य संघाच्या बाबतीतही १९७६ नंतरचा काही काळ असाच दुर्दैवी म्हणावा लागेल. डॉ.भालेरावाच्या निधनानंतरही साहित्य संघाची धुरा तितक्याच समर्थपणे पेलणारे अनेक मान्यवर या वर्षांमध्ये काळाच्या पडद्याआड गेले. श्री.चं.वि.बावडेकर, श्री.श्री.शं.नवरे, द.वा.पोतदार, न.र.फाटक यांचे निधन झाले. तात्यासाहेब आमोणकर, भार्गवराम पांगे हे कालवश झाले. १९८४ साली संपादक, संचालक, उपाध्यक्ष अशा विविध भूमिका समर्थपणे पेलणारे श्री.वा.रा.ढवळे यांचेही दु:खद निधन झाले. मुंबई मराठी साहित्य संघाला हा फार मोठा धक्का होता, पण 'Show must go on' हे जसं नाट्यक्षेत्राचे ब्रीदवाक्य आहे तसंच ते संस्थेचंही



वसंत बापटांचा सत्कार करताना सरोजिनी वैद्य

आहे. सगळ्या ज्येष्ठ लोकांबरोबर काम केलेले कार्यकर्ते आणि काही ज्येष्ठ लेखकही याबाबतीत पुढे आले. डॉ.बाबा कलगुटकर, शि.मो.घैसास, मल्हार ढगे, भिमराव कुलकर्णी यांच्याबरोबरच ज्येष्ठ साहित्यिक रमेश मंत्री, गंगाधर गाडगीळ, जयंत साळगावकर, सुभाष भेंडे, रवींद्र पिंगे यांनी संघाच्या कार्यात रस घेतला. मोठ्या डॉ.भालेराव यांचे चिरंजीव डॉ.बाळ उर्फ रा.अ.भालेराव यांनीही सर्जन म्हणून व्यस्त असूनही साहित्य संघाकडे पूर्ण लक्ष वळवले आणि संघाने पुन्हा एकदा उभारी धरली.

मुंबई साहित्य संघ भरवत असलेली उपनगर संमेलने पुन्हा एकदा जोर धरू लागली. आता ही महानगर संमेलने म्हणून ओळखली जाऊ लागली. १९६८ साली विलेपार्ले येथे, १९७० खारला, १९७५ मधे मुंबईत गिरगावात, १९७७ ला गोरेगावला, १९७८ बांद्रा, १९८३ मुलुंड आणि १९८४ बोरिवली अशी संमेलने झाली .रा.भि.जोशी, बा.भ.बोरकर, गं.बा.सरदार, रणजित देसाई, नरहर कुरुंदकर, वसंत बापट असे सन्माननीय साहित्यिक या संमेलनाचे अध्यक्ष झाले. यातले काही पुढे अखिल भारतीय संमेलनांचेही अध्यक्ष झाले.

१९३७ पासून मुंबई मराठी साहित्य संघाने १९८४ पर्यंत ४१ वर्धापन दिन साजरे केले. महनीय प्रवक्ते म्हणून या वर्धापन दिनांना र.पु.परांजपे, श्री.म.माटे, ना.सी.फडके, धनंजयराव गाडगीळ, दत्ता धर्माधिकारी, वि.म.दांडेकर अशा एकाहून एक बुद्धिवंत व्यक्तींचे विचार श्रोत्यांना ऐकायला मिळाले आहेत. वा.म.जोशी व्याख्यानमाला, डॉ.भालेराव व्याख्यानमाला या बरोबरच हरि नारायण आपटे, लालजी पेंडसे, अण्णा मार्तंड जोशी, नाथ माधव या व्याख्यानमालाही १९८४ पर्यंतच्या काळात चालू राहिल्या. अरविंद मंगळूरकर, राम पटवर्धन, हे.वि.इनामदार, द.न.गोखले, नलिनी पंडित, रा.श्री.जोग असे मान्यवर या व्याख्यानमालामधून सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, नाट्यविषयक असे अनेकानेक विषय चर्चिले गेले आहेत. मराठी वाङमयासंबंधी काव्य, कादंबरी, ललित वाङ्मय, वृत्तपत्र वाङमय, टीका-समीक्षात्मक वाङमय असे विविध विषय यात आले. संत वाङमय, आधुनिक साहित्य, साहित्यातील स्त्री चित्रण या साहित्यिक विषयांबरोबर र.धो.कर्वे यांची सामाजिक विषयावरची नियत कालिके, चंद्रावरची सफर, आर्थिक विकास अशा साहित्यबाह्य विषयांवर चर्चा साहित्य संघात घडवून आणल्या गेल्या.

मा.गो.देशमुख, उषाताई देशमुख, शांता शेळके, विजया राजाध्यक्ष, सरोजिनी वैद्य, शंकर वैद्य, माधव मनोहर, स.ग.मालशे अशा साहित्यिकांची आणि त्यांच्याबरोबरीने सामाजिक, आर्थिक विषयांवरची व्याख्याने इथे लोकांना ऐकायला मिळाली. जातीयता, राजकारण, भांडवलशाही, ग्रामीण समाजाचे प्रश्न, अस्पृश्यतेचा प्रश्न हे विषयही निरनिराळ्या व्याख्यानमालांमधून चर्चिले गेले. साहित्य संघातील या व्याख्यानांची वृत्तपत्रांनीही दखल घेतली. कधी काही व्याख्याने काही संस्थांच्या मदतीने तर कधी काही व्याख्याने साहित्य संघाने स्वतंत्रपणे घडवून आणली.

१९८४ नंतरही साहित्य संघाची साहित्य सेवा अथकपणे चालतच राहिली. मा.शि.मो.घैसास यांनी साहित्य शाखेचे कार्यवाहपद बरेच वर्ष सांभाळल्यानंतर ते श्रीमती पद्माताई घारपूरे यांच्याकडे आले. डॉ.बाळ भालेरावांच्या भगिनी कुंदाताई पडळकर यांनीही काही वर्षे ही जबाबदारी सांभाळली. या काळात काही वर्षे संघाचे अध्यक्ष रमेश मंत्री, त्यानंतर गंगाधर गाडगीळ आणि मग जयंतराव साळगावकर होते. काही व्याख्यानमालांचे रुपांतर त्याविषयाच्या लेखकाला पुरस्कार देण्यात केले गेले. मधला काही काळ उपनगर संमेलने थोडीशी थंडावली असली तरी १९९५ पासून पुन्हा जोमाने दरवर्षी महानगर संमेलने या नावाने ती सुरू करण्यात आली होती. दादर, गिरगाव, विलेपार्ले, मुलुंड, बोरिवली अशा ठिकाणी २००८ पर्यंत एकूण अकरा संमेलने झाली. माधव गडकरी, मे.पु.रेगे, विजया

राजाध्यक्ष, सरोजिनी वैद्य, शिरीष पै, विश्वास पाटील, अरुण टिकेकर, प्रतिभा रानडे असे सगळे मान्यवर साहित्यिक या संमेलनाचे अध्यक्ष होते. या काळात काही व्याख्यानमालामधून काही वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम संघाने घेतले. डॉ.भा.नि.पुरंदऱ्यांच्या 'शल्यकौशल्य' या आत्मचरित्रावरची चर्चा विश्वास पाटील आणि रत्नाकर मतकरी यांच्या मुलाखती, चित्रपट अभिनेत्रींची आत्मचरित्रे यात प्रत्यक्ष आत्मचरित्रे लिहिणाऱ्या अभिनेत्रींशी संवाद साधला.

या काळात आणखी काही महत्त्वाची साहित्य मौत्तिके साहित्य संघाने लोकांपर्यंत पोहोचवली. ज्ञानेश्वर सप्तशताब्दी कार्यक्रम झाले. मराठी पत्रकार संमेलन घेतले, प्रकाशकांची परिषद घेतली. भाषा भगिनी संमेलन झाले. या २००० सालापर्यंतच्या काळात खूप गाजलेले म्हणजे साहित्य संघाने केलेले 'विनोदी साहित्य संमेलन' प्रा.बाळ गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली विनोदाचा सर्वांगीण विचार करणारे हे संमेलन झाले. परिसंवाद, हास्य कविसंमेलन या बरोबरच या संमेलनात गाजली ती मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली उत्कृष्ट अशी व्यंगचित्र प्रात्यक्षिके. 'इंदिरा' या इंग्रजी चरित्राच्या मूळ लेखिका श्रीमती पुप्पुल जयकर आणि या पुस्तकाचा अनुवाद केलेले श्री. अशोक जैन यांच्याशी प्रा.उषा तांबे यांनी संवाद साधला. हा कार्यक्रम श्रोत्यांनी फार गौरवला. साहित्याच्या प्रांगणात उगवतीचे रंग, विचार संवाद या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांबरोबरच इस्त्रायलमधे 'मायबोली' हे मराठी त्रैमासिक चालविणाऱ्या 'फ्लोरा सॅम्युअल' यांचा सत्कार हाही एक विशेष कार्यक्रम होता.

साहित्य संघाच्या या यशस्वी वाटचालीत आणखी एक जबाबदारी साहित्य संघाकडे आली. १९९९ ते २००१ या काळात अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे कार्यालय मुंबईकडे आले आणि श्रीमती वसुंधरा पेंडसे नाईक यांच्या अध्यक्षतेखाली श्री.निरंजन उजगरे आणि प्रा.सुहासिनी कीर्तिकर यांनी अनुक्रमे कोषाध्यक्ष आणि कार्यवाह म्हणून काम सांभाळले. या तीन वर्षाच्या काळात मुंबई, बेळगाव आणि इंदूर या ठिकाणी चांगली संमेलने झाली. श्री.वसंत बापट, डॉ.य.दि.फडके आणि विजया राजाध्यक्ष हे संमेलनाध्यक्ष म्हणून निवडून आले होते. मुंबई मराठी साहित्य संघ हा दिवसेंदिवस आपल्या कार्यकर्तृत्वाची पताका उंचावत राहिला. गिरगावातही मराठी माणसे कमी झाली म्हणून साहित्य संघाने आपल्या कार्यक्रमांसाठी गिरगावाबाहेरचा परिसर निवडायला सुरवात केली.

कुटुंबाप्रमाणेच संस्थेमधेही पिढीनुरुप बदल होत असतात, नवीन हात मदतीला पुढे येतात, पदाधिकारी बदलले जातात. साहित्य संघाच्या कुटुंबप्रमुखाची भूमिका २००० च्या आसपास आणि नंतर काही काळ श्री.यशवंत पंडित यांच्याकडे कार्याध्यक्ष या नात्याने आली आणि साहित्य संघाच्या साहित्य, नाट्य, रंगमंदिर आणि हिशोब किंवा आर्थिक व्यवस्था या सर्व बाजूकडे लक्ष देत त्यांनी साहित्य संघाचे कार्याध्यक्षपद शेवटपर्यंत भूषविले. साहित्य संघाशी संबंधित सर्वच माणसे स्वतःच्या वयाची, तब्बेतीची कशाचीही पर्वा न करता संघाकरता कार्य करतात. नाहीतर ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकर यांच्या सारखे विद्वान, कल्पक अध्यक्ष या नात्याने ही जबाबदारी कसे स्वीकारतील? स्वतःच्या कुठल्याही व्याधींची पर्वा न करता त्यांनी अध्यक्षपद स्वीकारले आणि विविध कल्पना आमच्यासारख्या कार्यकर्त्यांकडून अंमलात आणल्या. त्यापैकी एक उत्तम कल्पना म्हणजे 'अमृत व्याख्यानमाला'. ही व्याख्यानमाला म्हणजे साहित्य संघाला आणि मराठी भाषेला शब्दलेणे अर्पण करणरी ठरली. अगदी बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'शिवाजी महाराज आणि मराठी भाषा' या व्याख्यानापासून संत वाङमय, ख्रिस्ती वाङमय, इंग्रजी वाङमय अशा विविध पैलूतून मराठी भाषेवर प्रकाश पाडणारी अभ्यासपूर्ण व्याख्याने यात लोकांना ऐकायला मिळाली. निशिकांत मिरजकर, शंकर अभ्यंकर, द.ता.भोसले, लीला गोविलकर, रामचंद्र देखणे इत्यादी महनीय वक्त्यांच्या या भाषणांची साहित्य संघाने दोन पुस्तके प्रकाशित

केली.

साहित्य शाखेच्या कार्यवाहपदाची जबाबदारी या काळात प्रा.उषा तांबे आणि प्रा.सुहासिनी कीर्तिकर यांनी सांभाळली. पूर्वीचे उपक्रम चालूच ठेवून त्यांनी महाविद्यालयीन संमेलन हा एक नवीन उपक्रम चालू केला. २००३ साली मुंबई मराठी साहित्य संघातच हे संमेलन घेतले. अध्यक्ष होत्या लेखिका वीणा गव्हाणकर. २ रे महाविद्यालयीन संमेलनही साहित्य संघातच घेतले त्याचे अध्यक्ष डॉ.अनिल अवचट होते. यानंतर मात्र मुंबईच्या परिसरातील महाविद्यालयांची निमंत्रणे मिळाली आणि मग रुईया महाविद्यालय, वझे-केळकर कॉलेज, चेतना, कीर्ती, सोमय्या, पाटकर, साठ्ये महाविद्यालय, ठाण्याचे ग्रंथालय अशी एकूण अकरा महाविद्यालयीन संमेलने झाली. रत्नाकर मतकरी, अतुल पेठे, अरुणा ढेरे, उत्तम कांबळे, रामदास फुटाणे, प्रविण दवणे, प्रज्ञा पवार, अच्चुत गोडबोले आणि सोमय्या महाविद्यालयात कविवर्य मंगेश पांडगावकर असे अध्यक्ष या संमेलनांना लाभले. उद्‌घाटक म्हणून मुलांचे आवडते सेलिब्रिटी निशिगंधा वाड, चंद्रकांत कुलकर्णी, सदाशिव अमरापूरकर, सुनील बर्वे, अभिजित केळकर, अतुल कुलकर्णी, कौशल इनामदार, अमृता सुभाष असे लोक होते. सूत्र संचालक विद्यार्थी, वक्ते विद्यार्थी, मुलाखत घेणारे विद्यार्थी, कविसंमेलनात भाग घेणारे विद्यार्थी असे हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी घेतलेले संमेलन असते. व्यासपीठावर बोलण्याची सवय व्हावी म्हणून ऑगस्टमधे विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व व काव्य स्पर्धा घेण्यात येतात. या संमेलनांना विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळतो आहे. या वर्षीचे संमेलन घाटकोपरला झुनझुनवाला महाविद्यालयात होणार आहे.

महानगर साहित्य संमेलनही अतिशय उत्तम रीतीने प्रतिवर्षी पार पडत आहेत. २०१४ मधे वसई येथे अरुणा ढेरे यांच्या अध्यक्षतेखाली ४१ वे महानगर संमेलन झाले. त्यापूर्वी ४० वे संमेलन बदलापूरला मंगला गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली ३९ वे संमेलन चेंबूरला झाले, रामदास भटकळ अध्यक्ष होते. प्रतिवर्षी या संमेलनात निरनिराळ्या विषयांवरचे परिसंवाद काव्य संमेलने, लेखकांच्या मुलाखती असे कार्यक्रम होतात. महानगर संमेलनातील अध्यक्षांची भाषणे अतिशय उदबोधक असतात. या भाषणाचे एक पुस्तक मुंबई मराठी साहित्य संघाने प्रकाशित केले आहे.

साहित्याच्या वेगवेगळ्या प्रवाहांवर या भाषणांतून वाचकांना खूप काही वाचायला मिळते.

२०१० ते २०१३ या काळात अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे कार्यालय मुंबई मराठी साहित्य संघात होते. प्रा. उषा तांबे या महामंडळाच्या अध्यक्ष होत्या. डॉ.उज्ज्वला मेहेंदळे ह्या कार्यवाह आणि




वसईच्या महानगर मराठी साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशन (२०१५)

श्री.गुरुनाथ दळवी हे कोषाध्यक्ष होते. या काळात ठाणे, चंद्रपूर आणि चिपळूण येथे अखिल भारतीय साहित्य संमेलन झाली. सिंगापूरला विश्व मराठी साहित्य संमेलन झाले. प्रा.उत्तम कांबळे, प्रा.वसंत आवाजी डहाके आणि डॉ.नागनाथ कोत्तापल्ले हे अनुक्रमे संमेलनाध्यक्ष होते. सिंगापूरच्या विश्वसंमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध लेखक व नाटककार महेश एलकुंचवार होते.

अखिल भारतीय साहित्य महामंडळाची धुरा पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे सोपवल्यानंतर मुंबई मराठी साहित्य संघाच्या परत एकदा पंचवार्षिक निवडणुका झाल्या. नवीन विचार, नवीन दिशा, नवीन कल्पना घेऊन नवे कार्यकारी मंडळ, नवे पदाधिकारी परत एकदा नवीन जोमाने कामाला लागले. काळ जात रहातो, नवीन चेहरे उदयाला येतात. पण जुन्या खंद्या आधारस्तंभांची आठवण आल्याशिवाय रहात नाही. साहित्य संघाशी वर्षान वर्षे नाते असणारे डॉ.दाजी भाटवडेकर, श्रीरंग आडारकर, श्री.पु.भागवत, निरंजन उजगरे, यशवंत पंडित, ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांची उणीव कधीच भरून निघणार नाही.

काळ कुणासाठी थांबत नाही. साहित्य संघ आज ८० वर्षे पुरी करून शंभरीकडे वाटचाल करतो आहे. कार्याध्यक्ष प्रा.उषा तांबे आपला पदभार उत्तम तऱ्हेने सांभाळत आहेत. डॉ.भालेरावांचे प्रमुख कार्यवाह या नात्याने मार्गदर्शन लाभले आहे. अनेक अडचणींमधून वाट काढत कोषाध्यक्ष आशाताई मुळगांवकर आपली जबाबदारी पार पाडत आहेत. प्रकाश पागे, सतिश म्हात्रे, अचलाताई जोशी, विश्वस्त म्हणून आम्हाला वेळोवेळी काही ना काही सुचवत आहेत .ॲड. विजया दिवेकरांचा कायदेशीर सल्ला मिळतो आहे. साहित्य, नाट्य, रंगमंदिर यांचे शाखा कार्यवाह म्हणजे श्री. दिलीप भाटवडेकर, श्री. सुभाष भागवत आणि डॉ.उज्ज्वला मेहेंदळे असे आम्ही आपापल्या शाखांची जबाबदारी पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. साहित्य दिवाळी अंकाचे संपादक श्री.अशोक बेंडखळे तर जवळ जवळ प्रत्येक वर्षी साहित्य दिवाळी अंकासाठी अनेक पुरस्कार मिळवत आहेत.

साहित्य शाखेचे सगळे सदस्य श्री.चंद्रशेखर गोखले, डॉ.अनुपमा उजगरे, प्रा.प्रतिभा सराफ, प्रा.प्रतिभा विश्वास, श्री.एकनाथ आव्हाड, श्री.पद्माकर शिरवाडकर, प्रा.नरेंद्र पाठक, श्रीमती सावित्री हेगडे, श्रीमती रेखा नार्वेकर यांचे मनापासूनचे सहकार्य साहित्य संघाला आणि विशेष म्हणजे साहित्य शाखेला मिळते आहे. त्यामुळे साहित्य शाखेची कार्यवाह या नात्याने मी वर्धापनदिन, महानगर व महाविद्यालयीन संमेलने, वि.पु.भागवत पुरस्कार इतर महत्त्वाचे पुरस्कार, साहित्य संध्यासारखे कार्यक्रम उत्तम तऱ्हेने पार पाडू शकते आहे. अमराठी भाषकांनी मराठी शिकवण्याचे कामही संचालिका सुहासिनी कीर्तिकर आणि त्यांचे सहकारी उत्तम तऱ्हेने करत आहेत .

अर्थात या सर्व कार्य करणाऱ्यांना सतत कुणाचे तरी प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि शाबासकीची थाप आवश्यक असते आणि ती आम्हाला मिळते संघाचे आत्ताचे अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक उर्फ मधुभाईंकडून. जयंत साळगावकरांच्या निधनानंतर साहित्य संघाचे सुकाणू मधुभाईंसारख्या समर्थ हातात गेल्यामुळे साहित्य संघाची चिंता खऱ्या अर्थाने संपली. साहित्याच्या या प्रांगणातली मुशाफिरी करण्यासाठी साहित्य संघाच्या साहित्य शाखेचे सर्व योद्धे आपल्या शब्दरुपी आणि आणि कार्यरुपी आयुधांनिशी सज्ज आहेत. त्यामुळे ज्ञानदेवांच्या ओवीप्रमाणे-

जैसे शारदेचिये चंद्रकळे ।
माजी अमृतकण कोवळे ।
ते वेचिती मने मौआळे । चकोरतलगे ।।

असा मराठी साहित्याचा आस्वाद घ्यायला उत्सुक असणाऱ्या श्रोत्यांना, वाचकांना आणि साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांनाही पुढच्या वाटचालीसाठी फार मोठा दिलासा आहे.

**-डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**
९८२०८०१७२०

# साहित्य : साहित्य संघाचे दर्जेदार मुखपत्र

मुंबई मराठी साहित्य संघ या मुंबईतील अग्रगण्य संस्थेचे मुखपत्र असलेले 'साहित्य' हे वाङ्मयीन नियतकालिक जानेवारी १९४७ ला सुरु झाले. त्याचे पहिले संपादक होते. वाङ्मयप्रेमी व साहित्य संघाचे खंदे कार्यकर्ते वा. रा. ढवळे. 'साहित्य' निघण्याअगोदर 'प्रतिभा', 'पारिजात', 'ज्योत्स्ना' ही वाङ्मयीन नियतकालिके बंद पडली होती. तर 'समीक्षक' 'सत्यकथा' 'अभिरुचि' व 'छंद' ही चालू होती. साहित्याची धुरा संपादक (४ वर्षे ) आणि कार्यकारी संपादक (१ वर्ष ) म्हणून ५ वर्षे श्री. ढवळे यांनी समर्थपणे सांभाळली. 'पारिजात', 'ज्योत्स्ना', 'रागिणी' इ. मासिकांच्या संपादनाचा पूर्वानुभव असल्यामुळे श्री. ढवळे यांची 'साहित्या'चे संपादक म्हणून कामगिरी वैशिष्टयपूर्ण झाली. या पाच वर्षांत 'साहित्य' हे शुध्द वाङ्मयीन नियतकालिक म्हणून प्रसिध्द झाले आणि त्यातून पुढे नामांकित झालेल्या अनेक लेखक - कवी-समीक्षक यांच्या प्रारंभीच्या कथा, ललितलेख, कविता आणि समीक्षा लेख आलेले आहेत. हे सर्व लेखन विविधांगी असून इथे शब्दमर्यादेमुळे फक्त काही वैशिष्टयपूर्ण लेखनाची नोंद घेतली आहे.

'साहित्य' च्या पहिल्या अंकात वि.स.खांडेकर, ना.सी.फडके, न.र.फाटक, अनंत काणेकर, श्री.के. क्षीरसागर, वा.ल. कुळकर्णी, रा.भि.जोशी, के.नारायण काळे, वामन चोरघडे, प्रभाकर पाध्ये , पु.ल. देशपांडे अशा साहित्यिकांचे कथा, लेख, समीक्षा लेख आहेत तसेच कवी यशवंत, कुसुमाग्रज, कृ.ब.निकुम्ब, रा.अ. काळेले, इंदिरा संत, ना.घ.देशपांडे, पु.शि.रेगे, शांता शेळके यांच्या कविता आहेत. या लेखक कवींचे 'साहित्य'ला पुढे सतत लेखन-सहकार्य लाभल्याचे दिसते.

वाङ्मयीनप्रेमी वाचकांना चांगल्या दर्जेदार साहित्याची मेजवानी दर अंकागणिक देणाऱ्या या द्वैमासिकाचे अंतरंग ठरलेले असायचे. संपादक 'साहित्य विचार' या संपादकीय मधून त्यावेळच्या वाङ्मयीन घटनांची नोंद घ्यायचे. त्याशिवाय एक -दोन कथा, ललितलेखक समीक्षा वा चर्चा लेख' पुस्तक परिक्षणे आणि भरपूर कविता या साधारण १५० पानी अंकात असायच्या. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, प्रभाकर पाध्ये, सदानंद रेगे यांच्या प्रारंभीच्या कथा त्यात आहेत. तसेच रा.भि.जोशी, गो.वि.करंदीकर (विंदा) यांचे ललित लेख आढळतात. इंग्रजी नाटकांचे परिचय वि.स.खांडेकरांनी करुन दिले आहेत. सौंदर्यवाद (श्री. के.क्षीरसागर), कला प्रक्रियेतील शैशवाची जपणूक (दि.के. बेडेकर), कांदबरीकाराच्या मार्गावरील मोह ( वा. ल.कुळकर्णी), बखरवाङ्मय (गं.बा.ग्रामोपाध्ये), लोकसाहित्य आणि पक्षी (दुर्गा भागवत), आपले आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य (धनंजय गाडगीळ ) असे या अंकाचा दर्जा उंचावणारे अनेक समीक्षा लेख 'साहित्य'च्या ५ वर्षांतील २६ अंकांमधून वाचायला मिळतात. 'साहित्य'ने या काळात ४ दिवाळी अंक, २ नाट्यमहोत्सव अंक आणि १ साहित्य संमेलन अंक काढले. अंकातली सुंदर प्रकाशचित्रे, चित्रकार द.ग.गोडसे यांची सजावट आणि मोहरबंद छपाई यातून अंकाच्या उच्च निर्मितिमूल्यांची कल्पना करता येते.

जाने. १९५२ नंतर 'साहित्य' च्या प्रकाशनात काही वर्षे खंड होता. १९५६ व १९५७ साली दोन वार्षिकांक प्रा. वसंत दावतरांच्या संपादनाखाली निघाले. त्यात त्या त्या वर्षी प्रसिद्ध झालेले ग्रंथ आणि मासिकात आलेले त्या प्रकारातील लेखन यांचा परामर्श घेतला गेला आहे. कविता, कथा, नाटके व एकांकिका, ललितलेख, कादंबरी व निबंध या साहित्य प्रकारांविषयी हे

समालोचनात्मक लेखन पुस्तकरुपाने आले. अभ्यासकांना ते उपयुक्त ठरणारे आहे. पुढेही काही विशेषांक निघाले ते म्हणजे डॉ. भीमराव कुलकर्णी विशेषांक (१९८७), जागतिक मराठी परिषद विशेषांक (१९८९), काव्य ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी व साहित्य संमेलन विशेषांक (१९९०), विनोद साहित्य संमेलन, कथा, साहित्य संमेलन विशेषांक (१९९१) जन्मशताब्दी विशेषांक (१९९२).

एप्रिल १९९५ पासून 'साहित्य' त्रैमासिक म्हणून मल्हार ढगे यांच्या संपादनाखाली सुरु झाले आणि आजही ते प्रसिद्ध होत आहे. दरम्यानच्या काळात त्या मधून 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' अंतर्गत प्रसिध्द साहित्यकांची मनोगते आली. तसेच वि.स.खांडेकर, आचार्य अत्रे, नाना साहेब फाटक, पु.ल. देशपांडे, इंदिरा संत स्मृती अंक असे काही संग्राह्य व वाचनीय अंक प्रसिद्ध झाले. २००१-२००२ या वर्षापासून 'साहित्य'चा दिवाळी अंक सुरु झाला. अलीकडे 'साहित्या'ने कात टाकून दर्जेदार संग्राह्य अंक देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. अलिकडील विशेषांकांमध्ये कुसुमाग्रज जन्मशताब्दी विशेषांक (फेब्रुवारी २०११), महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव विशेषांक ( मे २०११), संत साहित्य विशेषांक (मे २०१४) अणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य विशेषांक (मे २०१५), यांचा विशेष उल्लेख करायला हवा. हे सर्व विशेषांक आणि दिवाळी अंक अभ्यासक व रसिकांमध्ये खूप नावाजले गेले. साहित्यच्या येत्या चार दिवाळी अंकांना १७ प्रतिष्ठेचे पुरस्कार लाभले हे रसिकप्रियतेचे द्योतक आहे. 'साहित्य'ची ही कामगिरी वाङ्मयीन नियतकालिकामध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरावी अशी आहे.

१९४७ पासून आजवरचे संपादक : वा.रा.ढवळे, वसंत दावतर, भिमराव कुलकर्णी, केशव मेश्राम, रवींद्र पिंगे, वसुंधरा पेंडसे नाईक, पद्मा घारपुरे, मल्हार ढगे, उज्ज्वला मेंहेदळे, रमेश मंत्री, उषा तांबे, निरंजन उजगरे, सुहासिनी कीर्तिकर, अनुपमा उजगरे आणि सध्या अशोक बेंडखळे.

(सौजन्य : ललित मे २०१३ )



# साहित्य संघाची नाट्य शाखा (१९३५ ते २०१५)

**- सुभाष भागवत**

मुंबई मराठी साहित्य संघ - मुंबईतील एक अग्रगण्य संस्था. सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रात अमूल्य असे योगदान या संस्थेने दिले. 'मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना दिनांक २१ जुलै १९३५ रोजी झाली.तेव्हा या संस्थेचे कार्यालय संस्थेचे चिटणीस कै. डॉ. अ.ना.भालेराव यांच्या गिरगाव येथील विठ्ठलभाई पटेल रोडवरील 'नारायण मॅन्शन' या निवासस्थानी होते. या संस्थेने रौप्यमहोत्सव, सुवर्णमहोत्सव, हीरक महोत्सव, अमृतमहोत्सव आपल्या लौकिकास साजेसे आयोजित केले. आता हे संस्थेचे अष्टदशकपूर्ती वर्ष आहे.

१९३८ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अधिवेशन मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहयोगाने, महाराष्ट्र साहित्य परिषदेने मुंबई येथे भरविले. या संमेलनात संघान कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अप्रकाशित व अप्रायोजित 'माया विवाह' या नाटकाचा प्रयोग सादर करून साहित्य संमेलनात येणाऱ्या प्रतिनिधींचे मनोरंजन करण्याची प्रथा सुरु केली. साहित्याच्या अभिवृध्दी बरोबरच नाट्य संगीत, चित्र, नृत्य या कलांचा परामर्षही साहित्य संमेलनांनी घेतला पाहिजे व समाजाच्या सांस्कृतिक जीवनाची पातळी उंचावण्यास सहाय्यभूत झाले पाहिजे हा उद्देश या उपक्रमामागे होता.

साहित्य संमेलनाप्रमाणेच नाट्य संमेलने १९०५ सालापासून महाराष्ट्रात भरत आली आहेत. १९४१ साली नाट्य संमेलन मुंबईत भरण्याचे साहित्य संघाने आयोजिले व नाट्य संमेलनाचे ३२ वे अधिवेशन १९४१ साली विल्सन हायस्कूल मध्ये भरविले. या संमेलन प्रसंगी इब्सेनच्या 'Doll's House' या नाटकाचे अनंत काणेकर यांनी केलेले रुपांतर 'घरकुल' व मामा वरेरकर लिखित 'उडती पाखरे' अशा दोन नाटकांची निर्मिती साहित्य संघाने केली. आणि तेव्हा पासून साहित्य संघाच्या नव्या नाटकांच्या निर्मितीचा प्रारंभ झाला. याच नाट्य संमेलनात नटवर्य केशवराव दाते यांनी आपल्या भाषणात, 'आम्हा नटांना उभे रहाण्यास जागा द्या' अशी विनंती केली. या विनंतीचा परिणाम एवढा झाला की, संघाने लवकरच नाट्यगृहाची सोय असलेले मंदिर बांधण्याचा संकल्प केला, व त्यासाठी निकराचे प्रयत्न सुरु केले.

१९४३ च्या नोव्हेंबरमध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवात 'शारदा' या नाटकाची निर्मिती मुंबई मराठी साहित्य संघाने केली. या नाटकाच्या प्रयोगाचे धुरीणत्व डॉ. अ.ना. भालेराव यांनी केले होते.

१९४४ च्या एप्रिल महिन्यात साहित्य संघाने आपला नाटयोत्सव आयोजित केला. या महोत्सवात मराठी रंगभूमीवर अधिराज्य गाजविणाऱ्या व आपल्या अविट गोडीने रसिक प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या जुन्या नाटकांपैकी संगीत शारदा, संगीत सौभद्र, संगीत स्वयंवर, संगीत सत्तेचे गुलाम, भाऊबंदकी या प्रथम श्रेणीच्या नाटकांबरोबरच त्या काळात नवीन आलेल्या 'सारस्वत, जन्माचे सोबती,' या नाटकांचाही समावेश होता. कै. राम गणेश गडकरी कृत वेड्यांचा बाजार हे नाटक साहित्यिकांनी सादर करून लेखक सुध्दा अभिनय निपुण नट असतात हे दाखवून दिले. या शिवायश्री. प्रभाकर म. गुप्ते यांनी लिहिलेल्या 'शकुंतला स्वप्न' या संगीतिकेचे सादरीकरण झाले आणि याच बरोबर मराठीत 'ऑपेरा' या नाट्य प्रकारास रंगभूमीवर सुरवात झाली. हा नाट्यमहोत्सव मरीन लाईन्स वर सागराच्या सान्निध्यात एका विस्तीर्ण मोकळया जागेवर दररोज ५ ते ८ हजार प्रेक्षकांच्या साक्षीने मोठ्या दिमाखात संपन्न झाला. 'ओपन एअर

थिएटरचा' एवढया मोठया प्रमाणात उपयोग निदान आपल्या देशात पहिल्यानेच केला गेला असे जाणकारांचे मत आहे. शेकडो जणांच्या सहकार्याने हा उत्सव साकारला गेला, पण याचे खरे कल्पक सूत्रधार होते संघाचे संस्थापक चिटणीस डॉ. अ. ना. भालेराव.

१९४९ साली नाट्यविषयक कार्य सातत्याने करण्यासाठी संघाने नाट्यशाखेची स्थापना केली. श्री. शं.ना. अंधृटकर हे पहिल्यापासून नाट्य नाटय शाखेचे कार्यवाह म्हणून काम करीत होते. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ३३ वे अधिवेशन १९५० साली मुंबई येथे भरले होते. या संमेलनात शेवटच्या दिवशी श्री. वि.वा.शिरवाडकर यांच्या 'वैजयंती' नाटकाचा प्रयोग साहित्य संघाच्या नाट्य शाखेने सादर केला. या प्रयोगात दुर्गाबाई खोटे, नानासाहेब फाटक, मामा पेंडसे, मास्टर दत्ताराम यांच्या भूमिका होत्या.

संघाच्या १९५२-५३ चा नाटयोत्सव गिरगावातल्या उघड्या नाट्यमंदिरात संपन्न झाला. नाटयगृहासाठी खुर्च्या विकत घेण्यासाठी साहित्य संघाच्या नाट्य शाखेने पु.ल.देशपांडे यांचे 'अंमलदार' हे नाटक बसविले होते. या नाटकाचे दिग्दर्शन डॉ. अ.ना. भालेराव यांचे होते. १९५३ साली रेल्वेच्या शताब्दी निमित्त दिल्ली येथे नाट्य प्रयोग करण्यासाठी साहित्य संघाला आमंत्रित केल्यामुळे संघाने 'खडाष्टक' व 'भाऊबंदकी' हे दोन नाट्य प्रयोग केले. त्यानंतर १९५४ साली भारत सरकारने आयोजित केलेल्या बहुभाषिक राष्ट्रीय नाट्य महोत्सवात साहित्य संघाने 'भाऊबंदकी'या नाटकाचा दृष्ट लागण्याजोगा प्रयोग सादर केला. या नाटकात नटवर्य नानासाहेब फाटक व दुर्गाबाई खोटे प्रमुख भुमिकेत होते. या नाटकाला पारंपरिक विभागामध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. या नाटकाबरोबर दिल्लीवर मराठी प्रेक्षकांसाठी संघाने 'होनाजी बाळा' या नाटकाचा प्रयोग केला. याच वर्षीच्या नाटयोत्सवात शेक्सपिअरच्या 'मॅक्बेथ' या नाटकाचा वि.वा.शिरवाडकरांनी केलेला मराठी अनुवाद 'राजमुकुट' संघाच्या नाटयशाखेने सादर केला. दि.२६ जाने.१९५७ रोजी नाट्य शाखेने पु. ल. देशपांडे लिखित व दिग्दर्शित 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचा प्रयोग सादर केला. यातील 'काकाजी' ची भूमिका नटश्रेष्ठ दाजी भाटवडेकरांनी अजरामर केली.

१९५८ च्या अखेरीस संघाची बालनाट्य शाखा श्रीमती सुधा करमरकर यांच्या नेतृत्वाखाली सुरु केली.दि. २ जानेवारी १९५९ रोजी श्री. रत्नाकर मतकरी लिखित 'मधुमंजरी' या नाटकाचा प्रयोग संघ मंदिरात झाला. नंतर सुधा करमरकर लिखित 'जादुचा वेल' हे बालनाट्य देखील सादर झाले.

१९६० साली महाराष्ट्र सरकार आयोजित नाटय महोत्सवात पु.ल.देशपांडे लिखित 'सुंदर मी होणार' व कै. कृ.प्र.खाडिलकर लिखित 'सवाई माधवरावांचा मृत्यू' ही नाटके संघाने सादर केली.

संघाच्या नाट्य समितीने १९६२ साली कै. डॉ. अमृत नारायण भालेराव यांच्या स्मरणार्थ 'अमृत नाट्य भारती' या नाट्य विभागाची स्थापना केली.

दि. ६ एप्रिल १९६४ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते 'मुंबई मराठी साहित्य संघ मंदिर' या वास्तुचे उद्‌घाटन झाले.

ज्यांनी या साहित्य संघ मंदिराचे स्वप्न पाहिले होते आणि ते साध्य करण्यासाठी आपले आयुष्य वेचले ते संघ संस्थापक आणि संवर्धक डॉ. भालेराव यांचे नाव साहित्य संघातील नाटयगृहाला प्रदान करण्यात आले.

१९७४ सालातील साहित्य संघाच्या नाटय शाखेच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची व महत्त्वाची घटना म्हणजे 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटयशाखेने निर्मिती केलेल्या नाटकाचा युरोप दौरा.

१९७५ साली भरत नाटयशास्त्रानुसार अभिप्रेत असलेल्या रंगभूमीवर 'मुद्राराक्षस' या नाटकाची निर्मिती नाटयशाखेने केली. प्रयोग पहाण्यासाठी जर्मनीतील दिग्दर्शक हजर राहून त्यांनी नाटकाच्या सादरी करणा विषयी गौरव केला. नंतर या नाटकाचा जर्मन भाषेत तेथे प्रयोग झाला.

१९८२ साली साहित्य संघाच्या नाटयशाखेकडे एक चांगले नाटक आले, ते म्हणजे विश्राम बेडेकर यांनी लिहिलेले 'टिळक आणि आगरकर'. या नाटकाचे दिग्दर्शनही स्वत: बेडेकरांनी केले. एक दर्जेदार कलाकृती म्हणून या नाटकास मान्यता मिळाली.

१९४७ साली साहित्य संघाने वि. वा. शिरवाडकर लिखित 'दुसरा पेशवा' हे बाजीराव पेशवे यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले होते. त्या नंतर १९८४ साली बाजीराव पेशवे यांच्या जीवनावरील दुसऱ्या नाटकाची निर्मिती साहित्य संघाच्या नाट्य शाखेने केली. ते नाटक म्हणजे पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित व दिग्दर्शित 'रविराज तो मी रोहिणी' हे होय.

१९८५ साली साहित्य संघाच्या सुवर्ण महोत्सवी नाट्योत्सवात अनेक नाट्य संस्थानी सादर केलेल्या नाटकांसोबत साहित्य संघ नाट्यशाखेची निर्मिती असलेले 'सुंदरा मनामध्ये भरली' व 'संगीत मानापमान' ही नाटके सादर झाली.

या नंतरच्या दशकात (सन १९९६ ने २००५) पुढील नाटकांचे संघ नाट्यशाखेने एक वा अधिक प्रयोग केले. 'राधाकृष्ण', 'धाडिला राम तिने कां वनी ?' 'बेबंदशाही', 'सह्याद्रीची हाक', 'एक दिवस सुनेचा', 'कादंबरी', 'पाणिग्रहण', 'मोराचे अश्रू', 'धन्य ते गायनी कळा', धन्य ती प्रेमगाथा,' 'संन्यस्त खड्ग,' 'गीता गाती ज्ञानेश्वर', 'संशयकल्लोळ', 'सौजन्याची ऐशी तैशी', 'पुण्यप्रभाव', 'स्वयंवर', 'हाच मुलाचा बाप' 'ययाती-देवयानी', 'अमृत नाट्य गाथा', 'होनाजी बाळा', 'थोडी ओली पाने', 'लेक लाडकी' आणि 'नमन नटवरा'. याच



डॉ. अ. ना. भालेराव स्मृतिदिनात बोलताना डॉ. बाळ भालेराव (२०११)




डॉ. अ. ना. भालेराव जन्मशताब्दी महोत्सवात डॉ. य. दि. फडके यांचा सत्कार करताना गंगाधर गाडगीळ (२००२)




अमृत महोत्सवी वर्षातील रंगभूमीदिन (५ नोव्हेंबर २००९)

दशकात २७ नोव्हेंबर २००४ रोजी राज्य नाट्य स्पर्धेत श्रीमती उषा खाडिलकर लिखित 'हॅलो डिअरेस्ट' हे नाटक नाटयशाखेने सादर केले. या प्रयोगाचे दिग्दर्शन श्री. विलास म्हामणकर यांचे होते. दिनांक २१ मे २००५ रोजी महाराष्ट्र राज्य संगीत नाट्य स्पर्धेत कै. गोपाळकृष्ण भोवे लिखित 'धन्य ते गायनी कळा' हे नाटक नाट्य शाखेने सादर केले. या नाटकाचे दिग्दर्शन श्री. मनोहर सोमण यांचे होते. या स्पर्धेत या नाटकाने तृतीय क्रमांकासह संगीत, अभिनय, गायन या विभागात अनेक पारितोषिके मिळविली. याच नाटकाचा प्रयोग दिल्ली येथे महाराष्ट्र शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेने आयोजिलेल्या मराठी नाट्यस्पर्धेतही अभिनय, संगीत, गीत सादरीकरण अशा अनेक पारितोषिकांचा सन्मान मिळविला.

दि. २६ मार्च २००६ रोजी महाराष्ट्र संगीत नाट्य स्पर्धेत श्री. मनोहर सोमण लिखित व दिग्दर्शित 'धन्य ती प्रेमगाथा' या नाटकाचा प्रयोग केला. यास द्वितीय क्रमांकासह संगीत, लेखन, दिग्दर्शन , संगीत गायन, अभिनय इत्यादी विभागात पारितोषिके मिळाली.

सन २००७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या अनुदान योजनेतून संघात 'संत गोरा कुंभार' या नाटकाची निर्मिती केली. याच नाटकाने व्यावसायिक नाट्य स्पर्धेत अभिनय, वेषभूषा, रंगभूषा अशा विभागात सर्वोत्कृष्ठ पारितोषिके मिळविली. याचे दिग्दर्शन श्री. प्रमोद पवार यांचे आहे. आजवर या नाटकाने शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचा टप्पा पार केला आहे.

दि. २६ डिसेंबर २००९ रोजी संघाने आपल्या एकेकाळी गाजलेल्या 'धाडिला राम तिने कां वनी ?' या नाटकाचे पुनरुज्जीवन केले. यासाठी संगीत मार्गदर्शन व दिग्दर्शन श्री. अरविंद पिळगांवकर यांचे होते.

सन २०१० मध्ये साहित्य संघाची निर्मिती असलेल्या 'संन्यस्त खड्ग', 'संत गोरा कुंभार ' व 'धाडिला राम तिने का वनी ?' या नाटकांचे महाराष्ट्र व गोव्यात प्रयोग झाले. २०११ मध्ये संघाच्या अमृतनाट्य भारती मधून राज्य संगीत नाट्यस्पर्धेत 'प्रीती संगम' या नाटकाचा नवीन कलाकारांच्या संचात प्रयोग सादर करण्यात आला. दिग्दर्शक श्री. अरुण पालव.

दि. १९ डिसेंबर २०१२, राज्य नाट्यस्पर्धेसाठी, श्री. मनोहर सोमण लिखित 'ओळख' या नविन नाटकाचा प्रयोग अमृत नाट्य भारतीने सादर केला. या नाटकाचे दिग्दर्शन श्री. विलास म्हामणकर यांचे होते.

'संगीत विद्याहरण' या नाटकाचे २०१२ हे शताब्दी वर्ष असल्याचे औचित्य साधून नाट्यशाखेने या नाटकाचे नव्या संचात प्रयोग केले. या नाटकाचे दिग्दर्शन ज्येष्ठ नट श्री. उपेंद्र दाते यांचे होते. आणि संगीत मार्गदर्शन श्री. मकरंद कुंडले यांनी केले.

सांस्कृतिक कार्य संचलनालय महाराष्ट्र शासन आयोजित सप्तरंग २०१३ हा महोत्सव मुंबईत संपन्न झाला. या महोत्सवात दि. १६ जानेवारी २०१३ रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात ज्येष्ठ कलावंत श्री. अरविंद पिळगांवकर यांना 'अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आणि संघाच्या 'धाडिला राम तिने कां वनी ?' या अरविंद पिळगांवकर दिग्दर्शित नाटकातील काही प्रवेश सादर करण्यात आले.

नाट्यशाखेची स्थापना झाल्यापासून शं. ना. अंधृटकर हे नाट्य शाखेचे कार्यवाह होते. या अष्टदशकपूर्ती वर्षात श्री. सुभाष भागवत हे कार्यवाह पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळीत आहेत.

या ८० वर्षाच्या प्रदीर्घ प्रवासात साहित्य संघाने १७५ पेक्षा अधिक नाटकांचे हजारो प्रयोग केले. या नाटकांचे दिग्दर्शक म्हणून रंगभूमीवरील मान्यवरां-पाठोपाठ अनेक नवोदित रंगकर्मींना संघाने प्रकाशात आणले. आजवर शेकडो कलाकारांना रंगभूमीवर संधी दिली. साहित्य संघ नाट्य शाखेची ही वाटचाल यापुढे सुध्दा अशीच सुरु रहाणार आहे, हे निश्चित.

**- सुभाष भागवत**
९८२०३०३२५२

# मुंबई मराठी साहित्य संघ आणि मी

**- विजया मेहता**



साहित्य संघाशी माझा संबंध १९५२ साली, दाजी भाटवडेकरांच्यामुळे प्रथम आला. अलकाझी मर्झबान, रंगायन, व्यावसायिक रंगभूमी, आंतरराष्ट्रीय रंगभूमी असे टप्पे माझ्या नाट्यप्रवासात चालू असतानाही तो संबंध कायम राहीला. याचं कारण साहित्य संघात भेटलेल्या अनेक व्यक्तीआणि त्यांच्यामुळे मिळालेले नाट्यसंस्कार.

आठवणी अनेक - साठ वर्षांनी मागे वळून पहात असल्यानं हृद्य वाटणाऱ्या.

रंगमंच तेवढा बांधलेला, बाकी प्रेक्षागृह उघड्यावर, प्रयोगापूर्वी रोज लावल्या जाणाऱ्या खुर्च्यांच्या रांगा, प्रयोग संपताच त्यांच्या मोठ्ठाल्या चवडी रचून त्यावर किंतान टाकून झाकून ठेवलेल्या. रंगमंचावर उभं राहाताच समोर दिसणारी नारळांची उंच झाडं. प्रेक्षागृहाच्या मागील बाजूला मिळणारे दिवाडकरांचे बटाटेवडे.

झुंझारराव, संशयकल्लोळ, दुर्गा, सवाई माधवरावांचा मृत्यु, या सर्व नाटकांतून मातब्बर नटमंडळींबरोबर भूमिका करताना माझी उडालेली तारांबळ आणि लहान मुलीला सांभाळावं तशी नानासाहेब फाटक, केशवराव दाते, मामा पेंडसे, के. नारायण काळे यांनी माझी केलेली निगराणी.

दुर्गाबाई खोटे, गणपतराव बोडस, मा.दत्ताराम यांच्या चिरस्मरणीय भूमिका. 'सौभद्र', 'मानापमान', 'शारदा', 'वैजयंती' असे वेधक नाट्यप्रयोग.

पु.ल.देशपांडेची नाटकं -'तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार' यांचं असामान्य यश, तिकिटांसाठी लागणाऱ्या रांगा, 'प्रत्येकी पाच तिकिटे मिळतील' असा तिकीट विक्रीच्या खिडकीसमोर झळकणारा फलक.

आणि या सगळ्याच्या जोडीला तमाशा, लावणी आदि लोकनाट्यांचे सरकारी उत्सव. आम्ही तरुण नाट्यवेड्या मंडळींचा 'साहित्य संघ' हा अड्डा बनला होता.

डॉ. भालेराव हे संघाचे कुटुंब-प्रमुख आणि आम्ही सारे कुटुंबिय. आज जाणवतंय, डॉक्टरांनी त्यांच्या या कुटुंबात मला निवारा दिला नसता तर हिंदी

साहित्य संघामुळे माझ्या कामाला दिशा मिळाली आणि माझ्या आयुष्यातील महत्वाचं वळण मी घेतलं तेही संघातच. दुर्गाबाई खोटे मला इथेच भेटल्या, कालांतरानं मर्झबानांच्याबरोबर माझ्या गुरू बनल्या आणि दोन वर्षात माझ्या सासुबाई...मी विजू जयवंतची विजया खोटे, एका अर्थी साहित्य संघामुळेच झाले.

पण साहित्य संघाची एक निवडक आठवण माझ्या स्मरणात खोलवर कोरली गेलीय...

'दुर्गा' नाटकाच्या तालमी गणपतराव बोडस घेत होते. डॉक्टर रुग्णशय्येवर होते, कित्येक महिने ते संघात आले नव्हते. त्यांचा निरोप आला, पहिल्या प्रयोगाच्या आधी मी दुर्गेचा सगळा मेकअप, कपडे वगैरे करुन त्यांना दाखवायचा. ठरल्याप्रमाणे प्रयोगाची पहिली बेल वाजण्याअगोदर वहिनींच्या बरोबर (वहिनी म्हणजे डॉक्टरांच्या पत्नी) डॉक्टरांच्या घरी गेले. डॉक्टरांना पलंगावरून उठताही येत नव्हतं. मी त्यांच्या पाया पडले. माझा मेकअप, कपडे त्यांनी बारकाईनं पाहिलं, 'नीट मन लावून काम कर' म्हणाले. डॉक्टरांचे त्यावेळचे डोळे मला अजून आठवताहेत.

त्यात कौतुक होतं, विश्वास होता. साहित्य संघाच्या यशाचं कारण डॉक्टरांच्या त्या नजरेत सामावलं होतं.

●







चित्रपटातली नटी म्हणून नाहीतर इंग्रजी थिएटरमध्ये भूमिका करणारी मराठी मुलगी म्हणून मी वावरत राहिले असते. डॉक्टरांच्या कारकिर्दीनंतरही मी संघातून नाटकं करतच राहिले. 'अजब न्याय वर्तुळाचा' या ब्रेश्तच्या मूळ नाटकावर आधारीत प्रयोगांना जागतिक कीर्ती मिळाली. संघाच्याच 'मुद्राराक्षस' या विशारवदत्तच्या प्रयोगांनी मला आंतरराष्ट्रीय रंगभूमीची कवाडं उघडून दिली.

# संवाद -
# डॉ. बाळ भालेरावांशी

**संवादक : अनुपमा उजगरे**



स्वप्न पाहणं हा सजीवांचा स्वभाव असतो. उच्च दर्जाची आणि उत्तुंग भरारीची स्वप्नं पाहणं हा सुजाण आणि सुसंस्कृत अशा व्यक्तींचा स्वभाव असतो. अशा व्यक्तींनी उभी केलेली संस्था जेव्हा शतकाकडे वाटचाल करते तेव्हा त्या संस्थेचा पाया उदात्त हेतूंवर रचला गेला आहे, असं खात्रीनं म्हणता येते. 'मुंबई साहित्य संघ' ही त्यापैकीच एक महत्त्वाची संस्था आहे. तिचं कार्य फक्त मुंबईच्या इतिहासापुरतं मर्यादित आहे असं नाही तर महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक इतिहासातही ते अधोरेखित करण्यासारखं आहे.

आज अष्टदशकपूर्तिच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या ह्या संस्थेच्या जन्मापासूनचे साक्षीदार आहेत डॉ. बाळ भालेराव. डॉ. बाळ भालेराव म्हणजे 'मुंबई साहित्य संघा'चा चालता बोलता इतिहासच आहेत, असं म्हटलं तर वावगं ठरु नये. ह्या संस्थेच्या वेगवेगळ्या पैलूंविषयी अधिकृतपणे अनेक आठवणी जाणून घेण्यासाठी माझ्यासह संघाच्या कार्याध्यक्ष प्रा. उषा तांबे, साहित्य शाखेच्या कार्यवाह प्रा. डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष आशाताई मुळगावकर, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, 'साहित्य'चे संपादक अशोक बेंडखळे - आम्ही डॉक्टरांची मुलाखत घेतली. ध्वनिचित्रफितीच्या स्वरुपात ती उपलब्ध असली तरी अक्षररुपाने ती रहावी आणि वाचकांना सहज उपलब्ध असली तरी अक्षररुपाने ती राहावी आणि वाचकांना सहज उपलब्ध व्हावी म्हणून 'साहित्य'च्या ह्या विशेषांकात तिचा समावेश करीत आहोत.

**प्रश्न :** 'साहित्य संघाची पन्नास वर्षे' ह्या पुस्तकात श्री. अंधृटकरांनी मुंबई साहित्य संघाला 'सांस्कृतिक सरिता' म्हटलंय. 'डॉ.अ.ना.भालेराव ह्यांनी ही स्वर्गंगा खेचून आणली' असाही त्यात उल्लेख आहे. ह्या सांस्कृतिक सरितेचा उगम कसा, कधी झाला ह्याविषयीच्या तुमच्या काय आठवणी आहेत ?

**डॉ. भालेराव :** खरं म्हणजे साहित्य संघाची स्थापना अपघातानंच झाली असं म्हणायला हरकत नाही. १९३५ साली महाराष्ट्र परिषद पुण्याला हलवल्यानंतर मुंबईत मराठीसाठी कार्य करणारी संस्था उरली नव्हती. त्यावेळी लेले, वर्दे, दौंडकर,तुळजापूरकर आणि माझे वडील

डॉ. अमृत नारायण भालेराव ह्या मित्रांनी ह्याबाबतीत काही तरी करायचं ठरवलं. मराठीसाठी जे जे म्हणून करता येईल ते ते करायचं, ह्या उद्देशाने प्रेरित होऊन मुंबईतला आणि मराठीसाठी काम करणारा संघ म्हणून 'मुंबई मराठी साहित्य संघ' हे नाव ठरलं आणि कामाचं स्वरुपही ठरलं. नंतर २१ जुलै १९३५ ला 'मुंबई मराठी साहित्य संघा'ची रीतसर स्थापना झाली. संस्थेचं कार्यालय विठ्ठलभाई पटेल रोडवरच्या आमच्या घरात - 'नारायण मॅन्शन'मध्ये होतं.

पहिल्या वर्षापासूनच संघाच्या कार्याला चांगली सुरुवात झाली. त्याकाळी 'सावकारी पाश' सिनेमा फार गाजला होता. त्याच्यावर संघाने जाहीर चर्चा घडवून आणली होती. चर्चेत भाग घेणाऱ्या वक्त्यांसाठी नि श्रोत्यांसाठी सेंट्रल सिनेमात त्याचा खास खेळ संघाने आयोजित केला होता.

**प्रश्न** : साहित्य संघाने नाटकांना बरंच प्राधान्य दिलं, असं म्हटलं जातं. 'साहित्य' संघाला 'नाट्यशाखे'ची सुरुवात का करावीशी वाटली ?

**डॉ. भालेराव** : संस्था चालवायची तर पैसा गाठीशी असावा लागतो. त्यासाठी नाटक, सिनेमा अशा एखाद्या कलेचा उपयोग करुन घेतला तर संघाला आर्थिक फायदा होईल, हे दूरदर्शी स्वभाव असलेल्या माझ्या वडिलांच्या लक्षात आलं. त्याकाळी करमणुकीच्या साधनांचा आजच्यासारखा सुळसळाट नव्हता. रेडियोसुद्धा क्वचितच कुणाच्या घरी असायचा. १९३८ च्या साहित्य संमेलनात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या अप्रकाशित आणि अप्रायोगित अशा 'मायाविवाह' ह्या नाटकाचा प्रयोग संघाने सादर केला. प्रतिनिधींचं अशा कलेद्वारे मनोरंजन करण्याची प्रथा संघाने सुरु केली. नंतर १९४४ ला मुंबईत रंगभूमीचा शतसांवत्सारिक उत्सव होता. त्यात संघाने यजमानपद स्वीकारलं होतं. आज तमाशांचे कार्यक्रम सर्रास होतात पण तुम्हाला आश्चर्य वाटेल, तमाशासारखा कलाप्रकार प्रथमच स्टेजवर आणला तो साहित्य संघाने. त्यावेळी संघावर टीकाही झाली होती. ह्याच काळात 'बालनाट्या'चा पायंडा घालण्याचं श्रेयदेखील साहित्य संघालाच द्यायला हवं.

नंतर संघाने बऱ्याच नाटकांचे प्रयोग केले. ते गाजले. नाटक हा साहित्याचाच एक भाग आहे. रंगभूमीचा शतक महोत्सव साजरा करताना नाट्यसंस्था आणि साहित्य संस्था तसंच पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया-मुलं यांचाही सहभाग असावा असं धोरण संघाने ठेवलं होतं. काही नवीन प्रयोगही संघाने केले. त्यात 'शकुंतला स्वप्न' हा 'ऑपेरा' होता. त्यात शाहू मोडक, नलिनी जयवंत आणि प्रभाकर गुप्ते ह्यांनी काम केलं होतं.

ह्या नाट्योत्सवात सर्वोत्तम ठरलेल्या नाटकासाठी असलेलं सुवर्णपदक संघाने सादर केलेल्या 'संगीत शारदा' ला मिळालं होतं. पंचाहत्तरीतल्या चिंतुभाऊ गुरवांनी त्यात असं काम केलं होतं की त्यांच्यासाठी १४०० रुपयांचा खास निधी उभारण्यात आला होता! प्रत्यक्ष आचार्य अत्रे पैसे गोळा करण्यासाठी प्रवेशद्वाराजवळ टोपी आपल्या हातात घेऊन उभे होते! शारदेचं काम करणाऱ्या वासंतीलाही सुवर्णपदक मिळालं होतं.

जुन्या नाटकांचा आस्वाद कालच्या आजच्या पिढीला मिळावा म्हणून संघाने 'शारदा', 'सौभद्र', 'स्वयंवर', 'सत्तेचे गुलाम', 'भाऊबंदकी' ही नाटकं केली. दिल्लीच्या नाट्यमहोत्सवात झालेल्या 'भाऊबंदकी' नाटकासाठी जवळ जवळ पन्नास माणसांचा ताफा दिल्लीला गेला होता. ते नाटक पाहायला पं. नेहरू आले होते. नंतर ह्या नाटकाने परदेशदौराही केला. 'अजब न्याय वर्तुळाचा', 'वैजयंती', 'मुद्राराक्षस' ह्यांसारखी काही नवी नाटकंही केली. संगीत नाटकांबरोबरच गद्य नाटकांचेही प्रयोग केले. साहित्य संघाने मराठी रसिकांची नाटकाची आवड कायम ठेवली आणि वाढवलीसुद्धा. लोक इतके रंगून जात की, शेवटचा पडदा पडल्यावरच उठत आणि पहाटेची पहिली लोकल पकडून घरी जात.

**प्रश्न :** त्यावेळी साहित्य संघाच्या नाटकांत स्त्रियांचा सहभाग कितपत होता ?

**डॉ. भालेराव :** स्त्रियांचा सहभाग तसा जवळ जवळ नव्हताच. त्यामुळे भालेराव, आमोणकर ही मंडळी आपल्याच घरच्या मुलींना काम करायला लावत. 'मायाविवाह' ह्या नाटकात माझ्या मावशीनंही काम केल्याचं आठवतंय. वासंतीने 'शारदा'मध्ये काम केलं, ते तिचं स्टेजवरच पहिलंच काम होतं. दुर्गाबाई खोटे ह्या श्रीमंत अशा लाड घराण्यातल्या. त्या आणि त्यांच्या सात बहिणी नऊवारी नेसून नटूनथटून बालगंधर्वांची नाटकं पाहायला यायच्या. त्यांना नाटकात काम करण्यासंबंधी वडिलांनी विचारलं. चांगल्या घराण्यातल्या स्त्रिया पुढे येत गेल्यामुळे स्त्रियांनी नाटकात काम करायला हरकत नाही असं लोकांनाही वाटू लागलं.

नाटकात काम करणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेची काळजी डोळ्यांत तेल घालून घेतली जायची. त्यामुळे संघाच्या नाटकात काम करायला बेबी शकुंतला, विजया जयवंत खोटे वगैरे कलाकार पुढे आले.

**प्रश्न :** मराठी रंगभूमीला मुंबई हे माहेरघर लाभलं ते साहित्य संघामुळे आणि डॉ.अ.ना.भालेरावांचं घर म्हणजे नाट्यकलेचं विद्यापीठ असं म्हटलं जाई....

**डॉ. भालेराव :** हो, त्याचं कारण असं की, सगळ्या तालमी आमच्याच घरात होत. गणपतराव बोडस आमच्या घरी येऊन राहत. हॉलमध्ये बसत. नाटकात काम करणारे आपापल्या वेळेनुसार यायचे. मग गणपतराव त्यांच्याकडून त्यांचा भाग घोटून घ्यायचे. शब्दोच्चार, संवादफेक ह्याबाबतीत ते फार काटेकोर असायचे. ज्योत्स्नाबाई भोळे, वनमलाबाई, दुर्गा खोटे ह्यांच्या उच्चारांवर त्यांनी बरीच मेहनत घेतली.

नाटक बसवण्यापासून तर ते सादर होईपर्यंत सगळंच - सगळ्याचं चहापान-खानपान सगळं काही आमच्या घरात व्हायचं. स्वत:चे पैसे, पेट्रोल खर्च करून ही मंडळी नाटक करायला म्हणून यायची. आमच्याकडून त्यांना बटाटेवडे नि कांदाभजी तेवढी मिळायची. माझी विधवा आत्या हे सगळं बघायची. आमच्या घरची चांदीची भांडीच नाही तर, माझ्या आईच्या साडया आणि खरेखुरे दागिनेदेखील नाटकात वापरले जायचे. दुर्गाबाई खोटे नाटकांतही खरे दागिने वापरायच्या. ते दागिने माझ्या आईचे असायचे. नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी माझी आई नऊवारी शालू नेसवून द्यायची. आईनेही हे सगळं हौशीने केलं.

नाटकांमधून पैसे निर्माण करता येण्याची शक्यता दिसली म्हणून नाटकांवर संघाने विशेष लक्ष केंद्रित केलं.

**प्रश्न :** आपल्या घरात नाटकच जास्त होतंय, आपल्याकडे दुर्लक्ष होतंय असं कधी वाटलं का ?

**डॉ. भालेराव :** आम्ही तसे लहानच होतो. आमच्याकडे फारसं लक्ष पुरवलं जात नव्हतं. पण आम्ही समजूतदार होतो. वडील जीव ओतून काही तरी करताहेत, आई अशिक्षित असूनही त्यांना विनातक्रार साथ देते आहे, ह्याची जाण होती. त्यामुळे घरात तालमींची गडबड असायची. कधी कधी तर तीन खोल्यांमध्ये तीन नाटकांच्या तालमी चालायच्या. तरी अभ्यास कधी चुकवला नाही. गच्चीवर जाऊन मी अभ्यास केला आहे.

**प्रश्न :** तुम्ही डॉ. अ.ना.भालेराव ह्यांचं व्यक्तिचित्र कसं रेखाटाल ?

**डॉ. भालेराव :** डॉ. अ.ना. भालेराव हे द्रष्टे होते. त्यांना माणसांची खूप चांगली पारख होती. त्यांचा माणसांचा संग्रह अफाट होता. लोकही त्यांना मान देत. त्यांच्या शब्दाखातर ते म्हणतील ते काम संघासाठी करायला तयार होत. रॉबर्ट मनी आणि शेजारीच असलेल्या विल्सन हायस्कूलच्या मुख्याध्यापकांशी त्यांचे चांगले संबंध होते. त्यामुळे त्यांची जागा कार्यक्रमासाठी सहज मिळायची. आम्ही सगळी तरुण मुलं मोठ्यांचं ऐकणारी होती. पडेल ते काम करीत असू. प्रा.वा.ल.कुळकर्णी हे आमचे विल्सन हायस्कूलमधले शिक्षक आणि नंतर

प्राध्यापक ते सांगतील ती कामं आम्ही करीत असू, खुर्च्या टाकण्यापासून तर फळ्यावर कार्यक्रमाविषयी लिहिण्यापर्यंत.

डॉक्टरांचा आपल्या कलाकारांच्या अभिनयावर प्रचंड विश्वास होता. 'भाऊबंदकी' च्या वेळेस माईक नव्हता तरी शेवटच्या रांगेपर्यंत आपल्या नटाचा उसासा ऐकू जाईल, ह्याची त्यांना खात्री होती!

माझे वडील माझ्यापेक्षा जास्त रागीट स्वभावाचे होते. मनात येईल ते बोलून टाकायचे. त्यांचं सगळं बोलणं समोरची माणसं मुकाट्याने ऐकून घेत. मात्र, नंतर संध्याकाळी घरी येऊन ती माणसं मग डॉक्टरांची कानउघाडणी करायची आणि तेव्हा डॉक्टर त्यांचं ऐकून घ्यायचे. इतकं स्वच्छ नातं त्यांचं एकमेकांशी होतं. डॉक्टरांनी कधी निराशेचा सूर लावला नाही. त्यांनी संघासाठी अक्षरश: जीव तोडून काम केलं. त्यांनी इतकं काम त्यावेळी केलं की, प्रत्यक्ष मरणच ओढवून घेतलं.

**प्रश्न** : संघाच्या इमारत उभारणी संबंधी काय सांगाल?

**डॉ. भालेराव** : डॉक्टरांचं अकाली निधन झाल्यावर आमोणकर, दाजी भाटवडेकर, अप्पा पेंडसे, डॉ. भालचंद्र पुरंदरे, डॉ.गं.मा.फडके वगैरे सगळ्यांनी डॉक्टरांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी निधी उभारायचं ठरवलं. तीन लाख रुपये जमले. बाकी कर्ज काढून उभे केले. धोबीतलावाजवळची -सध्या जिथे बिर्ला मातुश्री सभागृह आहे ती जागा संघाला मिळू शकत होती. पण मध्यमवर्गीय प्रेक्षकाचा विचार करून गिरगावातली ही जागा तेव्हा सगळ्याच दृष्टीने सोयीची वाटली, त्यामुळे ती घेण्याचं ठरलं.

संघाची आजची जागा म्हणजे पूर्वीचं ख्रिस्ती लोकांचं कबरस्थान होतं. त्यांना ते विकायचं होतं. पण स्मशानाची जागा म्हणून कुणी ती घ्यायला तयार नव्हतं. डॉक्टरांनी सुज्ञ विचार केला, 'आपला देव शंकर हा सुद्धा स्मशानातच तर राहणारा. घेऊन टाकू जागा.' फक्त २५ हजारात ही जागा तेव्हा मिळाली. तेव्हा चर्नीरोड ते ठाकुरद्वार असा संघासमोरून जाणारा मोठा रस्ता होणार होता. बाबूभाई कॉन्ट्रक्टर नावाचे डॉक्टरांचे एक पेशंट होते. त्यांनी २० हजारात असं स्टेज बांधून दिलं की, पुढे ते मोडायची वेळ आली तर त्यातूनही संघाला आर्थिक फायदाच होईल.

१९६० साली बांधकाम सुरु झालं. न.र. फाटकांच्या हस्ते पहिली कुदळ पडली. अनेक सधन कुटुंबांनी सढळ हातांनी संघासाठी मदत केली. रुईया, आपटे ह्यांच्यासारख्यांनी आर्थिक मदत केली. पु.लं.नी उद्‌घाटनाच्या वेळी पडदा दिली. शिवा चिखलीकर, अंधृटकर, बापूराव नाईक, डॉ. फडके अशा उदार मनाच्या लोकांनी आपला घरचा पैका संघासाठी लावला. शहाणे ह्यांनी इलेक्ट्रीकचं काम जातीने पाहिलं. आनंदराव ढोलेकरांनी माईक कसा वापरावा हे शिकवलं. नाट्यशाखेची जबाबदारी भार्गवराम पांगे ह्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. कुणी आर्किटेक्टने आपलं कसब पणाला लावलं. कुणी तांत्रिक बाबी सांभाळल्या. वामनराव देशपांडे (सुहासिनी मुळगावकरांचे वडील), सोहोनी, कान्होबा, अधिक शिरोडकर, दिवेकर, गाडगीळ, चं. वि. बावडेकर, दाजी भाटवेकर, पंडित ही सगळी माणसं संघाच्या कामात आपापला हातभार लावत आली. ह्या संदर्भात खूप जणांची नावं घेता येतील. सगळे जण स्वत:हून कामाला पुढे येत. स्वत:ला जे शक्य असेल ते ते स्वत:हून संघासाठी करीत. 'डॉक्टर सांगतील ते करायचं' हेच सगळ्यांचं धोरण होतं. डॉक्टरांनी सगळा असाच लोकसंचय केला होता. एकही रिकामटेकडा किंवा निरुपयोगी माणूस त्यांत नव्हता.

बालगंधर्वांच्या सामानावर जप्ती आली तेव्हा माझ्या वडिलांनी आणि डॉ. भडकमकरांनी पैसे देऊन ती सोडवली. माणसं अशी एकमेकांना मदत करणारी होती.

बापूराव नाईक इंग्लडला गेले असताना त्यांनी माझ्या वडिकांना पत्र पाठवून शेक्सपिअरच्या रंगमंचासारखा रंगमंच तयार करण्याची कल्पना

सुचवली. आपला हा रंगमंच ही त्याचीच मिनी आवृत्ती आहे.

**प्रश्न :** बुधवार योजना कशासाठी होती ?

**डॉ. भालेराव :** १९६४ साली मी इंग्लंडहून परतलो. नव्या पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी मी अशी एक कल्पना मांडली की, हौशी नाट्यसंस्थांनी एक प्रायोगिक नाटक करावं, त्यासाठी त्यांना आम्ही नाट्यगृहांचं भाडं आकारायचं नाही. त्यांच्या तिकिटाचे दर मात्र २ ते ५ रुपयांपेक्षा जास्त असू नयेत. ह्या योजनेला पाच वर्ष चांगला प्रतिसाद मिळाला. साहित्य संघाने जे नवे पायंडे पाडले त्यातला हा एक म्हणायला हरकत नाही.

**प्रश्न :** साहित्य संघाने सुरु केलेल्या व्याख्यानमाला बऱ्याच गाजल्या, त्याविषयी सांगा.

**डॉ. भालेराव :** त्याकाळी साहित्यिक एकत्र जमून गप्पा करीत. करमणुकीची साधनं मी मघाशी म्हटल्याप्रमाणे जवळजवळ नव्हतीच. रेडियो फार कमी लोकांच्या घरी असायचा. त्याच्यावर तेव्हा भक्तिसंगीत जास्त आणि भावगीतं कमी लागायची. वेगळ्या प्रकारची करमणूक हवी तर एखाद्या संस्थेत जाणं आवश्यक होतं. बौद्धिक भूक भागवण्यासाठी व्याख्यानमालेची सुरुवात संघाने केली. माझ्या वडिलांचा होरा अगदी खरा ठरला. लोक व्याख्यानं ऐकण्यासाठी गर्दी करायचे. अंधृटकरांनी साहित्य संघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जो इतिहास लिहिला त्यात त्याकाळी ३०० व्याख्यानं झाल्याचा उल्लेख आहे. संघाच्या कार्याची ही देखील नोंद महत्वाची म्हणायला हवी. चांगल्या पट्टीच्या वक्त्यांमुळे चांगले श्रोतेदेखील त्याकाळी साहित्य संघाने घडवले. गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, लक्ष्मीबाई टिळक ह्यांची जन्मशताब्दी व्याख्यानमालेने साजरी झाली. वामन मल्हार जोशी, डॉ. अ.ना. भालेराव, ह.ना. आपटे, अण्णा मार्तंड जोशी, नाथमाधव, लालजी पेंडसे, वि.स. खांडेकर, ल.ग.जोग अशा स्मारक व्याख्यानमालाही संघाने केल्या. लोक ज्यांच्या नावांमुळे व्याख्यानमालांना आवर्जून हजेरी लावतील अशी ही नावं होती.

**प्रश्न :** व्याख्यानमनालेचे विषय कोणते असत ?

**डॉ. भालेराव :** खूप विविधता होती विषयांत. 'इतिहास' सामाजिक' 'रसशास्त्र' आणि 'मानसशास्त्र' तसंच 'रोजगारी', 'मार्क्सवाद', 'मनुस्मृति', 'भाषा', 'शिक्षण', 'साहित्य', 'महाभारत', 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' असे अनेक विषय असायचे. सामान्य आणि बुद्धिवान अशा दोन्ही प्रकारच्या वर्गाच्या विचारांना चालना मिळेल असे विषय असल्यामुळे लोकांना ते ऐकायला आवडायचं. आज चर्चिला जाणारा 'ग्रंथकारांचं लेखनस्वातंत्र्य' हा विषयसुद्धा त्याकाळी घेण्यात आला होता.

व्याख्यानमालाक्तिरिक्त होणारी व्याख्यानं, परिसंवाद आणि वादविवाद हे देखील चांगले रंगत. 'आजच्या ललित साहित्याच्या संदर्भात मराठी टीका अपुरी पडते काय ?', 'मराठी साहित्यातील स्त्रीचित्रण' असे परिसंवादाचे विषय असत. 'नाटक हा मराठी साहित्यातील सर्वांत दुबळा वाङ्मयप्रकार आहे' अशा तऱ्हेचा वादविवादाचा विषय किंवा 'पोर्तुगीजांच्या नजरेतून शिवशाहीतील ऐतिहासिक प्रसंग' असे चांगले चांगले विषय असत. प्रियोळकर वगैरेंसारखे उत्तम वक्ते असायचे. राजकीय नेते डांगे ह्यांचं तर एकदा संस्कृतमध्ये अतिशय उत्कृष्ट भाषण झालं होतं आणि संस्कृत समजणारे श्रोते ते ऐकायला हजर होते, हे विशेष !

माझे वडील ज्यांना गुरुस्थानी मानत ते श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि वि. स. खांडेकर आपल्या मऊसूत आवाजात शांतपणे मुद्देसूद बोलत. न. र. फाटक स्वभावाने संतापी असले तरी तेही कधी मुद्दे सोडून बोलले नाहीत. कुसुमाग्रज मितभाषी होते. घरी बरेच बोलत. ते हाडाचे कवी होते. कवितेतून अधिक प्रभावीपणे बोलत. काणेकर फिरक्या घेण्यात पटाईत होते. पाध्ये त्यांच्या किनऱ्या आवाजामुळे चेष्टेचा विषय

होत. वाद होऊनही ही मंडळी कधी एकमेकांविषयी असूया बाळगत नसत. मुद्याला मुद्दा असायचा. हे सुसंस्कृतपणाचं लक्षण होत. ह्या सगळ्यांकडून अशा बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या होत्या.

व्याख्यानं ऐकायला माझे वडील नेहमी मागच्या रांगेत बसत. आपल्याला चांगलं 'ऐकता' आलं पाहिजे, असे ते म्हणत. मीसुद्धा व्यासपीठावर बसणं टाळत आलो आहे.

**प्रश्न** : अ.बा. गजेंद्रगडकर आणि न.र. फाटक हे साहित्य संघाचे दोन मानबिंदू म्हटले जातात. त्यांच्याविषयी सांगा.

**डॉ. भालेराव** : साहित्य संघाचे एक प्रमुख आधारस्तंभ असलेल्या अ.बा. गजेंद्रगडकरांचंही अकाली निधन झालं. सुमारे तेरा वर्ष ते संघाचे अध्यक्ष होते. साहित्यविषयक नवनवीन चळवळी त्यांनी संघात सुरु केल्या. 'साहित्य' हे द्वैमासिक त्यांच्या प्रेरणेमुळेच सुरु झालं. 'कोणतीही सार्वजनिक संस्था कर्जात असली तरच तिची प्रगती होते नि संस्थेलाही पैसे मिळतात' असं सांगून ते सगळ्यांची उमेद वाढवत. संघाच्या अनेक कठीण प्रसंगी त्यांनी अचूक नेतृत्व केलं. त्यांच्या नावाने आज मुक्तद्वार संदर्भ ग्रंथालय आहे. तिथे सोळा हजारावर ग्रंथ आहेत. त्यात इंग्रजी, संस्कृत आणि हिंदी ग्रंथसुद्धा आहेत. 'चित्रमयजगत', 'विविध ज्ञानविस्तार', 'नवयुग', 'मनोरंजन', 'ज्योत्स्ना', 'वीणा', 'पारिजात', 'साहित्य', 'समीक्षक' अशा अंकाचे बांधील अंकही आहेत. अभ्यासक तिथे येत असतात.

न. र. फाटक हे मूळचे साताऱ्याचे. संस्कृतचे स्कॉलर. चालता बोलता ज्ञानकोषच. संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाळ आतापर्यंतच्या सर्व अध्यक्षांच्या काळापेक्षा प्रदीर्घ म्हणजे जवळजवळ २९ वर्षांचा होता. एक पिढी त्यांनी घडवली असं म्हणायला हरकत नाही. त्यांच्या नावाने संघाने संशोधनकेंद्र सुरू केलं पण ते चालू ठेवणं आम्हाला जमलं नाही ह्याची खंत वाटते. त्यांचा फार दरारा होता. एखादा वक्ता फार बोलू लागला तर फाटक त्याला सरळ खाली बसवायचे.

**प्रश्न** : रॉबर्ट मनी हायस्कूलच्या पटांगणावर झालेल्या कविसंमेलनात असाच एक प्रकार घडला होता....

**डॉ. भालेराव** : ती एक मोठीच गंमत झाली होती. कविसंमेलनाचे अध्यक्ष होते प्रबोधनकर ठाकरे. एक कवी थांबता थांबेना. श्रोते कंटाळले होते. प्रबोधनकारांनी त्याला थांबायला सांगितलं तरी तो थांबेना. शेवटी त्यांनी त्या उचलला आणि प्रेक्षकांत नेऊन ठेवला !

**प्रश्न** : साहित्य, नाटय अशा संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते ह्याविषयी काय वाटतं ?

**डॉ. भालेराव** : 'भारतीय विद्या भवन' मध्ये एकांकिका स्पर्धा होत. दामू केंकरे, विजया मेहता त्यातूनच पुढे आले. गोवा हिंदू असोसिएशन ही एक संस्था होती. ह्या आम्हाला समकालीन असलेल्या संस्था म्हणाव्यात तेवढ्या आज कार्यरत राहिलेल्या नाहीत ह्याची खंत वाटते. संस्थांनी ह्याकडे लक्ष देणं मला आवश्यक वाटतं. एकट्या - दुकट्यांनी काम करण्यापेक्षा एकमेकांच्या सहकार्याने काही कामं संस्थांनी केली पाहिजेत. ते सगळ्यांना लाभदायक ठरेल.

**प्रश्न** : संघाने काढलेल्या नियतकालिकाविषयी सांगा.

**डॉ. भालेराव** : आपलं असं एक साहित्यविषयक मासिक असावं असं ग्रामोपाध्ये, मं.वि.राजाध्यक्ष वगैरे मंडळींना वाटलं. १९४६ सालच्या वार्षिक सभेत 'साहित्य' नावाचं द्वैमासिक काढायचं ठरलं. पूर्वी संघाचं 'वीणा' नावाचं मुखपत्र होतं. त्याचंच हे पुनरुज्जीवन. आजे हे 'साहित्य' त्रैमासिक म्हणून चालू आहे.

**प्रश्न** : संघाने पुरस्कार कधीपासून आणि कोणासाठी सुरु केले ?

**डॉ. भालेराव** : पुरस्कार देण्याचा विचार शि. मो. घैसासांनी मांडला होता. आता ही पुरस्काराची

रक्कमदेखील दाते जमवूनच होत होती. सहा हजार रुपयांपासून ते सुरु झाले. राज्यपुरस्कार ज्या साहित्यिकांना मिळाले, त्यांनाही संघ पुरस्कार देत असे.

**प्रश्न** : साहित्य संघाच्या नाट्यशाखा आणि साहित्य शाखा ह्याकडे तुम्ही कसं पाहता ?

**डॉ. भालेराव** : नाटकाकडे साहित्य संघाने आर्थिक स्थिती भक्कम करण्याचं एक महत्वाचं कलासाधन ह्याच दृष्टीने पाहिलं आहे आणि साहित्याला प्राधान्य दिलं आहे. बहुतेक नाटकं ही तोट्यात गेलेली होती किंवा कुणी करायला धजलं नाही, अशीही नाटकं संघाने केली आहेत. उदाहरणार्थ - पु.लं.चं. 'भाग्यवान' घ्या. बेडेकर यांचं 'टिळक-आगरकर' हे नाटक तर दीड वर्ष पडून होतं.

**प्रश्न** : त्यावेळी साहित्यिकांमध्ये काही वाद बरेच गाजले होते. संघाची त्यात काय भूमिका होती ?

**डॉ. भालेराव** : त्यावेळी खांडेकर, फडके, अत्रे अशा साहित्यिकांचे झालेले वाद हे तीन वर्षं, सहा वर्षं असे दीर्घकाळ चालले. पण ते एका विशिष्ट पातळीवर असायचे. साहित्यिकांचे वाद हे मुद्यांवरून गुद्यांवर कधीच आले नाहीत. एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करणारी त्यांची छापील उत्तरं वाचण्याची उत्सुकता लोकांना असायची. मराठी भाषेच्या संदर्भात सरोजिनी वैद्य एकूण मराठी भाषेविषयी बोलत तर, गंगाधर गाडगीळ मुंबईपुरतं बोलत. संघ कुठल्याच वादात कधी पडला नाही. संघाने नेहमीच 'रेफ्री'ची भूमिका घेतली. वाद मिटवण्याकडे संघाचा कल होता. आचार्य अत्रे ह्यांनी संघाची नेहमीच पाठराखण केली.

**प्रश्न** : संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी संघाने कोणती भूमिका घेतली ?

**डॉ. भालेराव** : 'संयुक्त महाराष्ट्र व्हावा' ही घोषणा प्रथम केली ती माडखोलकरांनी बेळगावच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन. 'भाषांवार प्रांतरचना', 'भावी महाराष्ट्रात मुंबई समाविष्ट करावी' ह्यावर अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, आप्पा पेंडसे वगैरेंनी महत्त्वाच्या सूचना, ठराव केले होते. महाराष्ट्राची रुपसंपदा ह्या शीर्षकाखाली महाराष्ट्रीय वाङ्मय, इतिहास, राजकीय, शैक्षणिक इत्यादी चळवळींचं समग्र दर्शन घडवणारं भव्य प्रदर्शन भरवण्यात संघाचा मोठा सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर संघाच्या इमारतीला रोषणाई केली होती. किल्ल्यासारखी सजावट केली होती.

**प्रश्न** : संघाने काही शिक्षणवर्ग सुरु केले होते ?

**डॉ. भालेराव** : १९४९ साली नाट्यविषयक कार्य सतत चालू राहावं म्हणून नाट्यशाखेची स्थापना झाली, तेव्हा संघाने नाट्यशिक्षण वर्ष चालू केले. केशवराव दाते, नानासाहेब फाटक, मामा पेंडसे, के. नारायण काले, पार्श्वनाथ आळतेकर अशा मोठ्या माणसांची व्याख्यानं त्यात झाली. संघाचं काम सुरुवातीला गिरगावच्या सरस्वती हायस्कूलच्या जागेत चालायचं. शाळा सुटल्यावर तिथे प्राज्ञ विशारदचे वर्ग भरायचे. नोकरी करुन मराठीचा विशेष अभ्यास करणारे तिथे यायचे. वा. ल. कुळकर्णी, रा. भि. जोशी, अनंत काणेकर, म. य. करंदीकर, र. वि. हेडवाडकर, वा. रा. ढवळे, प्रभाकर पाध्ये, र. य. पेंढारकर अशी नावाजलेली

डॉ. भालेराव स्मृतिदिनी
बोमन बेहराम, गुंजीकर व डॉ. बाळ भालेराव



मंडळी तिथे शिकवायला यायची. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे वाङ्मयीन परीक्षेचे वर्ग संघाने आपल्या स्थापनेपासून भरवले होते पण नंतर स्वत:च्या वाङ्मयीन परीक्षा १९६४ सालापासून सुरू केल्या. त्याची केंद्रं ठिकठिकाणी सुरु केली. ढवळ्यांचा त्यात मोठा सहभाग होता. अमराठी भाषिकांसाठी १९७० साली वर्ग सुरु केले. रशियन, बंगाली, सौंदर्यशास्त्र असेही वर्ग चालू केले होते. अमराठींसाठीचे वर्ग आजही चालू आहेत.

**प्रश्न :** संघाने सुरुवातीला ज्यांना नाव मिळवून दिलं ती माणसं नंतर मोठी झाली, संघापासून दूर गेली...

**डॉ. भालेराव :** पंखांत बळ आलं की, सगळीच पाखरं उडून जातात आणि त्यांनी उडायलाच हवं. त्यात काहीच वावगं नाही. जागेवरची माणसं ही बदलत राहिली पाहिजेत. तरच ताजेपणा राहतो. एखाद्याच्या मृत्यूनंतर दुसऱ्या एखाद्याच्या जन्म होतच असतो. निसर्गनियम आहे तो. नव्यांच्या कल्पनाशक्तीला आणि कार्यशक्तीला वाव मिळत राहिला पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या जाण्याची उगाच खंत करीत बसण्यात अर्थ नसतो.

**प्रश्न :** संघामध्ये महिला टक्का अधिक कार्यरत आहे. इतर साहित्य संस्थांमध्ये इतकं प्राधान्य स्त्रियांना दिलं जात नाही.

**डॉ. भालेराव :** अहो, एके काळी फक्त तीनच स्त्रिया संघात कार्यरत होत्या पण आज संघामध्ये महिला टक्का अधिक आहे, ही खरी गोष्ट आहे. माझी आत्या आणि आई दोघीही अशिक्षित होत्या. त्यांनी त्यांच्या परीने खूप काम केलं. पण अशिक्षित असल्यामुळे आणि वैधव्य आल्यामुळे त्याकाळी स्त्रियांची किती परवड होई, त्यांना दुसऱ्यांवर किती अवलंबून राहावं लागे हे मी जवळून अनुभवलंय. स्त्री सुशिक्षित असेल, कमावती असेल आणि तिच्या कर्तबगारीला वाव मिळाला तर ती कुठल्याही क्षेत्रात उत्तम काम करु शकते. इंग्लंमध्ये स्त्री पंतप्रधान झाली नसती तर स्त्रिया पुढे आल्या नसत्या. आपल्या साहित्य संघातही स्त्रियांची कर्तबगारी सिद्ध झालीय. एकदा तर सर्व पदाधिकारी स्त्रियाच होत्या, असंही झालंय. संघाला त्याचा अभिमान आहे.

**प्रश्न :** संघाच्या पुढच्या वाटचालीबद्दल काय वाटतं?

**डॉ. भालेराव :** साहित्य संघाची आर्थिक स्थिती अति उत्तम नसली तरी सध्या बरी आहे. सध्याच्या आणि पुढच्या कार्यकर्त्यांनी चांगलं काम केलं तर संस्था दहा वर्षं टिकायला हरकत नाही. दहा वर्षं मी अशासाठी म्हणतो की, संस्थेत सेवाभावाने, सातत्याने आणि आत्मीयतेने काम करणारी तसंच, महत्त्वाचं म्हणजे दूरदृष्टी असलेली माणसं संस्थेला लाभली पाहिजेत. नव्याचा ध्यास असेल तर ताजेपण राहील, नाहीतर मरगळ येईल. साहित्य संघाच्या समकालीन संस्था त्यामुळेच लयाला गेल्या.

ज्यांचा संसार बरा चालला आहे, अशा सुखवस्तू लोकांनी दरवर्षी थोडी आर्थिक मदत करायला हवी. संघानेही गिरगावांत काम करत असताना थोडं बाहेरही पडून काम केलं पाहिजे. प्रेक्षक, श्रोते ह्यांचा शोध घेऊन त्यांच्यापर्यंत पोहचलं पाहिजे. महानगर आणि महाविद्यालयीन साहित्यसंमेलनांमधून हे घडतं आहे, ही चांगली गोष्ट आहे. महामंडळाची स्थापना १९६१ साली झाली. त्यांच्या प्रमुख संस्थापैकी एक साहित्य संघ आहे. त्यादृष्टीनेही साहित्य संघ कार्यरत आहे.

**प्रश्न :** संघाच्या कार्यकर्त्यांना काय सांगाल?

**डॉ. भालेराव :** साहित्य संघात काम करताना घरच्यांना विश्वासात घ्या म्हणजे आपोआपच त्यांचा तुमच्या कामाला पाठिंबा मिळेल आणि पाठबळही मिळेल. डॉ. आंबेडकर माझ्या डोळ्यांपुढे लोकांचे देव झाले. चैत्यभूमीवर कोणी कोणाला बोलवत नाही. हजारोंच्या संख्येने लोक स्वत:हून येतात. माणूस त्याच्या कामामुळे श्रेष्ठ ठरतो. आम्ही लहान असताना ज्ञानेश्वरांसंबंधी आम्हाला फारशी माहिती नव्हती. त्यांच्या सिनेमाने ती दिली. त्यांचे अभंग आम्हाला ठाऊक नव्हते. लताबाईंनी ते गायले नि घराघरात

ज्ञानेश्वर पोहचले. थोडक्यात असं की, एखाद्या विचाराचा प्रचारक जेवढा महत्त्वाचा, तेवढाच प्रसारकही महत्त्वाचा असतो. कार्यकर्त्यांनी पुढे जात असतानाच थोडं मागे वळूनही अधुनमधून बघावं. विरोधकांना चांगली कामं करून दाखवत चोख उत्तर द्यावं.

साहित्य आणि संस्कृती ह्यांच्या सेवेसाठी साहित्य संघाची निर्मिती झाली. त्यांनी अनुसरलेल्या मार्गाचं स्मरण करुन देण्यासाठी संघाकडे जाणाऱ्या रस्त्याला डॉ. भालेरांव मार्ग असं नाव देण्यात आलं, त्याला आता अर्धशतक उलटलंय. साहित्य संघाचं काम पुढे नेताना 'डॉ. भालेराव' ह्या नावाचा मला फायदा झाला. पण लोकांनी तुम्हाला तुमच्या नावाने ओळखण्यापेक्षा तुमच्या कामाने ओळखलं पाहिजे आणि अशा पद्धतीने काम करताना व्यवहार मात्र सोडता कामा नये.

साहित्य संघाने दोन पथ्यं कायम पाळली. एक म्हणजे संघाने राजकारण केलं नाही आणि दुसरं म्हणजे राजकारण्यांना कायम दूर ठेवलं.

**प्रश्न :** तुमच्या आयुष्यातला सर्वात आनंदाचा आणि पराकोटीचा नैराश्याचा क्षण कोणता ?

**डॉ. भालेराव :** दिल्लीला 'भाऊबंदकी' नाटकाचा प्रयोग होता. माझ्या अंगात ताप होता. पण वडिलांनी बजावलं, ''मेलास तरी चालेल, पण नाटक बघायला आलंच पाहिजे.'' त्या नाटकाला सुवर्णपदक मिळालं, तो माझ्या आयुष्यातला सगळ्यात आनंदाचा क्षण म्हणून सांगता येईल.

माझे वडील अकाली गेले तो प्रसंग अतिशय दु:खाचा होता. माझ्या आईने नवऱ्यावर पूर्णपणे विश्वास ठेवून आयुष्य घालवलं, तिच्यावर अचानक आभाळ कोसळलं होतं, तिचं दु:ख बघवत नव्हतं. ज्या संस्थेचं काम करता करता आपल्या नवऱ्याने जीव गमावला त्या संस्थेचं - 'साहित्य संघाचं काम करु नकोस' असं म्हणून तिने मला कधीच अडवलं नाही. ढवळे माझ्या आईला म्हणत, ''वहिनी, बाळला संघात फिरकू देऊ नका. त्याला संघापासून दूर ठेवा.'' पण आई म्हणायची, ''त्याला जे करायचं ते तो करीलंच. मी कसं थांबवणार ?'



मलाही वाटायचं आपल्या वडिलांनी ज्या संस्थेसाठी जीव ओतून काम केलं, तिच्यासाठी आपण काही तरी भरीव काम करणं हे आपलं कर्तव्य आहे. माझी अशिक्षित आई हे बोलून दाखवत नव्हती, मला संघात जाण्यासाठी मज्जावही करीत नव्हती पण तिचीसुद्धा हीच इच्छा असणार. मग रीतसर नियामक मंडळाचा सदस्य, कार्यकारी मंडळाचा सदस्य, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या मी स्वीकारत गेलो. माझ्या व्यावसायिक जबाबदाऱ्याही पार पाडत होतोच. माझी पत्नीही माझ्या आईसारखीच समजूतदार असल्यामुळे हे सगळं करता आलं. साहित्य संघाच्या कामांमध्ये सातत्य ठेवून, त्यात काही नावीन्य आणून ते टिकवता आले, माझ्या डोळ्यांपुढे माझ्या घरात पाठच्या भावासारखा जन्म घेतलेला साहित्य संघ आज ऐंशी वर्ष पूर्ण करताना मी पाहतो आहे, ह्याचा मला आनंद आहे.

# साहित्य संघ: काही क्षणचित्रे

मुंबई व उपनगर साहित्य संमेलन - वि. वा. शिरवाडकर



संघदिनाचे प्रवक्ते - द. वा. पोतदार





चिनी आक्रमण निषेध सभा- व्यासपीठावर वा. रा. ढवळे, अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, वा. ल. कुळकर्णी आणि पु. ल. देशपांडे



मासिक व्याख्यानमाला
- दुर्गाबाई भागवत



ब्रिटिश राजवटीत जप्त वाङ्मयावरील बंदी उठविण्यासाठी मुंबई सरकारकडे साहित्य संघाच्या वतीने गेलेले शिष्टमंडळ- वा. म. जोशी, मा. दा. आळतेकर, ना. म. जोशी, लालजी पेंडसे, न. चिं. केळकर, अ. ना. भालेराव, द. अ. तुळजापूरकर, श्री. म वर्दे

भूमिपूजन समारंभः
काकासाहेब गाडगीळ, मोरारजी देसाई, भाऊसाहेब हिरे



महर्षी धोंडो केशव कर्वे यांची संघाला भेट





डॉ. भालेरावांच्या प्रतिमेला
हार समर्पण



न. र. फाटक
भूमिपूजन करताना



दुर्गाबाई कुदळ मारताना

डॉ. अ. ना. भालेराव स्मृतिदिन



महाराष्ट्र राज्य स्थापना दिन



भाऊबंदकीचे सन्मान चिन्ह





भाऊबंदकी नाटकाचा दिल्लीत राष्ट्रीय सन्मान



दुर्गाबाई खोटे भाऊबंदकीला मिळालेले
पहिले पारितोषिक
राष्ट्रपतींच्या हस्ते स्वीकारताना

उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते सत्कार





नाट्योत्सव नाट्यगृहे व प्रेक्षक

गणपतराव बोडस पारितोषिक स्वीकारताना







मराठी भाषा मंडळ




चित्रकार द.ग.गोडसे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन (७.८.१९९२)



वर्धापनदिन सोहळ्यात
अचला जोशी लिखित
ज्ञानतपस्वी रुद्र
या पुस्तकाचे प्रकाशन



साहित्य शाखेच्या
एका कार्यक्रमात
मृणाल गोरे, शोभा डे आदि
मान्यवर (मार्च १९९२)



विंदा करंदीकर यांचा सत्कार करताना
गंगाधर गाडगीळ (डिसेंबर १९९८)




पुपुल जयकर यांच्या इंदिरा पुस्तकावर चर्चा
-सोबत उषा तांबे व अशोक जैन




डॉ. अ. ना. भालेराव
स्मृतिदिन




साहित्य महोत्सवात
लेखकांच्या सहचारिणी
परिसंवाद (२०११)

वि. पु. भागवत प्रकाशन पुरस्कार (२००९)






महाविद्यालयीन मराठी
साहित्य संमेलनातील दिंडी
(२०१५)




अमृत महोत्सवी कार्यक्रमात
मराठी बोलू कौतुके
पुस्तकाचे प्रकाशन (ऑक्टोबर २००९)

महानगर साहित्य संमेलनात मराठीशी माझे नाते
हा अन्य भाषक साहित्यिकांचा परिसंवाद (२००९)



वर्धापनदिन सोहळ्यात
कॉ. गोविंद पानसरे यांचा सत्कार








साहित्य संध्या कार्यक्रमात
डॉ. सदानंद मोरे यांचा सत्कार
(२०१५)




साहित्याच्या प्रांगणात
या कार्यक्रमात
मेघना पेठे यांच्या
हंस अकेला
या कथासंग्रहावर चर्चा
(१९९८)



दामू केंकरे महोत्सवाचे उद्घाटन करताना
अमोल पालेकर

नाट्यसेवा गौरव पुरस्काराचे वितरण :
मोहन जोशी यांच्या हस्ते सविता प्रभुणे यांना प्रदान





अशोक रानडे यांचे स्वागत करताना
दाजी भाटवडेकर




जयमाला शिलेदार
यांचा सत्कार करताना
मोहन तोंडवळकर

# साहित्य संघ: काही नाटके



मृच्छकटिक

भाऊबंदकी



सौभद्र





लग्नाची बेडी



मधुमंजिरी

होनाजी बाळा



तुझे आहे तुजपाशी





अजब न्याय वर्तुळाचा



टिळक आणि
आगरकर



मुद्राराक्षस



बाजीराव
मस्तानी



धाडिला राम
तिने कां वनी



बालरंगभूमी



मानापमान



गोरा कुंभार



प्रतिसंगम



शूरा मी वंदिले

# साहित्य संघ म्हणजे आनंद संघ !

-ललिता केंकरे



साहित्य संघ म्हणजे आनंद! साहित्य संघ म्हणजे प्रामुख्याने रंगभूमीचा, कलावंतांचा आधार! मला अभिमान वाटतो की मी साहित्य संघाची सदस्य आहे.

माझे वडील दिनकर विठ्ठल आमोणकर उर्फ तात्या आणि डॉ. अ. ना. भालेराव हे कौटुंबिक मित्र-जणू सख्खे भाऊच! डॉ. भालेराव हे व्यवसायाने डॉक्टर व माझे वडील आधी व्यवसायाने शिक्षक व नंतर हार्डकॅसल कंपनीत नोकरीला होते. ही त्यांची पहिली बाजू. त्यांची दुसरी बाजू म्हणजे नाटकांवर व कलावंतावर प्रेम करणे. डॉक्टर भालेरावांना माणसं जोडण्याची एक कला होती. रंगभूमीच्या संदर्भात त्यांनी नेमकी माणसं हेरुन रंगभूमीला जिवंत ठेवली. त्यांच्या ह्या स्वभावाने त्यांनी अनेक कुटुंब जोडली, त्यांत दोन कुटुंबांना त्यांनी घरात थारा दिला. त्यापैकी एक बापूराव नाईक सरकारी नोकर व शं.ना. अंधृटकर ह्यांचा प्रेस होता. ते नाटकातही उत्तम काम करत. मेहनती होते. तसेच डॉ. भालेरावांचे नाट्यकलेवर प्रेम करणारे अनेक डॉक्टर मित्र होते. त्यापैकी डॉ. फडके व त्यांच्या पत्नी मनुताई फडके-गोड व्यक्तिमत्व ! तसेच डॉ. पुरंदरे कुटुंब वगैरे अनेक डॉ. मित्र आमच्याही कुटुंबातले सदस्य झाले व आधार झाले.

आजही डॉ. अ.ना. भालरावांचा मुलगा डॉ. बाळ भालेराव आमचा आधारच आहेत. (थोडा भडकू आहे. पण मनाचा चांगला आहे.)

साहित्य संघाशी निगडीत आमचं कुटुंब म्हणजे तात्या, माझी मोठी बहीण सुधा व मी ललिता. माझा भाऊ सुधीर आमोणकर क्रिकेटर. माझ्या आईला कलेची आवड होती. म्हणून तिचाही पाठिंबा होता.

आम्ही दोघी साहित्य संघाच्या कलावंत. तसंच बाळच्या बहिणीही साहित्य संघाच्या कलावंत. म्हणजे अडल्या पडल्याला दासींची कामें करुन वेळ मारुन नेण्याऱ्या ! एक बेबी व दुसरी कुंदा !

साहित्य संघाच्या नाटकांतून आम्ही दोघी अडल्या - पडल्याला काम करायच्या ! ते हेरून नंतर अनेक संस्था माझ्याकडे कांही कारणाने प्रयोग अडला तर मला काम करायची विनंती करायचे.

त्यामुळे मी अनेक नाट्यसंस्थांची झाले. त्यांत दूर्वांची जुडी, ललित कलादर्श, चंद्रलेखा, गोवा हिंदू असोशिएशन इ. नाट्यसंस्था आल्या. हे सर्व शक्य झाले ते साहित्य संघामुळे! त्यावेळी नाट्यशिबिरे नव्हती. साहित्य संघाच्या नाट्योत्सवात ही नाटकं व्हायची. प्रामुख्याने संगीत नाटकं. त्या नाटकांतील स्त्री कलावंताच्या भूमिका बघूनच आम्ही अभिनय शिकलो. ती एक प्रकारे शिबिरेच होती.

त्यावेळी दुर्गाबाई खोटे, वनमालाबाई, जयमाला शिलेदार, मिनाक्षीबाई, सरस्वतीबाई वगैरे अनेक स्त्री कलावंत तसेच पुरुष कलावंत बालगंधर्व, मा. नरेश, मा. दत्ताराम, मामा पेंडसे ह्यांचाही अभिनय पहायला मिळाला.

डॉ. अ.ना. भालेराव ह्यांच्या कुटुंबात आणखी कुटुंबांची भर पडली. भार्गवराम पांगे, सुमनताई, शिवा चिखलीकर, चं. वि. बावडेकर वगैरे. साहित्य संघाचा नाट्योत्सव म्हणजे एक खूप गोड अनुभव होता. नाटक बघायला येणाऱ्या स्त्रियांचा तो सणच असे. चांगल्या भरजरी साड्या, मोगरीचे सुवासिक गजरे, खास ठेवणीतले दागिने घालून मिरवत यायच्या व नाटकांचा आनंद घ्यायच्या. हे झालं प्रेक्षकांचे! पण आतमध्ये रंगपटात लगबग चालायची ती डॉ. भालेरावांच्या पत्नीची. आम्ही त्यांना वहिनी म्हणायचो. त्यांनी आम्हांला बरंच कांही शिकवले. मुख्य म्हणजे संसार कसा करायचा, नवऱ्याच्या स्वभावाबरोबर कसं जुळवून घ्यायचं. ज्या गोष्टीत नवऱ्याला आनंद मिळतो त्या गोष्टीत त्यांना मदत करुन भार कसा हलका करायचा ते शिकवले.

नाट्योत्सवाच्या वेळी वहिनींचे सगळीकडे लक्ष असायचं. अगदी बॅक स्टेजवर्कर्सपासून ते कलावंतांपर्यंत! स्त्री कलावंताकडे त्यांचे जास्त लक्ष असायचं. त्यांनी सोडून ठेवलेल्या साड्यांची छान घडी घालणे तसेच दागिने पुसून व्यवस्थित ठेवणे हे सर्व त्या आनंदाने स्वत:ची जबाबदारी समजून करायच्या. वेगवेगळ्या स्वभावाच्या नटांना समजून घ्यायच्या. त्याचं रहातं घर नारायण सदन इथेच नाटकाच्या तालमी चालायच्या. साहित्य संघाची इमारत व्हायच्या आधी. त्यावेळी आम्ही लहान होतो. त्यामुळे रंगभूमी म्हणजे काय? नाटक म्हणजे काय? नाटक ह्या कलेचा अभ्यास करायला हवा हे कधी कळलंच नाही. आमची पोच तिथपर्यंत जातच नव्हती. तसंच लेखकाशी चर्चा करणं, नटांशी चर्चा करणं भूमिका समजून घेणं, दिग्दर्शकांशी चर्चा करणं हे कधी केलंच नाही कारण वरिष्ठांची इच्छा. तात्या, डॉक्टरांचा मान ठेवला जायचा. ह्या सर्वांची आदरयुक्त भीती वाटायची.

नाटक बघायचं, मनांतल्या मनात समोर चाललेल्या भूमिका दुर्गाबाई, वनमालाबाई कशा करतात ह्याचा अभ्यास करायचा व आनंद घ्यायचा. हा अभ्यास नंतर आम्हाला त्याच भूमिका करतांना उपयोगी पडला.

आमोणकर म्हणजे आम्ही मूळचे गोव्याचे. गोव्याच्या मातीतच कला आहे. म्हणून तात्यांनी मला वाटतं आम्हाला गाणं शिकवलं. श्यामलाबाई माजगांवकरांच्या क्लासमध्ये घातलं. नृत्याचे धडेही आम्ही घेतले. कथ्थकनृत्य आम्ही रोहिणी वागळेंकडे शिकलो. त्यावेळच्या सिनेमाच्या रेकॉर्ड वर डान्स करत होती. आम्ही गुरु पार्वतीकुमारांकडे भरतनाट्यम शिकलो. तसंच मणीपूरी वगैरेही शिकलो.

मोठी झाल्यावर ऑपेरा हाऊसच्या श्री. देवधरांच्या क्लासमध्ये श्री. पार्श्वनाथ आलमेकरांकडे 'भूमिका करतांना मराठी शब्दोच्चार बरोबर आले पाहिजेत, नाटक हे प्रेक्षकांपुढे करायचं असल्याने एका दमांत वाक्य कशी बोलायची' ते शिकवले. सामाजिक, ऐतिहासिक नाटकांमध्ये भूमिका करताना नटीने ती कशा प्रकारे करावी, हालचाली कशा असाव्यात ते शिकवलं. थोडक्यात नाटकांत कसा अभिनय करावा हे सर्व हया कलांनी शिकवलं. संगीत, नृत्य, अभिनय ह्याने कलावंत घडवला जातो हे समजले. डॉ. भालेरावांनी आम्ही शिकत असलेल्या कलांवर आक्षेप घेतला नाही. तात्यांना अडवलेही नाही.

माझे पती- दामू केंकरे हेही कलावंत होते. सर्व कलांची त्यांना जाण होती. म्हणून त्यांनी सर्व कला एका छत्राखाली हव्या असं गोव्यांचे त्यावेळचे मुख्यमंत्री दयानंद बांदोडकरांना सांगितले. बांदोडकरही कलेचे भोक्ते होते. त्यांनी ही कल्पना कृतीत आणायची ठरवले. पण एका अटीवर - ''ॲकॅडमीची जबाबदारी तुझी (दामूची) तू गोव्याला येऊन राहायचं!'' आम्ही



तीन वर्ष गोव्यातल्या ॲकॅडमीसाठी राहिलो व गोव्याची कला ॲकॅडमी स्थापन झाली. अभिमानाची गोष्ट आहे.

असा हा माझा कलेचा प्रवास झाला. त्या प्रवासात माझे कलावंत, दिग्दर्शक, नाटककार पति दामू केंकरे, माझा मुलगा विजय केंकरे व सून मंगला केंकरे ह्यांचा सहभाग लाभला. आणि शेवटी साहित्य संघाचे प्रमुख कार्यवाह डॉ. बाळ भालेरावांची ऋणी आहे कारण त्यांनी माझ्या पतिच्या, दामू केंकरेच्या निधनानंतर त्यांच्या ५ मे च्या वाढदिवसाला त्यांच्या नावाचा नाट्योत्सव करायला संघात सुरुवात केली. संगीत रंगभूमीला डॉ. अ. ना. भालेरावांनी संजीवनी दिली व त्यांच्या मुलाने, बाळने तरुण पिढीच्या कलावंतांना त्यांच्या एकांकिका सादर करण्यासाठी साहित्य संघाचे व्यासपीठ मिळवून दिले.

आणि माझ्या दृष्टीने सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे ५ मे २०१२च्या दामू केंकरे नाट्योत्सवाच्या प्रारंभी डॉ. बाळ भालेरावांनी भाषण केलं तेव्हां ते म्हणाले की मी आज दामू विषयी बोलणार नाही, तर पत्नीविषयी (म्हणजे माझ्या विषयी बोलणार) मी अवाक झाले. बापरे आता हा काय बोलणार ? पण तो जे कांही माझ्याविषयीं बोलला ते ऐकून मी खूप खूष झाले. तो म्हणाला, ''लल्यानें संसार चांगला केला.'' मला त्याच्या आईची वहिनींची आठवण आली. त्यांनीच आम्हाला चांगला संसार कसा करावा ते शिकवलं. परंतु बाळचा मोठेपणा म्हणजे अशावेळी दाद कशी घ्यावी हे बाळने बोलून दाखवलं. आणखी काय पाहिजे ? भरून पावले.

## साहित्य दिवाळी अंक २०१४ ला पाचवा पुरस्कार

कराड वैभव चॅरिटेबल फौंडेशन, पुणे तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय दिवाळी अंकांचे यंदाचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. साहित्य दिवाळी अंक २०१४ ला स्व. यशवंतरावजी चव्हाण राज्यस्तरीय द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. १३ सप्टेंबर २०१५ रोजी कराड येथे स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ पार पडला. साहित्य दिवाळी अंकाचा हा पाचवा पुरस्कार. या आधी साहित्य दिवाळी अंकाला विचार मंथन (कल्याण), अक्षरगंध (डोंबिवली), महाराष्ट्र साहित्य परिषद (जुळे कोल्हापूर शाखा) आणि मराठी वृत्तपत्र लेखक संध (शिंदेवाडी, मुंबई) या चार संस्थांचे उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार मिळाले आहेत.

# साहित्य संघ आणि मधु मंगेश कर्णिक

संवादक : **प्रतिभा सराफ**



सुप्रसिद्ध साहित्यिक मधु मंगेश कर्णिक हे चतुरस्त्र प्रतिभावान साहित्यिक आहेत. त्यांची आत्तापर्यंत पंचाहत्तर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. कथा-कादंबरी-ललित-गद्य-नाट्य-काव्य वगैरे वाङ्मयप्रकार त्यांनी लीलया हाताळले आहेत. त्यासाठी त्यांना शासनाच्या पुरस्कारासहित अनेक महत्वाचे पुरस्कार लाभले आहेत. शासनाकडून मराठी भाषेला, 'अभिजात भाषे'चा दर्जा मिळावा यासाठी, 'राज्य मराठी विकास मंडळ' आणि 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ', यावरील अध्यक्षपदावरून त्यांनी अथक प्रयत्न केले आहेत. त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम त्यांच्याच शब्दांत.....

''ज्ञानेश्वरांच्या ओव्या आणि तुकारामांची गाथा यांचं आळं करून त्यामध्ये मराठीचा वृक्ष लावलेला आहे. म्हणून मराठीचं भवितव्य हे उज्ज्वलच आहे!''

मधु मंगेश कर्णिक यांची ग्रंथसंपदा आणि व्यक्तिमत्व काही पानांमध्ये मांडणे मला अशक्य आहे म्हणून या मुलाखतीद्वारे ते फक्त त्यांच्या मुंबई मराठी साहित्य संघाविषयीच्या भावना, आठवणी आणि ऋण व्यक्त करीत आहेत-

१९५६ साली मुंबईत आल्यावर चंद्रकांत विष्णु बावडेकर यांच्याकडे 'आलमगीर' या साप्ताहिकातील लेखमालेच्या संदर्भात गिरगावला जाणे व्हायचे. त्याच रस्त्यावर पुढे 'साहित्य संघ मंदिर' होते. त्यावेळेस संघाच्या इमारतीचे बांधकाम चालू होते. या बांधकामात जातीने लक्ष घालणारी काही मंडळी होती, जी आपापल्या क्षेत्रातली दिग्गज होती. परंतु येथे मात्र निव्वळ कार्यकर्ते म्हणून काम पहात होते. चं.वि.बावडेकर मला प्रथम येथे घेऊन आले तेव्हा या मंडळींशी ओळख झाली. वा.रा.ढवळे, तात्या आमोणकर, बापूराव नाईक, अंधृटकर, पांगे वगैरे वगैरे. त्याकाळात डॉ.बाळ भालेराव हेही असायचे, ते साधारण माझ्या वयाचे होते. तेही या बांधकामात जातीने लक्ष पुरवायचे! १९६० साली इमारत बांधून झाली. परंतु रंगमंच खुलाच होता. तो नंतर पूरा झाला.

दरम्यान 'आलमगीर' साप्ताहिकात मालवणी भाषेत मी जे लेख लिहित होतो त्याचे १९५८ साली 'कोकणी गऽ वस्ती ' या नावाचे पुस्तक आले. या पुस्तकाला पहिली प्रस्तावना लाभली ती दस्तुरखुद्द पु. ल. देशपांडे यांची! पुलंची पहिली सविस्तर भेट साहित्य संघाच्या प्रांगणातच झाली. त्याआधी 'आकाशवाणी' केंद्रात (मरीन लाईन) येथे मी त्यांना भेटायला गेलो

होतो. 'आलमगीर' मधील लेखन आवडले म्हणून त्यांनी बावडेकरांमार्फत मला बोलावून घेतले होते.

१५ सप्टेंबर १९६३ या दिवशी माझा 'तोरण' नावाचा कथासंग्रह, 'जयहिंद प्रकाशना'चे प्रकाशक ग.का.रायकर यांनी काढला. अत्यंत प्रतिष्ठित अशा दीपलक्ष्मी या दिवाळी अंकांचे संपादन ते त्या काळी करत असत. 'स्वस्त पुस्तक योजना' सर्वप्रथम रायकरांनी राबवली. त्या काळात या योजनेअंतर्गत माझ्या चारशे पानांच्या पुस्तकाची किंमत केवळ दहा रुपये ठेवण्यात आली. या कार्यक्रमात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, अनंत काणेकर, मं.वि.राजाध्यक्ष, शांताबाई शेळके, गो.नी.दांडेकर, अ.ना.पेडणेकर आदी दहा वक्ते या पुस्तकावर बोलले. या कार्यक्रमात चारशे पुस्तके विकली गेली. कार्यक्रमाच्या दिवशी सवलतीच्या दरात म्हणून दहा रुपयांचे पुस्तक सहा रुपयात विकण्यात आले. लेखकाच्या सहीसहित, अगदी रांगा लावून वाचकांनी पुस्तके विकत घेतली. हे सर्व आठवायचे कारण म्हणजे माझ्या आयुष्यातील भव्य वाङ्मयीन सोहळा संपन्न झाला तो या मुंबई मराठी साहित्य संघात! साहित्य संघाचा खुला रंगमंच, (अर्धवट बांधलेले सभागृह) साहित्य संघाने एक साहित्यिक उपक्रम म्हणून अगदी मोफत दिला होता, याची ठळक आठवण आजही होते.

१९५७-५८ साली क्रांतीकारांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे शताब्दी वर्ष चालू होते. त्यावेळेस इतिहासकार न.र.फाटक हे साहित्य संघाचे विश्वस्त, अध्यक्ष होते. ते या स्वातंत्र्ययुद्धाला 'पेंढाऱ्यांचे बंड', 'टोळीयुद्ध' असं म्हणायचे. या बंडाबाबत त्यांची काही परखड मते होती. साहित्य संघातील व्याख्यानमालेअंतर्गत न.र.फाटकांची या बंडासंबंधी तीन व्याख्याने आयोजित केली होती. तेव्हा ही व्याख्याने होऊ नये ह्यासाठी विरोधकांचे थवे येथे यायचे. या थव्यांपासून रक्षण करून सुरक्षितपणे न.र.फाटक यांना खुल्या रंगमंचाच्या व्यासपीठावर पोहचविण्याची जबाबदारी साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांनी घेतली होती. त्यात वा.रा.ढवळे, तात्या आमोणकर, बापूराव नाईक, चंद्रकांत विष्णु बावडेकर आणि माझ्यासारखी काही तरुण मंडळी होती. जवळजवळ माणसांचे 'कडे' करायचो. मी साहित्य संघाचा स्वयंसेवक होतो याचा अभिमान आहे. 'मी खरं तेच बोलणार, विरोधकांनी मला मारलं तरी चालेल!' हा फाटकांचा बाणा वाखाणण्याजोगा होता .ती व्याख्यानमाला त्या काळात खूपच गाजली.

यानंतर साहित्य संघातील येणं-जाणं वाढलं. 'तुज आहे तुजपाशी', 'अंमलदार' यासारखी पुलंची अभिजात नाटके, 'मादी', 'गंधर्व', 'श्रीमंत', 'माणूस नावाचं बेट' इत्यादी एकांकिकांमधून विजया मेहता, पु.ल.देशपांडे, सुनिताबाई देशपांडे वगैरे कित्येक दिग्गज नाट्यकलावंतांना जवळून पाहण्याचा योग आला तो याच साहित्य संघाच्या खुल्या रंगमंचावर! त्यावेळेस बिर्ला मातोश्री, शिवाजी मंदिर यासारखी दोन-चार नाट्यगृहे सोडली तर मुंबईत नाट्यगृहे नव्हती. १९६०-६२ साली जेव्हा साहित्य संघात नाटक लागायचे तेव्हा तोबा गर्दी व्हायची. इतकी की तिकिटे मिळणेही मुश्किल होऊन जायचे. त्या काळात ट्रेनला फारशी गर्दी नसायची, त्यामुळे मोठ्या प्रमाणात मराठी रसिक संघाकडे यायचा. गिरगावात बहुतांशी मराठी वस्ती होती. त्या काळात आकाशवाणी, नाटक-सिनेमा सोडले तर करमणुकीची इतर काही साधने उपलब्ध नव्हती. त्यामुळेही नाटकांना गर्दी व्हायची. पण सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे साहित्य संघात कोणतेही नाटक हमखास रंगायचे! संघाच्या रंगमंचाला जणू रंगदेवता वश होती. आजही आहे.

१९६७ साली मी लिहिलेल्या 'देवकी' या कादंबरीवर आधारित नाटक, मो.ग.रांगणेकर (कुलवधू फेम) यांनी दिग्दर्शित करून या रंगमंचावर आणले, त्याचा पहिला प्रयोग झाला तो याच साहित्य संघाच्या रंगमंचावर, त्याला गोव्याचे मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर खास उपस्थित होते. ह्या रंगमंचावर हुबेहुब कोकण वसवला तो रघुवीर तळाशीलकर या नेपथ्यकाराने. या नेपथ्यासाठी

रंगमंचावर अनेक बदल करावे लागले त्याला पूर्ण संमती साहित्य संघाने देऊन आपली रसिकता सिद्ध केली. याच काळात 'अश्रूंची झाली फुले' या नाटकाची चलती होती. या नाटकात श्रीकांत मोघे, दया डोंगरे वगैरे होते. तरीही 'देवकी' हेही नाटक तुफान चालले. कारण मच्छिंद्र कांबळीनंतर पहिल्यांदाच कोणीतरी मालवणी भाषेत नाट्यलेखन केले होते. 'देवकी' नाटकाचे हिरोसुद्धा श्रीकांत मोघेच होते. त्यांच्या सोबतीला इंदुमती पैंगणकर या काम करायच्या. यातील एका घरगड्याचे पात्र मधु कदम या राष्ट्रीय सेवा दलात कार्यकर्ता असलेल्या कलाकाराने अफलातूनपणे रंगवले होते. तेव्हा नाटकाच्या पहिल्या रांगेचे तिकिट दहा रुपये तर दुसऱ्या रांगेचे तिकिट सात रुपये होते. या नाटकासाठी मी पु.ल.देशपांडे याच्या घरी सन्माननीय पत्रिका पाठवली होती परंतु ती नम्रपणे परत करुन पु.ल. आणि सुनीताबाई दहा रुपयाचे तिकिट काढून पहिल्या रांगेत येऊन बसले. त्यांनी मधुकाका (पु.लं.च्या वाऱ्यावरची वरात नाटकातील रामागडी) यांना त्यांच्या नाट्य अभिनयाने प्रभावित होऊन नटराजाची मूर्ती भेट दिली. त्यांनी ती आजतागायत जपून ठेवली आहे. एक सच्चा कलाकारच दुसऱ्या कलाकाराला अशी मन:पूर्वक दाद देऊ शकतो!

त्या काळात 'सोबत' या पुण्याच्या साप्ताहिकात ग.वा.बेहरे हे नाट्यसमीक्षा लिहायचे. अत्यंत परखड समीक्षण करायचे. पंचम ह्या टोपण नावाने लिहायचे. त्यांनी सोबतमध्ये 'देवकी' ह्या नाटकाला 'उत्तम नाटक', अशी मन:पूर्वक दाद दिली. मात्र साहित्य संघाचा कृपाशीर्वाद लाभूनही मी त्यानंतर नाटक लिहिले नाही. कथाकादंबऱ्यामध्येच अधिक रमलो.

याच काळातील अजून एक आठवण म्हणजे 'तोरण' ह्या कथासंग्रहाला शासकीय पुरस्कार प्राप्त झाला, त्यावेळेस जी.ए.कुलकर्णी यांच्या 'रक्तचंदन' या कथासंग्रहालाही शासकीय पुरस्कार मिळाला होता. त्याचा बक्षीस समारंभ, माझ्या आठवणीप्रमाणे प्रथम साहित्य संघात ठरला होता. परंतु जागा अधिक मोठी हवी होती म्हणून तो जे.जे.स्कूलच्या खुल्या प्रांगणात झाला. मी जीएंना तेव्हा प्रथम पाहिले.

एकंदरीत काय तर साहित्य संघ ही संघटना मला सर्वार्थाने पावली! रंगदेवता प्रसन्न असली की नाटक रंगते त्याचप्रमाणे ह्या पवित्र वास्तूत माझ्या वाङ्मयीन यशाची वाटचाल सुरू झाली. खऱ्या अर्थाने साहित्य संघाचाही तो वैभवाचा काळ होता. तेव्हा मी एस.टी. महामंडळात नोकरी करायचो. ताडदेववरून निघून थेट साहित्य संघ गाठायचो. साहित्य संघातील नाटकाचे तिकिट दहा रुपये होते, ती रक्कम त्या काळात फार मोठी वाटायची. परंतु नाटकाची आवड आणि तात्या आमोणकरांची ओळख ह्याचा फायदा घेत ते दहा रुपये वाचवून चक्क विंगेतून नाटक पाहायचो. पण हे सांगतांना हेही सांगायचा मोह होतोय की तसंही सभागृह बहुधा हाऊसफुल्लच असायचे!

विजय मेहता यांचे 'अजब न्याय वर्तुळाचा' हे ब्रेख्तचे सुप्रसिद्ध नाटक जे पार जर्मनीपर्यंत पोहचले, त्याच्या तालमी साहित्य संघात व्हायच्या. त्याचा अनुवाद प्रतिभावान खानोलकर यांनी केला होता. त्या नाटकाच्या तालमी पाहण्याचा योग या साहित्य संघात लाभला. तासन्तास तल्लीन होऊन येथे बैठक मारून बसायचो. खानोलकर हा माझा त्या काळात फार जवळचा मित्र होता. साहित्य संघाचेही त्याच्यावर नाटककार म्हणून प्रेम होते.

या साहित्य संघाच्या वास्तूत दिग्गज साहित्यिक, नाटककार आणि लोकप्रिय व्याख्याते सर्वश्री न.र.फाटक, पु.ल.देशपांडे, अप्पा पेंडसे, लालजी पेंडसे, सेतू माधवराव पगडी आदींची व्याख्याने अगदी व्यासपीठाजवळ बसून आणि मन लावून ऐकली. त्यांच्या व्याख्यानांसाठी होणारी गर्दी अनुभवली.

नाटक, व्याख्याने नसतानाही साहित्य संघ प्रतिभावंतांनी गजबजलेले असायचे. साहित्य संघात सारस्वतांचा अड्डा जमायचा. जयवंत दळवी, ललित ग्रुपचे कोठावळे, शांताबाई शेळके, अप्पा पेंडसे

यांसारखे अनेकजण असायचे. या लिहिणाऱ्या मंडळीसोबत काही न लिहिणारेही होते. सरकारी मुद्रणालयात मुख्य अधिकारी पदावर काम करणारे साहित्य-नाट्यप्रेमी बापूराव नाईक, यशवंतराव पंडित. त्या काळात गाण्याच्या मैफिलीही व्हायच्या. जोत्स्ना भोळे यांची मैफिल मला आठवते. एकंदरीत काय तर बौद्धिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कलात्मक वातावरणाचे या साहित्य संघात वास्तव्य असायचे. याच वाङ्मयीन वातावरणात माझी जडण घडण होत होती.




१९४० साली ना.सी.फडके अ.भा.म.सा. संमेलनाचे अध्यक्ष झाले त्या रत्नागिरीत तब्बल पन्नास वर्षानंतर साहित्य संमेलन घेण्याचा मानस अ.भा.म.साहित्य महामंडळाचा होता. मग रत्नागिरीतील अ.भा.म.सा.संमेलनाचा अध्यक्ष कोण असावा ? हा प्रश्न निर्माण झाला. श्री.ना.पेंडसे, मंगेश पाडगावकर, जयवंत दळवी हे सगळे मूळचे कोकणचे ! या पार्श्वभूमीवर या सगळ्यांनी मोठ्या मनाने मला अध्यक्षपदाच्या निवडणुकील उभे राहण्यासाठी पाठिंबा दिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे यांचाही पाठिंबा होता. त्यावेळेस डॉ.बाळ भालेराव, अरुण आठल्ये, गंगाधर गाडगीळ हे मुंबई मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यकारणीवर होते. एकंदरीत त्यांनी आणि मान्यवर सदस्यांनी दिलेल्या नैतिक आणि प्रत्यक्ष पाठिंब्याच्या बळावर मी निवडून आलो याची मला कृतज्ञ जाणीव आहे.

१९९१ साली नवोदितांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने 'कोकण मराठी साहित्य परिषदे'ची स्थापना केली. मुं.म.सा.संघाने या कार्यासाठीही पाठिंबा दिला. को.म.सा.प. आणि साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अनेक दर्जेदार साहित्यिक उपक्रम राबवले. १९९२ साली 'केशवसुतांच्या कविता' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात पु.ल.देशपांडे, शंकर वैद्य, सरोजिनी वैद्य, विजया राजाध्यक्ष, अरुण आठल्ये, राजा राजवाडे वगैरे साहित्यिकांचा सहभाग होता. यानंतर 'मधु मंगेश कर्णिक यांचे साहित्य' हेही चर्चासत्र झाले. जयवंत दळवी यांचा, त्यांच्या निधनापूर्वी केवळ दोन आठवडे आधी भव्य सत्कार आयोजित केला गेला, यात जयंतराव साळगावकर, श्री.पु.भागवत वगैरे अनेक नामवंत तसेच मौज, मॅजेस्टिक वगैरे अनेक प्रकाशन संस्थाही सहभागी झाल्या होत्या. हा सत्कार साहित्य संघात करण्यात येणार होता परंतु आजारी असलेल्या दळवींच्या सोयीसाठी तो बोरीवलीला घेण्यात आला. जेव्हा जेव्हा मला कोणत्याही साहित्यिक कार्यासाठी जागेची आवश्यकता भासली तेव्हा तेव्हा मी हक्काने साहित्य संघालाच हाक दिली आणि त्यांनीही तितक्याच तप्तरतेने माझ्या हाकेला 'ओ' दिली !

पस्तीस वर्ष कार्यरत असलेल्या मुंबई मराठी साहित्य संघात प्रथमच विश्वस्त पदासाठी निवडणूक झाली. डॉ.बाळ भालेरावांच्या आग्रहाखातर मी निवडणुकीला

होकार दिला व नव्या पिढीतील मी त्यात सर्वाधिक मतांनी निवडून आलो, हे सर्वस्वी साहित्य संघाचे माझ्यावरील ऋण आहे.

त्यानंतर मी डॉ.बाळ भालेराव, सुहासिनी कीर्तीकर, सुभाष भागवत, बापूराव नाईक वगैरे मंडळींशी जोडला गेलो ते आजतागत! आता प्रा.उषा तांबे कार्याध्यक्ष तर मी अध्यक्ष आहे. अनेक नामवंत संस्थांमध्ये मी पदाधिकारी होतो. परंतु साहित्य संघाच्या अध्यक्षपदाचा मला मोठा अभिमान वाटतो. वयाच्या ऐंशीव्या वर्षी सार्वजनिक कार्य सोडून निव्वळ लिखाणात, वाचनात मन गुंतवायचे या उद्देशाने साहित्य संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास मंडळ वगैरे अनेक संस्थांमधल्या महत्वाच्या पदांचा राजीनामा दिला. 'करूळ' या जन्मगावी वास्तव्य करण्याचा निर्धार केला. पण साहित्य संघाच्या माझ्यावरील ऋणामुळे, जेव्हा साहित्य संघाने सन्मानाने अध्यक्षपद देऊ केले तेव्हा मला ते नाकारता आले नाही.

एक गमतीशीर आठवण आहे. अ.भा.सा. संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या आधी एका बैठकीत साळगावकर म्हणाले, ''तुझी कुंडली मांडून बघतंय! तू निवडान येतल की नाय तां'' जयवंत दळवी तेथे होते ते मिश्किल स्वभावाचे होते. त्यांना कुंडली वगैरे गोष्टी थोतांड वाटयच्या. ते या गोष्टीवरून नेहमी फिरकी घ्यायचे. त्यांनीही साळगावकरांना माझ्या यशाबद्दलची 'प्रश्नकुंडली' मांडायला सांगितली तेव्हा साळगावकरांनी, 'मी शंभर टक्के निवडून येणार' असा कौल दिला होता. साहित्य संघाशी जोडल्या गेल्यावर आजतागत एकंदरीत वाटचालीवर दृष्टीक्षेप टाकता अनेक गोष्टी स्मरताहेत! 'हाऊसफुल्ल'ची सदैव पाटी लावलेल्या साहित्य संघामध्ये १९८०-८५ नंतर हळूहळू गर्दी कमी होताना दिसू लागली. मराठी टक्का एकूणच मुंबईमध्ये कमी होऊ लागला होता. गिरगाव भागातील संघाचा हक्काचा रसिकवर्ग मुंबई बाहेर जाऊ लागला. तरीही संघाला पुन्हा ते वैभवाचे दिवस मिळवून देण्याचा प्रयत्न या अध्यक्षपदाच्या भूमिकेतून मला करता येईल, असे वाटते.

साहित्य संघातर्फे महाविद्यालयीन, महानगरीय वगैरे संमेलने घेतली जातात. मुंबईच्या मुख्य प्रवाहातून दूर गेलेल्या मराठी माणसांच्या-प्रेक्षक-श्रोत्यांच्या जवळ आपणच गेले पाहिजे या भूमिकेतून पनवेल, बदलापूर, वसई, विरार वगैरे मुंबईच्या परिघावर (जेथे मराठी माणूस पोहचलाय) तेथे जाऊन कार्यक्रम करायचे, हा एक पर्याय आहे व तो आम्ही स्वीकारला आहे.

या वास्तूत अभिजात नाटके यायला हवीत पण ती ज्या कारणांमुळे येऊ शकत नाहीत ती कारणं दूर करणे आवश्यक आहे. जसे की पार्किंग, अप्रोच रोडचे रुंदीकरण वगैरे. या वास्तूत तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी पुण्याला पुरूषोत्तम करंडक स्पर्धा होते त्या धर्तीवर नाट्यस्पर्धा, एकांकिका स्पर्धा घडवून आणायला हव्यात. ज्याप्रमाणे झेवियर्स कॉलेज 'मल्हार' हा उत्सव साजरा करतो त्याप्रमाणे काही तत्सम उपक्रम तरुणांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, अविष्कारासाठी राबवले गेले पाहिजेत. संघामध्ये चित्रप्रदर्शन व इतर कला प्रदर्शनासाठीही जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. गाण्यांच्या मैफिली आयोजित केल्या पाहिजे. कॉलेजच्या कार्यक्रमांना खूप सवलती देऊन तरुणांना यथेच्छ बागडायची संधी दिली पाहिजे. साहित्य संघाच्या विविध उपक्रमांद्वारे नवीन पिढीशी जोडले जाणे आजच्या काळात फार महत्वाचे आहे. यासाठी सर्व माध्यमातून प्रसिद्धी आणि जाहिराती देणे आवश्यक आहे. हे सर्व काम कठीण असले तरी अशक्य नाही. हे उपक्रम राबवण्यासाठी साहित्य संघही तत्पर आहे. मी आशावादी आहे. सकारात्मक दृष्टीने वाटचाल करत आहे.

साहित्य संघाच्या आठवणी म्हणजे सोनेरी क्षणांची उजळणी! ह्या मुलाखतीद्वारे मला उजळणीची संधी दिली म्हणून मी मुंबई साहित्य संघाचे आभार मानतो!

# साहित्य संघ: एक ऋणानुबंध

-आशा मुळगावकर



मला वाटतं ८० सालच्या दशकानंतर माझ्या आयुष्याची सकाळ संपत आली होती. दुपारची निवांत वेळ आयुष्यात आली. मुलांचं शालेय शिक्षण संपलं होतं. त्यांचे मार्गही निश्चित होत होते. अशा स्वस्थ निवांत वेळेला माझ्या एका मैत्रिणीनी पद्माताई घारपूरेनी माझ्या आयुष्यात वसंत फुलवला.

अतिशय आग्रहानी व जिव्हाळयानी त्यांनी व मनोहर घारपुरेंनी मला व डॉ. मुळगावकरांना लायन्स क्लब ऑफ प्रार्थना समाजचं मेंबर बनवलं व लगेचच साहित्य संघाचंही सभासद करुन घेतलं. साहित्य संघात तेव्हा वसुंधरा पेंडसे नाईक हया सेक्रेटरी होत्या व नंतर पद्माताई साहित्य शाखेच्या सेक्रेटरी झाल्या.

साहित्य संघाच्या चर्चासत्रात किंवा व्याख्यांनात रमण्याऐवजी नंतर नंतर मी नाटकांवरील व्याख्यान, नाटकांच्या तालमी बघायला जाऊ लागले. त्यामुळे साहित्य शाखेऐवजी मी नाटयशाखेतच रमले. रजनी जोशी, अरविन्द पिळगावकर, सुधाकर भानुषे, जयंत सावरकर आणि त्या बरोबरच डॉ. दाजी भाटवडेकर सुद्धा माझ्या मित्र मैत्रिणींपैकी झाले. काही वर्ष रजनी जोशी व नंतर सुधाकर भानुषे नाटयशाखेचे सेक्रेटरी झाले. त्यांनी त्यांच्या नाटयशाखेच्या सभासदांत माझं नांवही घातलं व मी त्यांच्या मिटींगसना नियमतपणे जाऊ लागले. कुठे ना कुठे ही मंडळी मला गुंतवून ठेवत. कधी मी त्यांच्याबरोबर कार्यक्रमांना जाई तर कधी त्यांची नाटकाची प्रॅक्टिस बघत बसे. कधी त्यांच्याबरोबर नाटकांच्या दौऱ्यावरही जाई. तेव्हा रजनी जोशी व माझ्यात एक रेशमी धागा होता तो संगीताचा ! तेव्हा मी देवसरांची कार्यशाळाही चालवत होते.

ती कार्यशाळा नंतर संघातच होत असे. ‘स्वरकमल’ हया आमच्या संगीताच्या कार्यशाळेला डॉ. भालेरांवानी समर्थ पाठिंबा दिला. कुठेही जाहिरात न करताही ही कार्यशाळा तुडुंब भरत असे. सरांचं शिकवणं, ते गाणं, बोलणं, चाली लावणं, गाणं न गाता ते सांगितल्यासारखं बोलत गाणं, हे सर्व अनुभवतांना दिवस कमी पडे. भावगीत गायन व नाटक यांचा खूप जवळचा संबंध आहे, हे सरांचं म्हणणं मला अक्षरश: पटायचं! विशेष म्हणजे हया बाबतीत देवसर व दाजी भाटवडेकर हयांचं एक मत होतं. भावगीत गाताना जर त्या गीतातले नायक मानसिकरित्या तुम्ही झालांत व ते गाणं सादर केलं तर ते श्रोत्यांना समजतं व भावतं, हा हया देवसरांच्या कार्यशाळेचा अनुभव आहे.

मी साहित्य संघात गेले तेव्हा माझ्या दृष्टीनी साहित्य संघाचा सुवर्णकाळच होता. अनेक लोकांचं तेव्हा संघांत येणं जाणं होतं. सरोजिनीबाई वैद्य ,कधी विजया राजाध्यक्ष, कधी वसुंधरा बाई पेंडसे. कधी शंकर वैद्य असे अनेक कवी व लेखक तर होतेच पण संघाच्या ऑफिस मध्ये शि.मो.घैसास, यशवंत पंडित, बाबा कलगुटकर यांचा राबता असायचा. नाट्य शाखेत अरविंद पिळगावकर, रजनी जोशी, सुधाकर भानुषे यांच्याबरोबर अनेक तरुण मुलं-मुली संगीत शिकायला व दाजी भाटवडेकरांची नाट्यशास्त्राची व्याख्यानं ऐकायला येत. त्यांचं शिकवणं व व्याख्यानं श्रवणीय तर असतंच, पण ती पहाणं हासुद्धा एक अनुभव होता. कुठलंही विधान ते नुसतं करत नसत तर त्यानुसार ते अभिनयही करुन दाखवत. त्यामुळे त्यांनी शिकवलेलं कधी विसरलं जात नसे. दाजींची भाषणं सगळ्यांनी अनेकदा ऐकलेली होती पण मी मात्र नवखी होते. नाटयशास्त्र म्हणजे काय? त्याची सुरुवात कशी झाली? त्याची परंपरा, गद्य व पद्य नाटकातला ठळक

फरक हे सर्व मला ऐकावंसं वाटे.

अशीच एकदा एका नाटकाच्या इंटरव्हलमध्ये मी ऑफीसरुम मध्ये आले होते. नाटक रंगात आलं होतं. दाजींच्या व डॉ. आडारकरांच्या गप्पाही रंगल्या होत्या. मी चहा घेऊन ऑडिटोरिअममध्ये बसायला निघत होते. डॉ. अडारकर म्हणाले ''बस इथेच, ही लोकं आणि त्यांचं हे बोलणं परत ऐकायला मिळेलच असं नाही, नाटक पुढच्यावेळी बघशील''. किती खरं होतं हे ! अशी माणसं भेटणं, त्यांचे विचार ऐकायला मिळणं हा योग, तो सुवर्णक्षण गमवायचा नसतो. कारण मैफल जमून येते ती मुद्दाम जमेलच असं नाही.

ही सगळीच मोठी, कलाकार माणसं फक्त साहित्य संघातच भेटली. घरची झाली. तसे श्रीरंग आडारकर.. सारस्वत बँकेचे त्यावेळचे सर्वे सर्वा होऊन बसलेले.. माणूस जपणं, कामं करवून घेणं आणि माणसाचा आत्मविश्वास जागवणं हे गुण प्रकर्षानी मला त्यांच्यात जाणवले. त्यांच्याच कारकिर्दीत साहित्य संघाची साठ वर्ष पूर्ण झाली. डॉ. आडारकर त्या महोत्सवाचे अध्यक्ष होते. सबंध वर्ष साहित्य शाखेचे व नाट्यशाखेचे अनेक प्रोग्रॅम झाले. नाटकं झाली. उत्तुंगबरोबर साहित्य संघानी आठवड्याभराचा पार्ल्यात मोठ्या उत्सव केला, त्याला अनेक कलावंत बोलवले गेले त्यांची भाषणं झाली.

ह्या महोत्सववर्षात खूप मोठा 'निधी संकलनाचा' व्याप होता. डॉ. आडारकरांच्या मार्गदर्शनाखाली मोठा 'निधी' जमा झाला. सढळपणे खर्चही झाला. वर्ष सुवर्णाक्षरांत लिहावं असं गेलं.

डॉ. आडारकरांचा संघाला फार मोठा आधार होता. त्यांची उणीव पदोपदी जाणवते. साहित्य संघात त्यांनी स्वत:चा मोठेपणा कधीच जाणवू दिला नाही. वेळोवेळी त्यांच्याबरोबर झालेल्या मिटींग्ससाठीच्या सहली असोत किंवा नाटकाच्या दौरा असो, ते सर्वांबरोबर जेवणार - खाणार, बरोबरीनीच वागणार. डॉ. आडारकर हे वडिलधारे असल्यासारखेच. मुलींप्रमाणे माझ्यावर माया करत. आमच्या घरातल्या सर्वांनाच त्यांचा खूप आधार वाटे. आता 'दत्तजयंती' आली की त्यांची आठवण येते. ते बहुधा दत्तजयंती चुकवत नसत. अरविन्द पिळगावकरांना बरोबर घेऊनच ते बहुधा येत. संघात यायच्या आधीपासून ते माझ्या ओळखीचे होते. पण साहित्य संघानी ओळख जास्त घट्ट झाली हे खरं....

साहित्य संघाबद्दल लिहावं तेवढ्या अधिकच आठवणी उफाळून येतात. पण कुठेतरी थांबलं पाहिजे नां ? साहित्यसंघात मी एक मात्र प्रथमपासून पहाते. मी पहाते तेव्हांपासूनचा संघाचा 'आकर्षण बिंदू' डॉ. बाळ भालेराव आहेत. कितीही भांडणं होवोत ती फक्त चहाच्या कपातलीच वादळं असतात. ती तिथेच मिटतात. त्या सर्वांच्या मनात किंवा डॉ. बाळ भालेरावांच्या मनात कधीही अढी रहात नाही. कारण 'साहित्य संघ' हा डॉक्टरांच्या मनातला एक हळवा कोपरा आहे. डॉक्टरंना लहानपणापासून हा साहित्य संघ पहात आलाय आणि डॉक्टरही ह्या संघाच्या ऋणानुबंधाच्या प्रेमात आहेत.

डॉ. आडारकरांनंतर बिल्डिंग दुरुस्तीसाठी खूपच ओढाताण व्हायला लागली. आम्ही निधी संकलनासाठी सरकारकडे याचना केली पण काहीही जमत नव्हतं. अशावेळी ना. जयंतराव पाटील महाराष्ट्राचे अर्थमंत्री होते, ते माझ्या माहेरच्या ओळखीचे. ना.जयंतरावांना आम्ही आमंत्रण दिलं. संघात येऊन मोठया डोनेशनची आमची मागणी मान्य केली. आम्ही पाठपुरावा केला, सर्वांनीच खूप मदत केली आणि तीन चार वर्षांच्या अविरत पाठपुराव्यानंतर एक कोटीची देणगी जयंतरावांनी स्वत: साहित्य संघात येऊन आम्हाला दिली. मी कोषाध्यक्ष असताना माझ्या माहेरच्या ओळखीतून व माहेरच्या माणसांकडून ही देणगी मिळावी हा ऋणानुबंधच नाही कां ?

# हाडाचा कार्यकर्ता- शि. मो. घैसास

**- सावित्री हेगडे**



आज ८० वर्षांपूर्वी आपल्या या मराठी साहित्य-नाटयक्षेत्रात अनेक थोर लेखक, साहित्यिक, विचारवंत, कलावंत, पत्रकार मंडळी होती. पण तरीही या साहित्य- नाटय क्षेत्राला- अर्थात, तेथील विविध उपक्रमांना ग्लानीच आली होती. तेथे एक प्रकारचे औदासिन्यच आले होते. आणि त्याच सुमारास, श्रीकृष्णाने म्हटलेल्या ग्लानिर्भवति भारत..... तदत्मानं सृजाम्यहम्.. धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे .. या तंतोतत उक्तीप्रमाणे, एक वैद्यक - शास्त्राची पदवीधर असूनही मूलतः साहित्यिक पिंड असलेली एक, विभूति - डॉ. अ.ना. भालेराव यांना आपल्या या मराठी साहित्य-नाट्य विषयक चळवळीसाठी, विविध उपक्रमांसाठी एक संघटना स्थापना करावी, असे अगदी उत्स्फूर्तपणे व तळमळीने वाटू लागले. डॉ. भालेरावांच्या या उदात्त विचारांनी त्या काळांतील श्री. तात्या आमोणकर, चं. वि. बावडेकर, वा. रा. ढवळे, अ. बा. गजेंद्रगडकर, श्री. शं. नवरे, लालजी पेंडसे, वा. ल. कुळकर्णी, आप्पा पेंडसे, मा. कृ. शिंदे, न. र. फाटक अशी विविध क्षेत्रातील थोर मंडळी प्रभावित झाली व पाण्याने पाण्याकडे धाव घ्यावी, तितक्याच निर्मळपणे, निरलसपणे, निरपेक्षपणे ही मंडळी डॉ. भालेरावांना येऊन मिळाली आणि डॉ.भालेरावांनी आपल्या या सहकार्यकर्त्यांच्या सहकार्यांनी दि. २१ जुलै १९३५ रोजी गिरगांव येथील आपल्या रहात्या घरी 'मु. म. साहित्य संघाची' स्थापना केली. या थोर कार्यकर्त्यांच्या अतुलनीय उत्साहाने आयोजित केलेल्या साहित्य संमेलन, नाटय संमेलन, नाट्य महोत्सव, व्याख्यानमाला, परिसंवाद इत्यादी उपक्रमांनी अल्पावधीतच साहित्य संघ ही मुंबईतील एक अग्रक्रम संस्था झाली, गिरगांवकरांचे आवडते अंगण झाले. साहित्य संघ मुंबईचा एक सांस्कृतिक केंद्रबिंदुच ठरला.

वर्षामागून काही वर्षे गेली. निसर्ग नियमानुसार साहित्य संघावर काळाचे आघात होऊ लागले आणि संघाच्या संस्थापकापासून त्यांच्याबरोबर काम करणारे एकामागून एक असे काही कार्यकर्ते काळाच्या पडद्याआड गेले. पण त्या कार्यकर्त्यांच्या निष्ठावंत संस्कारांनी प्रेरित झालेले व संघावर निरतिशय प्रेम करणारे भार्गवराम पांगे, शं. ना. अंधृटकर, बाबा कलगुटकर इत्यादी थोर कार्यकर्त्यांबरोबर कांही नव्या कार्यकत्यांची दुसरी टीम अपरिहार्यपणे तयार झाली. व संघावर तितकीच निष्ठा, प्रेम करीत संघाचे संवर्धन करू लागली. यापैकीच साहित्य संघावर प्रेम करणारे एक कार्यकर्ते म्हणजे शि. मो. घैसास !

आज वयाने नव्वदीच्या घरांत असलेले 'शि.मो.' उर्फ 'घैसास' यांचा जन्म दि. १० फेब्रु. १९२७ रोजी रत्नागिरी येथील दापोली तालुक्यांतील एका गांवात झाला. लहानपणी सांपत्तिक स्थिती बेताची ! त्यामुळे शिक्षणही बेताचे ! त्यामुळे मॅट्रिक होतांच, त्यांना चरितार्थासाठी मुंबईला यावे लागले. मुंबईत दादर येथील एका दुकानांत ते नोकरी करू लागले. पण त्या नोकरीत त्यांचे समाधान नव्हते. श्री. घैसास यांचे शिक्षण बेताचे असले तरी त्यांच्या जवळ उपजत अशी प्रतिभा आणि प्रतिमा यांची दैवी देणगी होती. घरच्या परिस्थितीमुळे कोणापुढेही नम्रतेने वागण्याचा त्यांचा

स्वभाव बनला असला तरी,..जो भल्याभल्या पदव्युत्तर मंडळींनाही दुर्लभ असा त्यांच्या ठायी होता तो स्वतः विषयींचा प्रचंड आत्मविश्वास! या त्यांच्या आत्मविश्वासांतूनच श्री. घैसास यांना लाभली ती त्यांची हजरजबाबी वक्तृत्वशैली !

दुसऱ्यांना मदत करणे, सहकार्य करणे, त्यासाठी मेहनत घेणे - हा श्री. घैसासांचा स्थायी भाव ! मग ते साहित्य वा नाट्य क्षेत्र असो, सामाजिक वा शैक्षणिक क्षेत्र असो वा धार्मिक क्षेत्र असो, कोणी व्यक्ती त्यांच्याकडे जिज्ञासेपाटी आली तर तत्परतेने त्या विषयाची ते त्यांना अवगत असलेली माहिती देतील किंवा त्या विषयांच्या पुस्तकांची नांवे त्या व्यक्तीला सांगून त्याच्या लेखनाला किंवा कार्याला सहकार्य करतील.

इ.स.१९६१ मध्ये श्री. घैसास दादर येथे नोकरी करत असताना पत्रकार श्री. वा.य.गाडगीळ यांची गांठ पडली, व दोघांच्या 'गाठी भेटीतून' श्री. घैसासांचा 'स्वयंसेवक' म्हणून साहित्य संघात प्रवेश झाला. त्याच सुमारास अ.भा.मराठी नाट्यपरिषदेचे पुणे येथील कार्यालय मुंबईत नुकतेच साहित्य संघात आले होते. साहित्य संघ नावाच्या वटवृक्षाखाली नाट्यपरिषदेचे इवलेसे रोपटे तग धरून होते. फक्त १३-१४ कार्यकारिणी (प्रादेशिक सह) सदस्य असलेली ही अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद होती. त्यावेळी या परिषदेला कार्यालयीन कामासाठी एका सुबुध्द, सुसंस्कृत अशा एका कर्मचाऱ्यांची गरज होती. त्यानुसार, श्री. घैसासांचा साहित्य संघातील-नाट्यपरिषदेत 'कर्मचारी' म्हणून प्रवेश झाला.

श्री. घैसासांना चरितार्थासाठी अर्थार्जन व स्वान्त सुखाय - असे 'हे' क्षेत्र हवेच होते. त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. विठ्ठल दर्शनाने आकाशाएवढा आनंद झालेल्या संत तुकारामांसारखी त्यांची अवस्था झाली. आणि मग 'घैसास झाला आकाशा एवढा' !

साहित्य संघाधिष्ठित नाटयपरिषदेत श्री. घैसासांच्या अंगीभूत सर्वच गुणांना वाव मिळाला. त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पालव्या फुटल्या आणि त्यांचा 'गुणगंध' गिरगांवच्या आसमंतात भरुन उरला.

दुपारी ३ वाजल्यापासून रात्री ८-९ वाजेपर्यंत हे शुभ्र-वस्त्रधारी घैसास साहित्य संघांत नाटयपरिषदेच्या कार्यालयात विराजमान झालेले असायचे. नाटयपरिषदेच्या सर्व कार्यालयीन कामांची जंत्री त्यांच्यामागेच असलेल्या कपाटांत व कपाटांची चावी - त्यांच्या हातांत असे. नाटयपरिषदेच्या वर्षभरांच्या कार्यक्रमांची आराखडा ! त्याची नीटसर आखणी ! त्याची विषय वार, तारीख वार विभागणी, तसेच रोजचा पत्रव्यवहार, आलेल्या पत्रांना स्वतःच्या मोडी लिपीप्रमाणे असलेल्या एका साचाच्या, नीट-नेटक्या, सुवाच्च हस्ताक्षरांत उत्तरे लिहिणे व संध्याकाळी फिरत-फिरत कार्यालयांत येणाऱ्या पदाधिकाऱ्यांपुढे त्यांच्या स्वाक्षरीसाठी ती पत्रोत्तरे सादर करणे, खर्चाचा ताळेबंद, जमाखर्च लिहिणे, कार्यकारिणीच्या वरचे वर होणाऱ्या सभांचे आयोजन करणे, त्या सर्व सभासदांच्या स्वागतापासून त्यांच्या भोजनांदि चहा पाण्याची 'चोख' व्यवस्था ठेवणे, सभेनंतर त्या सभेचे इतिवृत्त तयार करणे. त्याचप्रमाणे, नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षांची अविरोध निवड किंवा जरुर पडल्यास निवडणूक व त्याची सर्वतयारी करणे - इत्यादी नाट्यपरिषदेच्या सर्वांगपूर्ण कामांची सूत्रे स्वतःच्या हाती घेऊन त्यांत एकसूत्रीपणा ठेवणे, - इति श्री घैसास काम (कार्य) नामावलि.

त्याच सुमारास, श्री. घैसास हे साहित्य संघाचे नियामक मंडळ सदस्यही झाले होते आणि त्यामुळे साहित्य संघाच्या कोणत्याही कार्याला मदत करणे, हें त्यांचे आद्य-कर्तव्यच झाले होते. त्यामुळे इ.स.१९९० पर्यंत श्री. घैसास यांचे एक पाऊल नाटयपरिषदेत रोवले गेले असले तरी त्यांचे दुसरे पाऊल साहित्य संघासाठी सदैव तत्पर असायचे. त्याकाळी,संघात नाट्यपरिषदेच्या कार्यालयाच्या पलिकडे-पुढील खोलीत सा.संघाचे कार्यालय होते. त्यामुळे संघाच्या वास्तूत येणाऱ्या प्रत्येक

व्यक्तीस घैसासांनाच प्रथम सामोरे जावे लागायचे व श्री. घैसासही त्या व्यक्तीची आत्मियतेने विचारपूस करून ती आलेली व्यक्ती संघासाठी आली आहे की नाटयपरिषदेसाठी आली आहे. त्यानुसार ते त्या व्यक्तीला योग्य ते मार्गदर्शन करीत. त्यामुळे साहित्य संघाच्या वास्तुत येणाऱ्या व्यक्तीस, साहित्य संघ म्हणजे भालेराव व नाटयपरिषद म्हणजे घैसास - असेच समीकरण होऊन गेले होते.

इ. स. १९९० पर्यंत साहित्य संघाच्या वास्तुत, साहित्य संघ व नाटयपरिषद या दोन्ही संस्था एकत्र कुटुंबाप्रमाणे अगदी गुण्यागोविंदाने नांदत होत्या. तेव्हा तिथे वाद-विवाद होत होते, रुसवे-फुगवेही होते, 'मानापमानाचे' प्रयोग तर वरचे-वर होत होते. तरीही, तेव्हां तिथे नांदत होता तो एक कौटुंबिक, जिव्हाळा ! 'अण्णा', 'नाना', 'दादा', 'भाऊ', 'तात्या', 'काका'या घरगुती नावांनीच सर्व सदस्यांना श्री. घैसासांबद्दल तितकीच आपुलकी, प्रेम वाटत होते मात्र श्री. घैसास हे लहान थोर मंडळीकडून 'घैसास'च राहिले. फार तर ते 'शिमो' होत असत, इतकेच.

शि. मो. घैसास म्हणजे एक अष्टावधानी व्यक्तिमत्त्व असे म्हणावे, असा एक अनुभव म्हणजे मुं.म.साहित्य संघाने इ.स.१९८६ मध्ये आयोजित केलेले 'हीरक' महोत्सवी साहित्य संमेलन ! साहित्य संघाच्या पदाधिकाऱ्यांनी या संमेलनाच्या आयोजनासाठी काही समित्या व त्यावरील योग्य सदस्याच्या नेमणुका केल्या. त्यानुसार प्रस्तुत संमेलनाच्या मुख्य कार्यालय -समितीची जबाबदारी शि.मो. घैसास यांच्यावर सोपवली व श्री. घैसासांनीही ती आनंदाने स्विकारली. संमेलनांची प्रतिनिधी नोंदणी, विविध समित्यांच्या -उपसमित्यांच्या सभांची आयोजने, 'साहित्य' या विशेषांकांची छपाई अर्थात त्यांतील मुद्रण-दोष तपासणी संमेलानांच्या - स्मरणिकेसाठी आलेल्या जाहिरातींची पध्दतशीर नोंद, संमेलनाची वृत्तपत्रीय प्रसिध्दी, आणि या सर्वांत महत्वाचे म्हणजे रोजच्या रोज होणारा विपुल प्रमाणांतील पत्रव्यवहार ! आलेल्या पत्रांची - त्या त्या समितीप्रमाणे अर्थात त्या त्या सदस्यांप्रमाणे केलेली विभागणी व पुन्हा त्यांच्या त्या पत्रोत्तरांची केलेली टपालव्यवस्था (अर्थात् त्यांच्या बरोबर काम करीत असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांच्या, सहकार्यानेच ! ) पण हे सर्व बिनचूक आणि शांतपणे करीत असतांनाच संमेलनाच्या कामाविषयी मधून-मधून विचारपूस करावयास येणारे भीमराव कुलकर्णी, केशव मेश्राम, शं.ना. अंधृटकर, दाजी भाटवडेकर, डॉ. (बाळ) भालेराव, यासारख्या पदाधिकाऱ्यांना त्यांना अपेक्षित असलेल्या कामाची रितसर माहिती देणे, तसेच, त्याचवेळी संमेलनाविषयी सतत विचारपूस करावयास येणारे संघाबाहेरील अनेक प्रतिनिधींना संमेलनाची एकूण माहिती देणे व त्यांची रितसर प्रतिनिधी नोंदणीसुध्दा करून घेणे - अशा रितीने संमेलनाच्या सर्वकामांची सूत्रे श्री. घैसासांच्या हाती, विशेष म्हणजे अगदी व्यवस्थित - स्मरणपूर्वक असायची.

अशी ही अष्टावधानी कामे श्री. घैसास सातत्याने तीन ते चार महिने करीत होते. त्यातूनच त्यांनी अनेक थोर मंडळीकडून प्रशंसा व सोहार्दाची थाप मिळवली होती.

'आत्मसन्मान' हा श्री. घैसासांचा एक स्वभाव विशेष होय! सर्वसाधारणपणे, संस्थातून आपण कितीही जीव तोडून, बिनतोड काम केले तरी त्याची कदर ही होतेच असे नाही, याची श्री. घैसासांना पूर्ण जाणीव झाली असावी, आणि त्यातूनच स्वतः विषयी प्रचंड आत्मविश्वास असलेल्या श्री. घैसासांचा 'आत्मसन्मानांचा फणा बाहेर आला असावा..... आणि त्यामुळे श्री. घैसासांच्या वागण्यांत, त्यांच्या लिहिण्यांत, इतकेच नव्हे तर त्यांच्या बोलण्यांतून सुध्दा - कोणत्याही विषयांतून स्वतःला सादर (प्रेझेंट) करणे ! - ही मुलखावेगळी खोड दिसून यायची. आणि गंमतीची गोष्ट अशी की या आत्मसन्मानासाठी श्री. घैसास वेगवेगळ्या भूमिका घेत असत. त्यांत, सर्वांत त्यांची आवडती भूमिका म्हणजे 'साफ सांगते मी येणार नाही'- असे म्हणणारी भामिनीची भूमिका !

गंमतीदाखल एक प्रसंग सांगते. मी वर सांगितल्याप्रमाणे साहित्य संघाच्या हीरक महोत्सवी संमेलनाच्या कार्यालयाची सर्व सूत्रे स्वतःच्या हाती घेऊन स्वखुषीने सर्वत्र कार्यरत असणाऱ्या घैसासांचे संमेलनाच्या आदल्या रात्री कोणाशी तरी काही तरी बिनसले ! आणि मग काय विचारतां ? तडकाफडकी श्री. घैसासांनी, इतक्या ठसक्यात 'भामिनीची भूमिका घेतली आणि ते संमेलनाच्या मंडपाबाहेर निघून गेले की, त्या रात्री काही वरिष्ठांची झोपच त्यांनी उडवली ! मात्र, श्री. घैसासांना जवळून ओळखणाऱ्या कांही मंडळींना त्यांची ही भूमिका'परिचित होती. सकाळी संमेलन सुरु होणार आणि एवढया मोठया कार्याच्या जबाबदारीपासून घैसास दूर राहूच शकणार नाही.'याची त्यांना खात्री होती आणि झालेही तसेच ! ... रात्र सरली आणि पहाटे पहाटे ही श्री. घैसासाची स्वारी संमेलन-कार्यालयांस हजर ! आणि इतकेच नव्हे तर लगेच त्यांची 'तो मी नव्हेच' ही दुसरी भूमिका सुरु (फक्त प्रभाकरपंतांची 'टोपी'नव्हती एवढंच) आणि त्यांची ती 'भामिनी' कुठल्या कुठे लुप्त !

श्री. घैसासांची आणखी एक (पण) खट्याळ भूमिका म्हणजे नारायण - नारायण म्हणणाऱ्या नारदाची !

श्री. घैसास, साहित्य संघातील नाटयपरिषदेत 'कर्मचारी' म्हणून असतांना कै. पाडुरंगराव शिरोडकर व पत्रकार कै. शशिकांत नार्वेकर हे दोघे नाट्यपरिषदचे संयुक्त कार्यवाह होते तसेच साहित्य संघातही नियामक मंडळ सदस्य होतेच. श्री. घैसासांनी या उभयतांच्या मध्ये एकमेकांविषयी असे काही 'हितगुज' करून ठेवले होते की हे दोघे त्यावेळी संयुक्त कार्यवाह असूनही त्यांच्या कार्यकारिणीच्या सभेखेरीज कार्यालयांत एक दुसऱ्या समोर कधीच येऊ शकले नाहीत.

असो.श्री. घैसासांचा एक उल्लेखनीय गुणविशेष म्हणजे त्यांची असामान्य स्मरणशक्ती ! कार्यालयीन सर्व कामांची जंत्री, विविध उपक्रमांच्या तारखा, या सर्व त्यांच्या स्मरणांतच कोरलेल्या असायच्या, असेच वाटे. श्री. घैसासांना सा. संघात-नाट्यपरिषदेत असतांना त्यांना वरचेवर सभासदांना पत्रे पाठवावे लागत त्यामुळे असावे, पण आश्चर्याची गोष्ट अशी की सा. संघ व नाट्यपरिषदेतील सर्व सभासदांचे (संख्या, साधारण १०००च्या घरांत असावी) घरचे पत्ते श्री. घैसासांना मुखोद्गत असायचे. आजही वयाच्या नव्वदीत, शरीर दुबळे झालेले असतानाही २५-३० वर्षापूर्वीच्या संघ-नाटयपरिषदेतील घटना अगदी त्याच तडफेने-त्याच आत्मनिश्वासाने ते सांगतील आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांत 'स्व' ही असेलच !

लेखन करणे व त्यासाठी वाचन करणे हा श्री. घैसासांचा छंद होता. 'टिटवाळा श्री. महागणपती दर्शन''फडके गणपति मंदिर ' 'वहेश्वरी ''बाबूलनाथ' इत्यादी धार्मिक,तसेच 'जादुची नगरी','जादुचे तळे', 'राणीचा बाग' इत्यादी लहान मुलांसाठी छोट्या पुस्तिका त्यांनी लिहिल्या. 'दोन घडीचा डाव', 'स्वयंसिध्दा' - ही नाटके लिहिली तसेंच श्री. घैसास महाराष्ट्र- शासनाच्या बालगंधर्व जन्म शताब्दी - समितीवर असतांना 'बालगंधर्व जीवन संगीत' ही पुस्तिका लिहिली आहे. त्याचप्रमाणे श्री. घैसासांनी साहित्य संघावरही लेखन केले आहे. साहित्य संघाचा सुवर्णमहोत्सव ते हीरक (इ.स.१९८५ ते १९९५) या दहा वर्षांतील विविध उपक्रमांची साद्यंत माहिती श्री. घैसासांनी 'बखर-दशपदी' या पुस्तिकांतून दिली आहे.



त्यांत, हीरक महोत्सवी साहित्य संमेलनाशिवाय 'मराठी पत्रकार-संमेलन', 'भाषा भगिनी संमेलन', 'विनोदी साहित्य संमेलन' त्याचबरोबर सत्कार सोहळे, जन्मशताब्दी समारंभ, नाटयमहोत्सव, इत्यादी या दहा वर्षातील सर्वच कार्यक्रमांची सविस्तर माहिती श्री. घैसासांनी त्याच्या विशिष्ट शैलीत दिली आहे. 'सांस्कृतिक सरिता' ही श्री. घैसासांची पुस्तिका म्हणजे साहित्य संघाच्या प्रत्येक पाच वर्षांनी बदलणाऱ्या कार्यकारिणी सदस्यांचा, त्यांच्या कार्याचा-उपक्रमांचा आलेख होय ! श्री. घैसासांनी साहित्य - संघावर लिहिलेल्या पुस्तिकांचे वैशिष्ट्य असे की साहित्य संघाच्या जिज्ञासेसाठी ही पुस्तके निश्चित मार्गदर्शक ठरतील, यांत शंका नाही. तसेच पत्रकारितेच्या दृष्टीने पत्रकारापेक्षा, वार्ताहर कसा असावा, याचे श्री. घैसास म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे, हेही लक्षात येईल.

श्री. घैसास साहित्य संघात व नाटयपरिषदेत असतांना त्यांनी 'मुंबई आकाशवाणी केंद्र ' व 'मुंबई दूरदर्शन' साठी ही लेखन केलेले होते. मुंबई आकाशवाणीवर कांही श्रुतिकांचे तसेच निवेदनांचे लेखन श्री. घैसासांनी केले होते. साहित्य संघाचा 'अजब न्याय वर्तुळाचा' हा विजया मेहता दिग्दर्शित नाटकाचा परदेश दौरा जर्मनीला गेला होता. मराठी नाटकांच्या इतिहासांत हा पहिलाच परदेश दौरा होता. या अभिमानास्पद परदेश दौऱ्याच्या निमित्ताने मुंबई दूरदर्शनने साहित्य संघाचा एक माहितीपट दाखवला होता. इथे महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या माहितीपटाचे लेखन श्री. घैसासांनी केले होते.

या निमित्ताने श्री. घैसासांचा आणखी एक गुण सांगावासा वाटतो, तो म्हणजे छापून आलेल्या मजकूरातील मुद्रण दोष शोधणे. यांत त्यांचा हातखंडा असे. संस्थांच्या सर्वसाधारण वा साधारण सभेत विरोधकांना 'नामोहरम' करण्यासाठी श्री. घैसास हे त्यांचे 'ब्रह्मास्त्र नेहमीच सोडीत असत.'

श्री. घैसास साहित्य संघ व नाट्य परिषदेत कार्यरत असले तरी त्यांचे याखेरीज, 'लोकमान्य सेवा संघ (विलेपार्ले)', 'चित्तपावन ब्राह्मण संघ'(गिरगांव), 'ब्राह्मण सेवा मंडळ' (दादर) इ. बऱ्याच संस्थांशी त्यांचे हितसंबंध होते. यांतूनच त्यांना लाभली होती ती बहुश्रुतता !

थोडक्यात म्हणायचे तर श्री. घैसासांना, स्व-प्रेम व 'स्व- कर्तृत्व' याचा इतका स्वाभिमान आहे की, त्यांच्याबद्दल कोणी कांही लिहिणे हे 'येरा गबाळयाचें काम नव्हे' असेच ते झटक्यात आत्मविश्वासाने म्हणतील. पण मी म्हणते की, **'शिव'** लीला असो, वा **'राम'** रक्षा असो, त्याला साहित्य- समीक्षेचे निकष कोणी , कधी लावील कां ? हा तर निव्वळ 'भक्तिमार्ग' आहे. 'ज्ञान' मार्ग नव्हे !

असो. मुंबई मराठी साहित्य संघाच्या या अष्टदशक वर्षात - वयाच्या नवम् दशकात पर्दापण करणारे, साहित्य - संघ- स्थापनेच्या सदस्यांकडून प्रेरणा घेऊन संघावर प्रेम करणारे व संघाचे, नियामक मंडळ-सदस्य, कार्यकारिणी सदस्य, साहित्यशाखा प्रमुख, नाट्यशाखा प्रमुख, कोषाध्यक्ष, सह-प्रमुख कार्यवाह, प्रमुख कार्यवाह, उपाध्यक्ष , अशी सर्व पदें भूषवीत चाळीस वर्षे (इ.स.१९६१ ते २०००) साहित्य संघात कार्यरत असणारे श्री. शि. मो. घैसास या बुजुर्ग कार्यकर्त्यास अष्टदशक साहित्य संघाच्या वतीने अनेक दंडवत व 'शुभास्ते पन्थ :' ही शुभेच्छा !

●

# साहित्य संघाशी जुळलेले घट्ट नाते

**- अरविंद पिळगावकर**



आजची साहित्य संघाची वास्तू जिथे उभी आहे तिथे अगोदर खुले नाट्यगृह होते. त्यावेळी मी संघाचा सर्वसाधारण सभासद होतो. तिथे होणारी नाटकं अधून मधून पहाणं एवढाच संघाशी संबंध. नवीन बंदिस्त नाट्यगृहाचा पायभरणी समारंभ झाला त्यावेळी त्यावेळचे रंगभूमीवरील झाडून सारे दिग्गज कलावंत नांदी म्हणायला उभे होते. त्यात वालगंधर्व, गणपतराव बोडस, हिराबाई बडोदेकर, पु.ल.देशपांडे, दाजी भाटवडेकर, सुहासिनी मुळगावकर, निर्मला गोगटे असे अनेक कलाकार होते. १९६४ साली बंदिस्त नाट्यगृहाची उभारणी झाली आणि एप्रिल महिन्यात नाट्यमहोत्सव भरवायचं ठरलं. (१९४४ पासून डॉ. अ.ना.भालेराव यांनी सुरू केलेल्या महोत्सवाच्या स्मरणार्थ) त्यात 'यशवंतराव होळकर' हे वि.द.घाटे लिखित ऐतिहासिक नाटक सादर होणार होतं. काही कारणामुळे त्या महोत्सवात ते नाटक होऊ शकलं नाही. पुढे नोव्हेंबरमध्ये जो नाट्यमहोत्सव झाला त्यात ते नाटक करायचं ठरलं. नाटकाचे दिग्दर्शक होते के. नारायण काळे. यशवंतरावाच्या प्रमुख भूमिकेत दाजी भाटवडेकर, दुसरा बाजीराव पेशवा दामू केंकरे, केशरच्या भूमिकेत भारती मराठे (संजीवनी मराठे यांची कन्या) असा संच होता. त्या नाटकात पठाण आणि मावळे असा शिपायांचा एक प्रवेश होता. त्यात जयंत सावरकरांच्या वशिल्याने एका गाणाऱ्या पठाणाची भूमिका मला मिळाली. प्रवेशाच्या सुरवातीला मी गात बसलेला व इतर शिपाई ऐकत बसलेले, असं दृष्य होतं. नंतर एक मावळा येऊन त्याला आव्हान देतो की तुझ्या हिंदी गाण्याचा मी लगेच मराठी अनुवाद करुन दाखवतो. अशी ती हिंदी आणि मराठी जुगलबंदी आणि शेवटी तो पठाण त्याला आपल्या मुलखातला नाच म्हणजे भांगडा शिकवतो, असा एकंदर गायन आणि नृत्य असलेला तो प्रवेश होता. नृत्य शिकवण्यासाठी दामू केंकरे यांनी सूरी नावाचा एक पंजाबी नृत्यदिग्दर्शक आणला होता. पहिल्या प्रयोगात तोही आमच्याबरोबर नाचला आणि प्रवेश खूप रंगला. त्यानंतर त्याचवर्षी डिसेंबरमध्ये दुसरा प्रयोग आणि त्यानंतर १९६५ साली तिसरा प्रयोग, असे इजा, बिजा, तिजा तीन प्रयोग होऊन नाटकाने गाशा गुंडाळला. त्या नाटकामुळे एक चांगला गाणारा मुलगा अशी माझी संघाला ओळख झाली. आयत्या वेळी संशयकल्लोळमधली साधूची भूमिका मिळाली. ती केली. 'इंद्रजित वध' नावाचा स.अ.शुक्ल लिखित दशावतार साहित्य संघाने सादर केला. त्यात दाजी-रावण, रजनी जोशी-मंदोदरी, दामू-इंद्रजित, मा.दत्ताराम-राम, जयंत सावरकर-लक्ष्मण अशा भूमिका होत्या. सूत्रधार होते भालचंद्र उर्फ अण्णा पेंढारकर आणि विदूषक शंकर घाणेकर. मी गाणारा म्हणून सूत्रधाराबरोबर पारिपार्श्वक म्हणून उभं रहाण्याची संधी मिळाली आणि विष्णुदास भावे यांच्या दोन नांद्या शिकायला आणि गायला मिळाल्या.

संघात माझं येणंजाणं सुरु होतं परंतु लक्षात राहील अशी भूमिका मिळाली नाही. अर्थात मी हौशी नट व नोकरी करणारा असल्यामुळे त्याचं काही वाटलं नाही.

१९६७ साली अचानक माझ्या आयुष्यात एक

घटना घडली आणि एका रात्रीत मी झीरोचा हीरो झालो. नाटक होतं, 'संगीत वासवदत्ता', लेखक वसू भगत, दिग्दर्शक निर्माती मीना पेठे, नायिका सुहासिनी मुळगावकर आणि ललिता केंकरे, संगीत दिग्दर्शक होते पं. जितेंद्र अभिषेकी. या नाटकाने मला एकदम हीरोंच्या पंक्तीत नेऊन बसवलं. पं.अभिषेकींशी झालेल्या ओळखीचं गुरु-शिष्य नात्यात परिवर्तन झालं आणि ते १९७४ साली लोणावळ्याला जाईपर्यंत कायम होतं. नंतरही तसंच राहिलं.

दरम्यान अभिजात संगीत नाटकातून काम करावं म्हणून प्रयत्न सुरू केले. गुरु दाजींकडून गद्य समजून घ्यायचं, श्री. प्रभाकर भालेकर यांच्याकडून पदं बसवून घ्यायची आणि भूमिका बसवायची. त्यावेळी या नाटकांच्या तालमी वगैरे होत नसत. सौभद्र (अर्जुन), संशयकल्लोळ (अश्विन शेट) आणि शारदा (थोदंड) अशा भूमिका बसवल्या आणि संयुक्त नटसंचात होणाऱ्या नाटकातून आणि नयन तुझे जादुगार, घनश्याम नयनि आला, वाऱ्यावरची वरात (१९७२), जय जगदीश हरे अशा नवीन नाटकातून भूमिका करत होतो. परंतु संघाशी परत नाळ जुळायला १९७५ साल उजाडावं लागलं.

संगीत मृच्छकटिक या देवलांच्या नाटकाचा दाजी भाटवडेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या स्तरविविष्ट रंगमंचावरील नाटकाचा गोवा दौरा होता. शर्विलकाचं काम करणाऱ्या अरविंद चाफळकर यांना आकाशवाणीवर नोकरी लागली. त्यामुळे त्यांना दौऱ्यावर येणं शक्य नव्हतं. मी अधून मधून तालमींना जात असल्यामुळे मला नाटक पाठ होतं. दौऱ्यावर गेलो आणि नंतर ती भूमिका कायमच गळ्यात पडली. नंतर संगीत स्वयंवरचे दोन प्रयोग एकाच दिवशी होते. त्यात भीष्मकाची भूमिका अशीच म्हणजे तालमीशिवाय केली आणि ती आजतागायत मला उपयोगी पडते आहे.

त्याच वर्षी संघाने गोविंदराव टेंबे यांची 'संगीत महाश्वेता' ही संगीतिका (ऑपेरा) बसवायचं ठरवलं. त्यात मला नायकाची - पुण्डरीकाची भूमिका मिळाली. कान्होपात्राबाईंनी महाश्वेताची भूमिका केली. कपिंजल - चंदू डेगवेकर, चंद्र नारायण बोडस असा संच होता. या संगीतिकेत अरे, अरेरे, अहाहा या शब्दांना सुद्धा चालीत गुंफलं होतं. एकही शब्द गद्य नव्हता. अर्थात मराठी रंगभूमीला संगीतिकेचं फारसं कौतुक नाही. त्यामुळे त्याचे फारसे प्रयोग झाले नाहीत. एका वेगळ्या फॉर्म मध्ये काम केल्याचं समाधान मात्र मिळालं.

माझे बाहेरच्या नाट्यसृष्टीतले नवीन नाटकांचे प्रयोग चालूच होते. १९७६ साली आणखी एक महत्वाचा योग माझ्या आयुष्यात आला. द.ग.गोडसे यांनी केलेल्या भासाच्या प्रतिमा या नाटकाचा मराठी अवतार, 'संगीत धाडिला राम तिने कां वनी?' या नावाने सादर झाला. त्यात गायन आणि अभिनय या दोन्ही आघाड्यांवर माझी भरताची भूमिका गाजली. गुरु दाजींनी माझ्यावर कठोर मेहनत घेतल्यामुळेच हे शक्य झालं. या निमित्ताने पं.अभिषेकींचा सहवास पुन्हा लाभला. द.ग.गोडसे यांच्याशी, 'संगीत महाश्वेता' च्या वेळी परिचय झालाच होता. या नाटकामुळे त्या परिचयाचं दाट स्नेहात झालं. श्री. नारायण बोडस (राम), सौ. आशा खाडिलकर (सीता), श्री. माधव खाडिलकर (लक्ष्मण), दाजी भाटवडेकर (दशरथ), रजनी जोशी (कैकेयी) आणि मी भरत अशा संचातला या नाटकाचा प्रयोग सर्वांगसुंदर व्हायचा. सकाळी ९/१० वाजल्यापासून अभिषेकीबुवांच्या बरोबर गाण्याच्या चाली करण्यासाठी त्यांचा मदतनीस म्हणून आणि नंतर सायं. ५ ते रात्रौ १०/११ वाजेपर्यंत गद्याच्या तालमी दाजींबरोबर म्हणजे माझ्यासाठी मेजवानीच होती.

संघाशी गेली पन्नास वर्षे असे घट्ट नाते जुळले आहे. संघासाठी मी नाट्यसंगीताचे अनेक कार्यक्रम केले, निवेदन, लेखन, दिग्दर्शन अशा आघाड्या सांभाळल्या. संगीत मानापमान, हाच मुलीचा बाप,

संगीत सौभद्र (संक्षिप्त), संगीत धाडिला राम (संक्षिप्त दोन अंकी तरुण कलाकारांच्या संचात) अशा अनेक नाटकांचं दिग्दर्शन आणि संगीत संयोजन असा माझ्या दोन्ही गुरूंचा (दाजीसाहेब व अभिषेकीबुवा) वारसा सांभाळला. हे सर्व करताना अनेक आनंदाचे आणि श्रमसाफल्याचे क्षण आले तसेच मानापमानाचे, कटु अनुभवांचे चटकेही सोसले, परंतु या क्षणाला त्यांची आठवण कशाला ? माझ्या गुणदोषांसकट मला संघाने आणि माझ्या सहकलाकारांनी मला सांभाळून घेतलं. साहित्य शाखेनेही वेळोवेळी माझ्याकडून लिखाण करवून घेतलं, याचं श्रेय मी श्री.मल्हार ढगे यांना देतो. त्यांनी प्रथम मला लिहितं केलं.

सर्वोच्च आनंदाचा क्षण म्हणजे, ज्या वास्तूत मी पन्नास वर्षांपूर्वी प्रथम पदार्पण केलं, त्याच वास्तूत माझा सत्कार साहित्य संघाने केला. निमित्त होतं मला महाराष्ट्र राज्याचा अण्णासाहेब किर्लोस्कर जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याचं. संघाने आजपर्यंत अनेक दिग्गजांचे सत्कार केले. त्यात माझ्यासारख्या एका छोट्या कलाकाराचा सत्कार केला त्याबद्दल मी संघाचा कायम ऋणी राहीन.

●

## प्रतिसाद

श्री. संपादक महोदय,
१० सप्टेंबर २०१५

'साहित्य'च्या मे-जुलै २०१५चा अभिव्यक्ती स्वातंत्र्य विशेषांक मनापासून आवडला. मुंबई मराठी साहित्य संघाच्या परंपरेला तो साजेसा आहे. विभिन्न क्षेत्रात वावरणाऱ्या आठ लेखकांनी आपआपल्या विचारांनी तो समृध्द केला आहे. अभिव्यक्ती स्वांतत्र्याचे वेगवेगळे पैलू त्यात अधोरेखित झाले आहेत. स्वांतत्र्याबरोबर येणारी कर्तव्ये, जनजागरणाचे माहात्म्य, विचारांची प्रामाणिकता यावर काहींनी भर दिला आहे. तर काहींनी उतावळेपणाला आवर घालणे, माध्यमांची जबाबदारी वा लेखननिष्ठा यावर भाष्य केले आहे. सर्व लेख अधिकारवाणीने लिहिले आहेत. त्यामुळे अंक सर्वांगसुंदर आणि बहुरुपदर्शक झाला आहे.

अंकातील विविध लेख वाचतांना काही वेगळे विचार स्फुरतात. साहित्य क्षेत्रातील पूर्वेतिहास पाहिल्यास लेखक, विचारवंत, टीकाकार इत्यादींचे कंपू तयार होतात असे दिसते. त्यामुळे कंपूत असणारे लेखक पुढे सरकतात. बाकीचे एकटे पडतात.

दुसरा मुद्दा असा की कथा, कविता, कांदबरी, ललित लेखन, प्रवासवर्णन लिहिणारे व समीक्षा करणारेच साहित्यिक आहेत असा भास निर्माण केला जातो. पुस्तकपरीक्षणे अशाच पुस्तकांची छापली जातात. एखाद्या लेखकाने आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, कृषी तंत्रज्ञान, विज्ञान, भवितव्यशास्त्र किंवा अशा वेगळया धाटणीच्या विषयांवर विद्वत्तापूर्ण लिखाण केले तरी त्याची पुरेशी दखल घेतली जात नाही. वास्तविक मानवी जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व लिखाणाला लक्षवेधी मानले गेले पाहिजे. 'साहित्य' संपादन करताना या सूचनांच्या विचार झाला, तर आनंद वाटेल.

**-डॉ. शंकर के. मोडक**

# साहित्य संघाची लक्षणीय वाटचाल

**- रजनी जोशी**



एखादी संस्था अष्टदशक पर्वात पदार्पण करते ही घटना सामान्य नाही. जुलै २०१४ ते जुलै २०१५ हे साहित्य संघाचे ८० वे वर्ष साजरे होत आहे. डॉ. अ.ना.भालेराव यांनी लावलेला हा वेलू गगनावरी गेला आहे. डॉक्टरसाहेबांच्या दूरदृष्टीने, संघटन चातुर्यामुळे, आर्थिक नियोजनामुळे हे शक्य झाले आहे. साहित्य व नाट्य या दोन्ही पथावरची संघाची वाटचाल लक्षणीय आहे.

ज्या काळात कुलीन घराण्यातील स्त्रिया रंगमंचावर काम करण्यासाठी कचरत असत, त्या काळात डॉक्टरसाहेबांनी आपल्या नेतृत्व गुणांमुळे व आदबशीर वागणुकीमुळे स्त्रियांना पाठिंबा व धीर देऊन रंगमंचावर उभे राहण्याची स्फूर्ती दिली. दुर्गाबाई खोटे, वनमालाबाई, मीनाक्षीबाई, जयमाला शिलेदार, शांता आपटे, विमल कर्नाटकी या सर्वांनी डॉक्टरसाहेबांच्या आग्रहास्तव रंगमंचावर पदार्पण करुन साहित्य संघाचा रंगमंच उजळून काढला.

त्या नंतरच्या पिढीतील विजया मेहता, सुधा करमरकर, ललिता केंकरे, मंदाकिनी भडभडे, मंगला पर्वते, मालती पेंढारकर, मनोरमा वागळे, चारुशीला भाटवडेकर, भक्ती बर्वे या सर्वांनी संघावरील प्रेमाने आपल्या अभिनय गुणांनी संघाच्या नाट्यविभागाला विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवले.

संघाच्या त्यानंतरच्या पिढीतील कलावती, निर्मला गोगटे, रजनी जोशी, मधुवंती दांडेकर, सुमती टिकेकर, सुहासिनी मुळगांवकर, कान्होपात्रा, कीर्ती शिलेदार, नयना आपटे, आशा खाडिलकर, योजना भाट्ये या सर्वांनी संघाच्या संगीत नाटकांना भरघोस यश मिळवून दिले.

साहित्य संघाच्या ज्या नव्या पिढीने हे शिवधनुष्य समर्थपणे उचलण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे त्या कलावतींमध्ये निलाक्षी पेंढारकर, सुवर्णा कागल, मेधा गोगटे, अपर्णा अपराजित यांची नावे विसरणे शक्य नाही. वरील सर्व नायिकांच्या बरोबर कामे करणाऱ्या विमल फडके, गीता सोमण, दुर्गा शिंदे, सुनिता धोंड, माणिक बोडस, संध्या म्हात्रे यांचे स्थान कमी नाही.

साहित्य संघाच्या नाटकांमधून काम करीत असतांना संघ कार्यकर्त्यांकडून अतिशय प्रेमाची वागणूक मिळत असे व घरगुती वातावरणामुळे नि:संकोच वावरता येत असे. असे सर्वांचेच मत आहे. आम्हा स्त्री कलाकारांच्या सोयीसवलतींकडे संघाचे कार्यकर्ते जातीने लक्ष देत असत. त्यातही श्री. भार्गवराम पांगे, तात्यासाहेब आमोणकर, त्रिंबक गोखले, शिवा चिखलीकर, शि. मो. घैसास या सर्वांचा आधार वाटत असे. रात्री बेरात्री प्रयोग संपल्यावर किंवा दौऱ्यावरून परत आल्यावर आम्हाला काळजीपूर्वक घरी पोहचविले जात असे. आमच्याबरोबर काम करणारे सहकलाकार (पुरुष) हे सुद्धा जातीने काळजी घेत असत.

डॉ. अ. ना. भालेराव, श्री. पांगे, श्री. आमोणकर, श्री. दाजी भाटवडेकर, श्री. बाबा कलगुटकर या सर्व आदरणीय व्यक्तिमत्वांचा सर्वांना दरारा असे. त्यानंतर आलेले संघाचे प्रमुख कार्यवाह म्हणजे डॉ. बाळ



भालेराव...त्यांचे व्यक्तिमत्व उत्तुंग आहे. मेडिसिनच्या जगातील एक चमत्कार असे त्यांच्याबाबत म्हणता येईल. वडिलांच्या तालमीत वाढल्याने डॉ. बाळ भालेराव यांनाही नाटकाबद्दल प्रचंड आत्मीयता आहे. संघाच्या रंगमंचावर नवीन व धाडसी प्रयोग करण्याचा त्यांनी सपाटा चालविला आहे. नाटयवर्तुळात साहित्य संघ व डॉ. बाळ भालेराव हे समीकरण आदरास पात्र ठरले आहे.

संघाच्या जगन्नाथाच्या रथाची वाटचाल गेली ८० वर्षे निर्वेधपणे व यशस्वीपणे चालू आहे. साहित्य संघ १०० व्या वर्षाकडे झेपावण्यास आता सज्ज आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा असलेल्या संगीत नाटकाचे संघाने जिद्दीने जतन केले आहे.

संघाच्या पुढील वाटचालीत त्यांना अमाप कीर्ती व उदंड प्रतिसाद मिळो हीच आम्हा सर्व स्त्रीकलाकारांची नटेश्वराजवळ प्रार्थना आहे.


*मुंबई मराठी साहित्य संघाची अलिकडील प्रकाशने*

- **एका पिढीचे आत्मकथन** (दुसरी आवृत्ती)
  संपादक : पु. शि. रेगे, वा. ल, कुळकर्णी, रा. भि. जोशी. गं. वा. ग्रामोपाध्ये
- **दुसऱ्या पिढीचे आत्मकथन**, संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
- **मराठी बोलू कौतुके**, संपादक : अशोक बेंडखळे, उषा तांबे
- **एका मुंबईकराची कहाणी** (दीर्घकथा), लेखक : गंगाधर गाडगीळ
- **काशिनाथ त्र्यंबक तेलंग** (अल्पचरित्र), लेखक : गंगाधर गाडगीळ
- **मराठी साहित्य सूर्यमाला**, संपादक मडळ : प्रा. सुहासिनी कीर्तिकर, चंद्रशेखर गोखले, प्रतिभा विस्वास, सावित्री हेगडे
- **ज्ञानतपस्वी रुद्र- न.र.फाटक यांचे चरित्र**, लेखिका अचला जोशी
- **मराठी नाट्यसंमेलन अध्यक्षीय नाट्यसूर्यमाला : भाग २**,
  संकल्पना : शं. ना. अंधृटकर, संपादन : सुभाष भागवत
- **महानगर मराठी साहित्य संमेलने :अध्यक्षीय विचार**, संकल्पना : ज. बा. कुलकर्णी,
  संपादक मंडळ : उषा तांबे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, अशोक बेंडखळे, पद्माकर शिरवाडकर

# एक अनावृत्त पत्र

-उपेंद्र दाते



तीर्थस्वरूप कै. डॉ. अमृत नारायण भालेराव,
साष्टांग दंडवत.

आपण प्रत्यक्ष कधी भेटलो नाही, असं कधी वाटलंच नाही, कारण साहित्य संघाशी प्रत्यक्ष संबंध येण्यापूर्वी आणि संबंध आल्यावर, आपल्याबद्दल, आपल्या कार्याबद्दल, संघटन कौशल्याबद्दल आणि सह्यदयतेबद्दल खूप ऐकलंय, वाचलंय, अनुभवलंय त्यामुळे आपल्याबद्दलची अनोळखी भावनाच माझ्या मनात नाही. खरं म्हणजे मी साहित्य संघाचा सभासद पदाधिकारी नाही. नामवंत नट, चतुरस्त्र लेखक, सिध्दहस्त नाटककार, मौल्यवान देणगीदार चोरबंदळ रसिक, साक्षेपी वाचकसुध्दा नाही. 'इतर सामान्यां प्रमाणे 'साहित्य संघावर' आणि संघ कार्यावर मनापासून प्रेम करणारा, सामान्य रंगकर्मी आहे. माझ्या सारखा अनेकांना 'साहित्य संघ' आपला वाटतो याची अनेक कारणं आहेत. त्यातलं एक सामायिक कारण म्हणजे आपल्याबद्दलची कृतज्ञता.

आपण 'साहित्य संघाचं' जे भव्य-दिव्य स्वप्न पाहिलं होतं ते साकारलं जाण्यापूर्वीच आपल्याला अकाली Exit घ्यावी लागली. तरी सुध्दा आपलं स्वप्न साकार झालं. आपण सुरु केलेलं कार्य गेल्या ८० वर्षात प्रगती पथावरच गेलं.याचं कारण आपल्या कार्यकाळात आपण नुसती स्वप्नंच पाहिली नाहीत. कार्यसिध्दीला नेण्याचा वकुब असलेली, कार्यकर्त्यांची फौज उभी केलीत. व्यक्ती महत्वाची नाही, संघकार्य महत्वाचं हे त्यांच्या मनावर टसवलंत म्हणूनच आपल्या माघारी खचून न जाता, अथक परिश्रमानी त्यांनी आपलं स्वप्न साकार केलं. नाटयगृहासह 'मुंबई मराठी साहित्य संघाची' भव्य वास्तु उभी राहिली. सर्व लेखकांना, रंगकर्मींना रसिकांना,वाचकांना हक्कांच घर मिळालं.

'साहित्य संघ' २० वर्षे जो जे वांछिल ते ते त्याला देत आलाय, पुढेही देत राहील. मला तर संघानी खूप काही दिलंय. नाशिकमधे असतानाच आदरणीय तात्या साहेब वि.वा. शिरवाडकर आणि बाळासाहेब काळे यांच्यामुळे 'साहित्य संघाशी' भावनिक नातं जोडलं गेलं. नाशिक सोडून मुंबईला आल्यावर, 'अखेरचा सवाल' नाटकातली माझी छोटीशी भूमिका पाहून मला शाबासकी देणारे आणि ''दाते ऽ तुम्ही' 'एकच प्याला नाटकातला ' सुधाकर करा. छान कराल. मी तुम्हाला ती भूमिका शिकवीन'', असं सांगणारे दाजी भाटवडेकर, कलाकारांना त्यांच्या आवाजातल्या गुण-दोषांबद्दल मार्गदर्शन करणरे भालचंद्र पेंढारकर साहित्य संघाचेच. नाशिक मधे असताना नाटकासाठी नाटक करणाऱ्या मला मुंबईला पोटासाठी नाटक करणं भाग पडलं. दाजींच्या, अण्णांच्या मार्गदर्शनाचा मला लाभ घेता आला नाही. पण माझं भाग्य थोर म्हणून माझ्या आयुष्यात जयंत सावरकर, प्रमोद पवार आले. त्यांच्यामुळे उशीरा का होईना, माझ्या संघात प्रवेश झाला. त्यांच्यामुळेच तुझं आहे तुजपाशी, सं एकच प्याला, सन्यस्त खड्ग या नाटकातल्या महत्वाच्या भूमिका साकारण्याचं भाग्य

मला लाभलं. ही नाटकं मी केली आणि मी संघाचा झालो. आणि संघ माझा. डॉ. बाळ भालेराव यांनी सं. विद्याहरण नाटकाची जबाबदारी माझ्यावर सोपवली. संघ तुमच्या पाठिशी असेल, याची खात्री देऊन, माझं मनोबल वाढवलं. माझ्या छोट्या नाटयसंस्थेच्या मोठ्या गरजा पांगेसाहेबांनी पूर्ण केल्या. विशेष म्हणजे संघाच्या साहित्य शाखेनं सुध्दा मला आपलं मानलं. या सर्वांनी माझं आयुष्य खूप संपन्न केलं. आणि हा माझा एकटयाचा अनुभव नाही, माझ्यासारखे अनेक आहेत. ज्यांना संघानी बळ दिलं, आपलं मानलं.

डॉक्टर साहेब, डॉ. बाळ भालेराव सर्वार्थानी आपले खरे वारसदार आहेत. आपला अर्धा राहिलेला डाव, आपल्या सहकाऱ्यांच्या साथीनं त्यांनी पूर्ण केलाच पण अनेक नव्यानव्या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले आणि करत आहेत. येणारा काळ खूप कठीण आहे, परप्रांतियांना मराठी शिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या 'मुंबई मराठी साहित्य संघाला' मराठी माणसांना मराठी शिकवण्याची वेळ लवकरच येणार आहे. गिरगावात मराठी अस्मितेचं प्रतिक असलेला संघ उभा आहे. तो हे कार्य नक्की करेल.

साहित्य संघ वय वर्ष ८१ ते १०० नव्या जोमानं, नव्या दिशेनं, सर्व प्रकारच्या अडीअडचणींवर मात करत वाढतच राहील. कारण संघाचा वटवृक्ष आपण खतपाणी घालून सजवलाय. त्याच्या फांद्यांवर साहित्य-कला-संस्कृती सुखनैव विहार करतच रहाणार.

ओळख, अधिकार, लायकी नसताना आपल्याला पत्र लिहिण्याचा अगोचरपणा केला आहे. क्षमस्व.

आपला
**उपेंद्र दाते**

## *अभिनंदन*

**मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाटय / साहित्य शाखेच्या खालील सदस्यांना मिळालेले सन्मान व साहित्य पुरस्कार :**

**प्रमोद पवार :** महाराष्ट्र शासनाने पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या सल्लागारपदी आणि चित्रपट अनुदान महामंडळावर सदस्य म्हणून श्री. प्रमोद पवार यांची नेमणूक केली. याबद्दल अखिल भारतीय मराठी महामंडळातर्फे श्री. पवार यांचा अभिनेते विक्रम गोखले आणि परिषदेचे मोहन जोशी यांच्या हस्ते जूनच्या कलावंत मेळाव्यात सत्कार करण्यात आला.

**डॉ. अनुपमा उजगरे :** सावरकर केंद्र, ठाणेतर्फे स्वा. वि. दा. सावरकर साहित्य पुरस्कार डॉ. उजगरे यांना अ.भा.म.साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते २८ मे २०१५ रोजी प्रदान करण्यात आला.

**डॉ. प्रतिभा सराफ :** प्रतिभा सराफ यांच्या सलग पाच दिवस या कथासंग्रहाला साद संस्थेचा राज्य स्तरीय मराठी वाङ्मय पुरस्कार नुकताच जाहीर झाला. शाल, श्रीफळ सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम रु. १०००/- स्वरुपात हा पुरस्कार २५ ऑक्टोबर २०१५ ला प्रसिध्द कवी विठ्ठल वाघ यांच्या हस्ते दिला जाणार आहे.

**एकनाथ आव्हाड :** महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळातर्फे श्री. आव्हाड यांना शैक्षाणिक आणि सामाजिक कार्य करुन लोकशिक्षणाच्या क्षेत्रात योगदान दिल्याबददल २०१४-२०१५ या वर्षाचा पद्मभूषण रामचंद्रपंत जोशी शिक्षक लेखक पुरस्कार एप्रिल २०१५ मध्ये प्रदान करण्यात आला.

# ऋणानुबंध

## रोहिदास पांगे



मी रोहिदास पांगे. माझे आणि साहित्य संघाचे नाते अतिशय जवळचे आहे.

माझे काका भार्गवराव पांगे यांनी मला साहित्य संघात आणलं आणि मी या संस्थेशी जोडला गेलो. हा ऋणानुबंध साधारणपणे १९५६ सालापासूनचा त्यावेळी इथं साहित्य संघाचं ओपन थिएटर होत. आजूबाजूला नारळीची झाडं होती. चारी बाजूंनी पत्रे लावलेले होते. तेव्हा माझं काम होते, ते म्हणजे नाट्यप्रयोगाच्या वेळी खुर्च्या रांगेत लावायच्या आणि त्यांना नंबर द्यायचे. मग त्यानंतर मी डोअरकीपर चे काम देखील केले होते. मी तिकीट विक्रीसाठी देखील असायचो. साहित्य संघाने जेव्हा तुझे आहे तुजपाशी, सुंदर मी होणार अशा नाटकांची निर्मिती केली, तेव्हाचा हा काळ होता.

१९६४ साली श्री त्र्यंबक गोखले साहेब इथे कार्यवाह होते. त्यांनी मला कार्यालयात काम करशील का ? असे विचारले आणि मग ते मला दाजी भाटवडेकर आणि डॉक्टर बाळ भालेराव यांच्याकडे भेटायला घेऊन गेले. मी काही काळ साहित्य संघाच्या या वास्तूत राहायला देखील होतो. ज्यावेळी साहित्य संघाचे बांधकाम सुरु झाले तेव्हा रंगमंचावरील कपडेपट बोरभाट लेन येथे स्थलांतरीत करण्यात आला, तेव्हा ती जबाबदारी देखील मी पेलली होती.

पदाधिकारी म्हणजे शं. ना. अंधृटकर, तात्यासाहेब आमोणकर, डॉक्टर दाजीसाहेब भाटवडेकर, बापूराव नाईक आणि डॉक्टर बाळ भालेराव यांनी माझ्यावर जो विश्वास ठेवला तो मला खूप महत्वाचा वाटतो.

साहित्य संघातर्फे भाऊबंदकी नाटकाचा प्रयोग दिल्ली येथे तालकटोरा गार्डन येथे आयोजित केला होता. तेव्हा आम्ही ताजमहाल, फत्तेपूर शिक्री ही ठिकाणे फिरलो होतो. आमचा मुक्काम दिल्लीच्या महाराष्ट्रसदन येथे होता. मी हा जो दिल्लीचा दौरा करू शकलो तो केवळ साहित्य संघाच्या सहकार्यमुळे !

१९७७-७८ च्या सुमारास मी साहित्य संघाच्या व्यवस्थापनात लक्ष घालू लागलो उत्तुंग सांस्कृतिक परिवार ट्रस्ट तर्फे उत्तुंग निरपेक्ष समाजकार्य पुरस्कार, एकता कल्चरल अकादमी तर्फे दिला जाणार मास्टर दत्ताराम स्मृती पुरस्कार, पृथ्वी थिएटर तर्फे दिला गेलेला रंगमंच सेवा पुरस्कार.

साहित्य संघाने दिलेला सेवा आणि नाट्यसेवा पुसस्कार हे मला मिळालेले पुरस्कार माझा आत्मविश्वास वाढवतात. माननीय शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी मला दिलेले अभिनंदनपत्र हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे.

आतापर्यंत मी या संस्थेत राहिलो, ते संस्थेने माझ्यावर केलेल्या संस्कारामुळे आणि अर्थातच माझी संस्थेवर निष्ठा आणि प्रेम आहे म्हणून !

# साहित्य संघ आणि मी

**-पद्माकर शिरवाडकर**



गेल्या ६-७ वर्षांपासून जरी मी साहित्य संघाशी कार्यकर्ता या नात्याने प्रत्यक्ष संबंधित असलो तरी १९६५-१९६८ पासून विविध प्रकारच्या कार्यक्रमाच्या उपस्थिती द्वारे मी निगडीत आहे. १९६७ साली मी स्टेट बँक ऑफ इंदूरच्या भुलेश्वर शाखेत कार्यरत होतो त्यामुळे संध्याकाळची माझी वेळ संघातील कार्यक्रमांना उपस्थित राहून आनंदात जात असे. शेजारीच मॅजेस्टिक सिनेमा थिएटर होते. तेथेही एकाच दिवशी सकाळी १२.१५ पासून ते संध्याकाळी ६.१५ पर्यंतचे तीन वेगवेगळे मराठी चित्रपट पाहिल्याचे माझ्या स्मरणात आहे.

साहित्य संघाचे त्यावेळचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणजे वा.रा.ढवळे, दि.वि.आमोणकर, चं.वि. बावडेकर, शि.मो. घैसास, दाजी भाटवडेकर, डॉ. बाबा कलगुटकर, शं.ना. अंधृटकर. प्रा.न.र.फाटक तर संघाचे अध्यक्षच होते. विद्यमान कार्यकर्त्यांपैकी डॉ. बाळ भालेराव यांना एक निष्णात शल्य चिकित्सक म्हणून मी प्रथम जी.एस. मेडिकल कॉलेज मध्ये पाहिले, कारण काही काळ मी ह्या कॉलेजमध्ये नोकरी करत होतो. डॉ. सौ. भालेरावही त्यावेळी प्रिव्हेंटिव्ह अँड सोशल मेडिसीन या विभागात व्याख्यात्या म्हणून कार्यरत होत्या. प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांना १९८७-१९८८ साली प्रथम भेटलो, ज्यावेळी १९८८ साली येथे आयोजित ६१ व्या मराठी साहित्य संमेलनाचे वेळी त्या महामंडळाच्या कार्यवाह होत्या.

साहित्य संघातील काही कार्यक्रमांसंबंधी लिहावयाचे म्हणजे विख्यात लेखिका इरावती कर्वे यांच्या 'युगान्त' वर आयोजित केलेले तीन दिवसांचे चर्चासत्र. अध्यक्षस्थानी अर्थातच प्रा.न.र.फाटक होते आणि वक्ते म्हणून प्रा. वा.ल.कुळकर्णी असल्याचे आठवले. मात्र शेवटच्या दिवशी या चर्चा सत्रानंतर इरावती कर्वे बोलल्या. चर्चासत्रातील कोणत्याही मुद्यांवर आपली प्रतिक्रिया व्यक्त न करता त्यांनी आनंद व्यक्त करुन थोडक्यात आपले मनोगत व्यक्त केले.

